# क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांच्या परिणामांचे चिकित्सात्मक अध्ययन









डॉ. सागर प्रल्हादराव नारखेडे





ATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS

# क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांच्या परिणामांचे चिकित्सात्मक अध्ययन

**Author Name**

**डॉ. सागर प्रल्हादराव नारखेडे**

**LAXMI BOOK PUBLICATION**
**2017**

LBP LAXMI BOOK PUBLICATION

**Price: /-**

**क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांच्या परिणामांचे चिकित्सात्मक अध्ययन**

**डॉ. सागर प्रल्हादराव नारखेडे**

**Email ID: sagar_sports14@yahoo.co.in**

**© 2017 by Laxmi Book Publication, Solapur.**
All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN–** 978-1-365-81304-7

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

**Printed by,**
**Laxmi Book Publication**,
258/34, RaviwarPeth,
Solapur, Maharashtra, India.
**Contact No.** : 9595359435
**Website:** http://www.isrj.org
**Email ID:** ayisrj@yahoo.in

**Pune Branch Address**
SR No 33/8/6 WadgaonBk AT No 10
DnyaneshApart , Pune -411041
Email Id :- ayisrjpune@gmail.com / lbppune@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले - प्रस्तावना** | | |
| **१.१** | प्रास्ताविक | १ |
| **१.२** | खेळ व शिक्षण | ३ |
| **१.३** | शिक्षणात खेळाचे महत्त्व | ४ |
| **१.४** | शिक्षण व शारीरिक शिक्षण संबंध | ५ |
| **१.५** | भारतातील शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरूप | ८ |
| **१.६** | महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरूप | ३० |
| **प्रकरण दुसरे - क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजनेचा ऐतिहासिक आढावा** | | |
| **२.१** | प्रास्ताविक | ४७ |
| **२.२** | अध्ययनाची गरज व महत्व | ५६ |
| **२.३** | अध्ययनाची उद्दिष्टे | ५६ |
| **प्रकरण तिसरे - क्रीडा गुण संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा** | | |
| **३.१** | प्रास्ताविक | ५७ |
| **प्रकरण चवथे - सांख्यिकीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन** | | |
| **४.१** | प्रास्ताविक | ७६ |
| **४.२** | माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन | ७६ |
| **प्रकरण पाचवे - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी** | | |
| **५.१** | सारांश | ८४ |
| **५.२** | निष्कर्ष | ८५ |
| **५.३** | शिफारशी | ८८ |
| | **संदर्भ सूची** | ९२ |

# प्रकरण -१ प्रस्तावना

**१.१ प्रास्ताविक :-**

खेळ ही मानवाची जन्मजात प्रवृत्ती आहे व ही प्रवृत्ती मनुष्याच्या जन्मापासूनच आपणास दिसून येते. कारण मूल ज्यावेळेस जन्म घेतो आणि त्याचा विकास होत असतो. हा विकास खेळाच्या माध्यमातून कळत नकळत होत असतो. देश, काल, स्थल व परिस्थितीनुसार कोणता ना कोणता खेळ खेळणे हा मानवाचा स्वभावधर्मच बनून गेला आहे. मानवाची ती एक जैविक गरजच म्हणता येईल. खेळणे हा मानवाचा जसा स्वभाव आहे तसा या भूतलावरील अन्य जीवांचाही स्वभाव आहे. खेळ ही एक कला आहे तसेच शास्त्रही आहे. खेळ हे खेळासाठीच म्हणजे आनंदासाठी, हौसेसाठीच आहे. खेळणे हे बालकाच्या निरोगीपणाचे लक्षण समजण्यात येते.

खेळ हे बालकाचे ब्रम्हांड आहे. बालकांच्या जीवनातून खेळ काढून टाकला तर त्यांचे जीवन एकाकी व निरस होते. खेळामुळे गैरसमजूती, तणाव आणि वैरभाव नाहीसा होतो. खेळामध्ये खेळाडू आपले कौशल्यपणास लावून गरीब, श्रीमंत, जात, धर्म विसरुन जिंकण्याचा प्रयत्न करतो. खेळात अपयश कसे पचवावे आणि यशाचा आनंद कसा व्यक्त करावा याची शिकवण मिळत असते. आपण वृत्तपत्र वाचतो व पाहतो की, १० वीत किंवा १२ वीत अमुक विद्यार्थी अपयशी झाला व त्याने आत्महत्या केली. परंतु आपण हे निश्चित सांगू शकतो की, तो व्यक्ती खेळाच्या मैदानावरचा असता तर त्याला ते अपयश पचविता आले असते.

खेळात भाग घेतल्यावरच त्या खेळातील आनंद व मनोरंजन आणि शरीर क्रियांची हालचाल पूर्ण रूपात दिसून येते. खेळामध्ये सांघिक, व्यक्तिगत खेळाद्वारा मनोरंजनात्मक खेळ, स्पर्धात्मक खेळ आणि उच्चस्तरीय खेळाचे प्रदर्शन होणे जरूरी आहे. मनोरंजनात्मक खेळाचा उद्देश मनुष्यात मनोरंजन व शरीराला स्वस्थ ठेवणे, उच्चस्तरीय खेळामध्ये खेळाडू भाग घेवून खेळ स्पर्धामध्ये आपले उच्चतम खेळ प्रदर्शित करून सर्वश्रेष्ठ

बनण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळेच खेळाद्वारा व्यक्तीला स्वस्थ ठेवून समाजाचे वातावरण व्यक्ती विकासास पोषक होण्यास मदत होते.

आजच्या युगात खेळाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. खेळामध्ये प्रत्येक देशाचा सहभाग सुद्धा दिवसेंदिवस वाढत आहे. वेगवेगळया खेळांच्या स्पर्धेमध्ये सुद्धा विकास होत आहे. प्रत्येक देशामध्ये विविध खेळाच्या सहभागासाठी प्रोत्साहन दिल्या जात आहे व नव-नवीन खेळाचा उदय होत आहे. वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, दूरदर्शन, जाहिरात यामुळे समाजातील लोकांना खेळाबद्दल आवड निर्माण झाली आहे. कारण खेळाद्वारे पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठा व स्वास्थ या सर्व गोष्टी प्राप्त होत असल्यामुळे, लोकांमध्ये खेळातील सहभागाविषयी जिज्ञासा निर्माण होत आहे व विविध खेळात भाग घेण्यासाठी ते प्रेरीत होतात. या बरोबरच शारीरिक स्वास्थ सुद्धा चांगले राहण्यास मदत होते.

**खेळाचे महत्व :-**

१. शारीरिक महत्व- खेळामुळे शरीर मजबुत व सूडौल बनते. मांसपेशीचा विकास होवून त्यांच्यातील ताकदीची वाढ होते. खेळामुळे शरीराला स्फुर्ती मिळते.

२. बौद्धिक महत्व- निरोगी शरीरात निरोगी मनाचे वास्तव असते. शरीर धड तर मन धड असे म्हणतात. खेळामुळे मुलांमधील चिडचिडेपणा, भित्रेपणा कमी होवून त्यांच्यातील निर्णयशक्तीचा विकास होतो.

३. सामाजिक महत्व- खेळात भाग घेतल्याने सहनशीलता वाढते, एकमेकाबद्दल आदर निर्माण होतो. नियमांचे पालन करण्याचे शिक्षण मिळाल्यामुळे मुलांमध्ये न्याय व सहानुभूती इत्यादी गुण विकसित होतात व समाजामध्ये योग्य रितीने कसे वागावे हे शिकतात.

४. मानसिक महत्व- खेळामुळे मानसिक तणावापासून मुक्ती मिळते व मुले योग्य अयोग्याचा विचार करु शकतात.

५. व्यक्तीगत महत्व- खेळामध्ये मुलाचा शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक विकास होतो.

६. नैतिकदृष्ट्या महत्व- मुलांनी खेळात भाग घेतल्यामुळे ते नैतिक काय व अनैतिक काय याबाबत विचार करु शकतात. खेळामुळे बालकांमध्ये नैतिकता निर्माण करुन त्यांना आदर्श नागरिक बनवता येते.
७. चांगले नागरिक घडविणे- खेळामुळे एकमेकांना मदत करण्याचा गुण विकसित होतो. आदर्श खेळाडू बनण्यासाठी ज्या प्रमाणे खेळ नियमांचे पालन करावे लागते त्याप्रमाणे चांगले नागरिक बनण्यासाठी सामाजिक गुणांचे पालन करणे महत्वाचे आहे.
८. शिस्त वाढीसाठी महत्व- खेळामध्ये शिस्तीला अधिक महत्व असून खेळात भाग घेतल्याने मुलांच्या अंगी शिस्तीचे गुण येतात.

**सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करते -**

वरील शब्दाने आपण समजू शकतो की, एका निरोगी शरीरात चांगले विचार वास करतात. राष्ट्राचा विकास हा बौद्धिक तथा मानसिक विकासाइतकाच शारीरिक उन्नतीवर अवलंबून असतो. हे लक्षात घेवून समाजाने आपल्या सभोवतालच्या बालकाचे तथा युवा वर्गाचे शरीर दणकट व कणखर करण्याविषयी काळजी घ्यायला हवी. त्यासाठी बालकांना खेळण्यासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकता आहे.

बालक हा राष्ट्राचा केंद्रबिंदू आहे व त्याच्या आवश्यकतेनुसार शिक्षण प्राप्त होणे आवश्यक आहे. ज्या शिक्षणातून बालकाचा विकास साधल्या जाईल अशा कृतीशील शिक्षणाची आज नितांत आवश्यकता आहे. प्रगतीसाठी शारीरिक कार्यक्षमता अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा बालमनावर परिणाम होत असतो. एकंदरीत संपूर्ण शालेय व्यवस्थेचा परिणाम हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर होत असतो.

**१.२ खेळ व शिक्षण :-**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक साधन आहे. शारीरिक शिक्षण आणि खेळ हे दोन्ही शिक्षणामधीलच भाग आहे. शिक्षणाबरोबर शारीरिक शिक्षण आणि खेळ या बाबी विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या आहेत. शिक्षणाचा हेतू हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने हा होय. म्हणून खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास साधायचा असेल तर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी खेळात

व स्पर्धांमध्ये सहभागी झाले पाहिजे. आजच्या शिक्षणामध्ये क्रियाशीलता आणि अभिरुची या दोन तत्त्वांना अलिकडील काळात महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण या तत्त्वामुळे ज्ञान प्राप्तीची क्रिया सुलभ होते. शिवाय ते ज्ञान अधिक पक्के बनते. ज्ञान प्रक्रियेत अवधान (लक्ष) अधिक टिकते. एकाग्रता वाढीस लागते. युनानी दर्शन शास्त्रज्ञाच्या मते निरोगी शरीरातच निरोगी मन वास करीत असते. Healthy Body Healthy Mind म्हणजेच शरीर व मन यांचा परस्पर जवळचा संबंध आहे. म्हणूनच शिक्षण हे कंटाळवाणे, रुक्ष, त्रासदायक न होता ते मनोरंजक व्हावे म्हणून खेळाचा व शिक्षणाचा संबंध जोडला आहे.

**१.३ शिक्षणात खेळाचे महत्त्वः-**

माणूस जन्मापासून खेळ खेळत असतो. खेळ ही त्याची जन्मजात प्रवृत्ती असून जी व्यक्ती खेळ खेळत नाही त्यालाच काही तरी विकृती आहे असे म्हणतात. खेळ हे शारीरिक, मानसिक आरोग्याचे लक्षण असून मुलाचा वाढ व विकास सुद्धा खेळावर अवलंबून आहे. शाळा, महाविद्यालयामध्ये उत्तम गुण प्राप्त करणारे व अभ्यासात हुशार असणारी मुले जीवनात यशस्वी होतीलच असे नाही. अभ्यासातील हुशारी म्हणजे संपूर्ण व्यक्तिमत्वाचा छोटासा भाग आहे. जीवनामधील यशापयश हे व्यक्तीच्या मानसिक प्रगल्बता व भावनिक वाढीवर ठरते. शैक्षणिक बुद्धिमत्तेला भावनिक बुद्धिमत्तेची जोड असेल तर जीवनात यशस्वी होता येते. कोणत्याही व्यक्तीला मिळालेल्या यशात शैक्षणिक बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्तेला वाटा जास्तीचा असतो.

बुद्धिमत्ता म्हणजे व्यक्तीला मिळालेली जैवदेणगी असून तिच्यामध्ये स्वतःच्या इच्छेनुसार व प्रयत्नाने अमर्याद अशी वाढ करता येत नाही. मात्र बालकाच्या भावनिक बुद्धिमतेचा विकास हा त्याच्या प्रयत्नाशी, इच्छाशक्तीशी निगडीत असतो आणि भावनिक बुद्धिमत्तेमध्ये वाढ करण्यासाठी क्रीडांगणासारखे दुसरे प्रभावी साधन नाही. खेळामुळे स्वतःच्या आत्मविश्वासात वाढ होते व आत्मविश्वासाने माणूस स्वतःकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहतो व असा सकारात्मक दृष्टिकोनच व्यक्तिमत्वाचा विकास घडवण्यास सहाय्यभूत ठरतो. खेळामुळे बालकामध्ये

सातत्याने काम करण्याची व चिकाटीने सराव करण्याची वृत्ती तयार होते. खेळामुळे निर्णय क्षमता वाढते. खेळामुळे भावना व तर्क यांच्यात योग्य समन्वय राहते. खेळामुळे शांत डोक्याने व एकाग्रता ठेवून योग्य तो निर्णय घेता येतो.

शालेय जीवनात शिक्षण व खेळ हे बालकाच्या व्यक्तित्व विकासामध्ये महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे व्यक्तित्व विकासासामध्ये शालेय शिक्षण व खेळास अग्रस्थान देणे आवश्यक आहे. भारतीय घटनेनुसार शिक्षण महत्त्वाची गरज व मूलभूत हक्क आहे. शिक्षण ही मानवाला सामर्थ्यवान बनविणारी शक्ती आहे. हे सर्व असतांना आजचा विद्यार्थी सोबतच पालक वर्ग शिक्षणाच्या तणावात आहे. या चक्रव्यूहात आपण खऱ्या सुखापासून व आनंदापासून दूर चाललो आहोत. जीवनाच्या तणावाचे हे चक्र वृद्धिंगत होऊन व रोगग्रस्त होऊन आपण शिक्षणाचा अंधकारमय बुरखा परिधान केलेले स्वतंत्र भारतातील नागरिक आहोत. आपण आपल्यासोबतच पर्यायाने भारत देशाला सुद्धा खाईत ढकलत आहोत. यातून सावरण्यासाठी व भारत देशाची ओळख ही संपूर्ण विश्वात होण्यासाठी नव्याने आपल्या देशाचे आधारस्तंभ असलेले युवा विद्यार्थी यांच्या दार्शनिकतेचा विचार होणे ही महत्वपूर्ण अशी काळाची गरज आहे. त्यासाठी क्रियात्मक व परिणामकारक अशा शिक्षणाची गरज आहे आणि हे शिक्षण आपणांस शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडामधून प्राप्त होत असते.

**१.४ शिक्षण व शारीरिक शिक्षण संबंध :-**

शिक्षण व शारीरिक शिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सामान्य शिक्षणाचे ध्येय व उद्दिष्टे साध्य करण्यास शारीरिक शिक्षणाचा खूपच उपयोग होतो. शारीरिक शिक्षण हे शिक्षणाचे एक अंग आहे, हे आजकाल सर्व शिक्षणतज्ञांनी मान्य केले आहे. जगातील अनेक शिक्षणशास्त्रज्ञांनी मनुष्याच्या विकासाची शरीर व बुद्धी ही दोन अंगे असल्याचे मान्य केले. त्यामुळे शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. शारीरिक शिक्षण हे संपूर्ण जीवनाचे शिक्षण आहे. भावी जीवनाच्या तयारीचे ते एक उत्तम साधन आहे.

शिक्षणाच्या सर्वकष पद्धतीचा शारीरिक शिक्षण हा एक अविभाज्य असा घटक आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण म्हणजेच शारीरिक, बौद्धिक, मानसिक, नैतिक व सामाजिक विकास करुन, आदर्श नागरिक तयार करणे, हे शिक्षणाचे ध्येय आहे. हेच शारीरिक शिक्षणाचेही ध्येय आहे. या ध्येयाप्रत पोहचण्यासाठी शारीरिक शिक्षणाचे फक्त काही मार्ग (उद्दिष्टे) वेगळे आहेत. परंतु एका अर्थाने हे मार्गच (उद्दिष्टे) खऱ्या अर्थाने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यास अधिक उपयुक्त ठरतात. कारण शारीरिक शिक्षणामध्ये प्रत्यक्ष कृती, हालचाल व अनुभव यावर अधिक भर असतो. शिवाय शिक्षण व शारीरिक शिक्षणाची उद्दिष्टे लक्षात घेता दोहोंची उद्दिष्टेही समानच आहेत. ही उद्दिष्टे साध्य करुन शिक्षणाच्या ध्येयाप्रत पोहचण्यासाठी शारीरिक शिक्षणातील विविध बाबींच अधिक उपयुक्त ठरतात. मनुष्याने फक्त बुद्धीच्या विकासाकडे लक्ष दिल्यास त्याचा शारीरिक विकास साधला जाणार नाही. तो शारीरिकदृष्ट्या कमकुवत बनेल. त्याचा परिणाम बुद्धिच्या विकासावरही होईल. यावरुन बौद्धिक विकास व शारीरिक विकास ही दोन स्वतंत्र व निराळी नसून, एकाच्या वाढीचा व विकासाचा दुसऱ्यावर परिणाम होत असल्याचे दिसून येते. म्हणूनच शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण प्रक्रियेचे शारीरिक शिक्षण हे एक अंग मानले आहे. शारीरिक शिक्षणाने शरीराची, मेंदूची वाढ योग्य होते. त्याचे पोषण चांगले होवून, त्याची कार्यक्षमता वाढते. शारीरिक हालचालीतून अनेक नव-नवीन अनुभव मिळतात. शारीरिक हालचाली बरोबरच मानसिक क्रियाही चालू असते. त्यामुळे बौद्धिक संस्कार परिणामकारक घडतात. त्यातून बौद्धिक विकासही साधला जातो. अनेक शिक्षण व शारीरिक शिक्षण तज्ज्ञांच्या मते शारीरिक वाढीच्या गतीवर बौद्धिक विकासाची गती अवलंबून असल्याचे मान्य केले आहे. शक्ती व बुद्धी ही मनुष्याच्या विकासाची दोन अंगे आहेत. या दोहोंचा विकास समतोल झाला पाहिजे. तरच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास साधला जाईल. परंतु मधल्या काळात व काही प्रमाणात आजही बौद्धिक विकास साधणारे काहीजण आपल्या शरीराकडे दुर्लक्ष करतात व शारीरिक विकास साधणारे खेळाडू बौद्धिक विकासाकडे (अभ्यासाकडे) दुर्लक्ष करतात. यामुळे शक्ती व

बुद्धी यांचा समतोल विकास साधला जात नाही. शास्त्रियदृष्टया शारीरिक शक्ती व बौद्धिक शक्ती या दोन स्वतंत्र व निराळया नसून एकसंघ आहेत.

शारीरिक शिक्षण हे 4H- Hand, Head, Heart, Health यांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. शारीरिक शिक्षण सर्व प्रकारच्या (शारीरिक, बौद्धिक, मानसिक, भावनिक) क्रियांना उत्तेजित करते. व्यक्ती, परिवार व समाजाचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुरक्षित ठेवते. फुरसतीच्या वेळेत शरीराला व मनाला विशिष्ट बाबीमध्ये गुंतवून मनोरंजन साधण्यास (मनाला आनंद) उपयुक्त ठरते. कोणत्याही व्यवसायास, उद्योगास आवश्यक असणारी शारीरिक कार्यक्षमता (चिकाटी, प्रयत्न, धडपड व निरोगीपणा इ.) प्राप्त करुन देण्यात खूपच सहाय्यभूत ठरते. कोणत्याही कार्यात यश मिळविण्यास उपयुक्त ठरते. व्यक्तीला समाजाचा आदर्श नागरिक बनवून राष्ट्र संरक्षणास व राष्ट्र प्रगतीस फार मोठा हातभार लावण्यास शारीरिक शिक्षणच खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरते. म्हणूनच शारीरिक शिक्षण हे संपूर्ण जीवनाचे शिक्षण आहे. यामुळे भावी काळात प्रत्येक देशात सामान्य शिक्षणामध्ये आजच्या पेक्षा शारीरिक शिक्षणास अधिक महत्त्व प्राप्त होणार यात शंका नाही.

आज प्रत्येक देश हा आपले वर्चस्व सर्वच क्षेत्रामध्ये सिद्ध करण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. त्याचा शैक्षणिक क्षेत्र देखील अपवाद नाही. शारीरिक शिक्षण हे शिक्षणाचेच एक अंग असल्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये प्रत्येकाला त्याची गरज वाटू लागली आहे. कोणत्याही देशाची प्रगती ही तेथील नागरिकांच्या आरोग्यावर व राहणीमानाचा स्तर यावर अवलंबून असते. तेथील नागरिक कौशल्यसंपन्न, शारीरिकदृष्ट्या सुदृढ, मानसिक स्वास्थसंपन्न, आरोग्यसंपन्न इत्यादी गुणवैशिष्ट्ये असलेले असतील तर समाजाची कार्यक्षमता उंचावते व असा समाज राष्ट्राची प्रगती घडवून आणण्यात मोठे योगदान देतो. जर भावी पिढी सुदृढ व सक्षम बनवायची असेल तसेच आपल्या राष्ट्राची प्रगती घडवून आणायची असेल तर जास्तीत जास्त विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या सुदृढ बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना व्यायामाची, खेळाची आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आज शाळांमधून जास्तीत जास्त खेळाडू तयार होण्यासाठी तसेच विविध स्पर्धांमध्ये खेळाडूंचा सहभाग वाढवून भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्यासाठी वेगवेगळया प्रोत्साहनात्मक योजना राबविल्या जात आहेत. या योजनांप्रमाणेच महाराष्ट्र सरकारद्वारा शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या खेळातील सहभागाबद्दल दिली जाणारी क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजना आहे. या योजनेविषयीची माहिती बघण्यापूर्वी थोडक्यात भारतातील व महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण व खेळाच्या इतिहासाविषयी माहिती पुढील प्रमाणे बघू या.

**१.५ भारतातील शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरूप :-**

१८९६ साली सुरु झालेल्या ऑलिंपिक चळवळीचा परिणाम म्हणून 'खेळ' हा स्पर्धेच्या स्वरुपात विकसित झाला. आरोग्य, शारीरिक शिक्षण व काही मर्यादित स्वरुपात खेळ हा अभ्यासेत्तर, अभ्यासपूरक व सरतेशेवटी अभ्यासक्रमांतर्गत शिक्षणाचा एक भाग म्हणून कालमानापरत्वे मानला गेला. भारतात शारीरिक शिक्षणास शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त होण्यापूर्वी स्वातंत्र्य पूर्व काळापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजपर्यंतच्या कालावधीत शारीरिक शिक्षण व खेळ कोण-कोणत्या अवस्थेतून गेले याची माहिती पुढील प्रमाणे देण्यात आली आहे.

**स्वातंत्र्य पूर्व काळ :-**

**१) स्वामी कुवल्यानंद समिती (१९३७) :-**

१९३७ मध्ये त्या काळच्या मुंबई सरकारने योगतज्ञ स्वामी कुवलयानंद यांच्या अध्यक्षतेखाली शारीरिक शिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी तज्ञांची समिती नेमली होती. त्या समितीने खालील महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत.

- ❖ अल्पमुदतीचे शारीरिक शिक्षण प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत.
- ❖ भारतीय खेळ व व्यायाम यांना प्राधान्य देण्यात यावे.
- ❖ शारीरिक प्रशिक्षणासाठी एक स्वतंत्र संस्था शासनाने सुरू करावी.

❖ शारीरिक शिक्षणाच्या पर्यवेक्षणाकरीता स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

❖ शारीरिक शिक्षण सामान्य शिक्षणाचे अविभाज्य अंग असावे.

**२) शारीरिक शिक्षण तज्ञांचे सल्लागार मंडळ (१९३८) :-**

सन १९३८ पासून शारीरिक विकासासाठी शारीरिक शिक्षण तंज्ञांचे सल्लागार मंडळ शासनाला सल्ला देण्यासाठी अस्तित्वात आले. त्या मंडळाने खालील महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत.

❖ पदवीधरासाठी एक वर्षाचा शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी कांदिवली, मुंबई येथे प्रशिक्षण संस्था सुरू केली.

❖ प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी ८-१० आठवड्याचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले.

❖ मुख्याध्यापकांसाठी सुद्धा शारीरिक शिक्षणाचे उदबोधन वर्ग सुरू केले.

❖ शाळांमध्ये शारीरिक शिक्षक नेमले, वेळापत्रकात शारीरिक शिक्षणाच्या तासिका राखून ठेवल्या.

❖ विभागीय पातळीवर प्रत्येक विभागास दोन असे शारीरिक शिक्षणाचे पर्यवेक्षक नेमले.

❖ वैद्यकीय तपासणी करण्यासंबंधीचे आदेश देण्यात आले.

**३) भारतीय विद्यापीठीय संघटना (१९४१) :-**

सन १९२९ ते १९४० या कालावधीत विचारात बदल होऊन सन १९४१ मध्ये भारतीय आंतर विद्यापीठीय क्रीडा मंडाळाची (इंटर युनिव्हरसिटी स्पोर्ट बोर्ड ऑफ इंडिया) स्थापना करण्यात आली. एकूण चार विभागात (झोन) सांघिक व वैयक्तिक खेळाच्या स्पर्धा घेण्यास सुरुवात केली.

सन १९४५ मध्ये खेळांच्या नियमांचे पुस्तक (स्पोर्टस् हँडबुक) तयार करुन प्रसिद्ध केले. स्वातंत्र्यानंतर नावामध्ये बदल करुन 'असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हरसिटीज' असे करण्यात आले. ही एक स्वायत्त संघटना (संस्था) असून त्याचे कार्यालय दिल्ली येथे आहे.

विविध खेळांच्या स्पर्धा या संघटनेमार्फत आयोजित केल्या जातात. त्यासाठी सन १९७३ पासून प्रत्येक वर्षी फेब्रुवारी / मार्चमध्ये सभा आयोजित करून विविध खेळाâच्या स्पर्धांची विभागणी केली जाते. भारतातील विद्यापीठापैकी काही विद्यापीठे प्रत्येक वर्षी एखाद्या खेळाच्या स्पर्धा आयोजनाची जबाबदारी स्वीकारतात.

**४) शारीरिक शिक्षण समिती (१९४५-४६) :-**

शारीरिक शिक्षणाच्या प्रगतीसाठी राज्यव्यापी स्वरूपाची यंत्रणा आवश्यक आहे, असे या शारीरिक शिक्षण समितीचे प्रतिपादन होते. त्यानुसार नेमलेल्या या आढावा समितीने शारीरिक शिक्षण विकासात पोषक असा एक सविस्तर आराखडा तयार केला. यामध्ये १०० हून अधिक शिफारशी आहेत. त्यातील महत्त्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

- माध्यमिक शाळांतील शारीरिक शिक्षण शिक्षकांचे अनुदान २५ टक्के वरून ३३ टक्केपर्यंत वाढवावे.
- मॅट्रीक नंतरचा एक वर्षाचा सी.पी.एड. पाठ्यक्रम असलेली प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात यावी.
- राज्य शारीरिक शिक्षण निरीक्षक नेमण्यात यावा.
- कांदीवली येथील शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात यावी.
- माध्यमिक शाळांतील सर्व विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षणाची वार्षिक परीक्षा सुरू करण्यात यावी.
- शारीरिक शिक्षणासाठी ''राज्य तपासणी अधिकारी'' हे नवीन पद निर्माण करावे व त्याला पुरेसे मदतनीस द्यावेत.
- स्वामी कुवलयानंदाच्या नेतृत्वाखाली शारीरिक शिक्षण महाविद्यालय व संशोधन केंद्र स्थापावे.

### ५) ताराचंद समिती (१९४८) :-

मध्यवर्ती सरकारने ताराचंद यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शाळेतील शिक्षण व शारीरिक शिक्षण या संबंधीच्या समस्यांची पाहणी करण्यासाठी १९४८ साली समिती नेमली होती. या समितीने शारीरिक शिक्षणासंबंधी महत्त्वाच्या शिफारसी सूचविल्या होत्या. त्यापैकी काहीप्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहे.

- ❖ विविध राज्यांत शारीरिक शिक्षणाची महाविद्यालये सुरू करावीत.
- ❖ देशाच्या विविध भागात क्रीडामंडळे, जिम्नॅशियम, आखाडे सुरू करावेत.
- ❖ शिक्षण संस्थेमध्येच शारीरिक शिक्षणासाठी योग्य जागा असावी.
- ❖ एक वर्ष कालावधीचा शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू करावा.

### ६) डॉ. राधाकृष्णन आयोग (१९४८) :-

डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या विश्वविद्यालयीन आयोगाने शारीरिक शिक्षणाबाबत आपल्या अहवालात खालील उपाय सुचविले आहेत.

- ❖ भारतातील काही विद्यापीठामध्ये शारीरिक शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयाची स्थापना करावी. शारीरिक शिक्षणातील पदवी देणारे किमान एक महाविद्यालय प्रत्येक राज्यात सुरु करावे.
- ❖ महाविद्यालयात व विद्यापीठात शारीरिक शिक्षणाचा स्वतंत्र विभाग असावा व त्या ठिकाणी किमान एका संचालकाची नियुक्ती करावी.
- ❖ डॉ. ताराचंद समितीने सुचविल्यानुसार शारीरिक शिक्षणातील पदव्युत्तर प्रशिक्षण अभ्यासक्रमाची सोय करण्यात यावी. तसेच एम. ए., पीएचडी. ची ही सोय करण्यात यावी.
- ❖ प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. प्रत्येक विद्यापीठात आरोग्य चिकित्सालय असावे. संसर्गजन्य रोग असलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश देऊ नये. सर्व शिक्षक व कर्मचारी यांचीही वैद्यकीय तपासणी प्रत्येक वर्षी करण्यात यावी. विद्यार्थी निवास, भोजनगृह इ.

ची देखरेख ठेवण्यात यावी. योग्य किंमतीत दुपारी पौष्टिक अल्पोहार देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

- ❖ प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठात शारीरिक शिक्षण संचालकाची नियुक्ती करण्यात यावी व त्याचा दर्जा व वेतन अन्य विषयाप्रमाणे असावे.
- ❖ प्रत्येक विद्यार्थ्याने किमान दोन खेळ खेळणे आवश्यक आहे.
- ❖ शारीरिक शिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यासाठी योग्य व आवश्यक वेळ दिला पाहिजे.
- ❖ शारीरिक शिक्षणाचा संपुर्ण कार्यक्रम शारीरिक शिक्षण संचालकाच्या देखरेखीखाली राबविण्याात यावा.

**७) क्रेंद्रीय-मध्यवर्ती शारीरिक शिक्षण व मनोरंजन सल्लागार मंडळ (१९५०) :-**

स्वातंत्र्यानंतर शारीरिक शिक्षण, खेळ व मनोरंजन विकासासाठी जे सरकारी प्रयत्न करण्यात आले. त्यापैकी एक महत्वाचे मंडळ म्हणून याचा उल्लेख करावा लागेल. या मंडळाच्या शिफारशीनुसार शारीरिक शिक्षणाच्या विविध क्षेत्रात प्रगती झाली आहे.

शारीरिक शिक्षण व मनोरंजनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाची योजना या सल्लागार मंडळाच्या सल्ल्यानुसारच तयार करण्यात आली. त्यामुळेच शारीरिक शिक्षण प्रशिक्षण योजना, परीक्षा, अभ्यासक्रम, संशोधन, शिष्यवृत्ती, अनुदान योजना, क्रीडासाहित्य व ग्रंथ खरेदी अनुदान, वाङमय प्रकाशन, स्पर्धा व शर्यतीचे आयोजन, योगाचा प्रसार, राष्ट्रीय क्रीडानैपुण्य इ. शारीरिक शिक्षण व मनोरंजन संबंधित बाबीâमध्ये थोडीफार प्रगती झालेली दिसून येते.

**८) माध्यमिक शिक्षण आयोग (डॉ. एल. एस. मुदलियार कमिशन) (१९५२) :-**

डॉ. एल. एस. मुदलियार कमिशनने (१९५२-५३) खालील शिफारशी करुन शारीरिक शिक्षणाची पूर्वपिठीका भक्कम केली. शारीरिक शिक्षण हे सांघिक खेळ व वैयक्तिक व्यायाम याद्वारे शाळेत दिले जावे.

त्यासाठी शारीरिक शिक्षण संचालनालयाचे सुपरव्हिजन होते. शाळेतील सर्व शिक्षकांनी किंवा कमीत कमी ४० वर्षाखालील सर्व शिक्षकांनी शारीरिक कार्यक्रमात प्रत्यक्ष भाग घ्यावा. ज्यायोगे हा कार्यक्रम काही एकांगी शिक्षकांच्या सहभागाचा कार्यक्रम न होता शालेय कार्यक्रमाचा एक जिवâत भाग म्हणून आयोजित केला जावा. मुदलियार कमिशनने सांघिक खेळांना विशेष मूल्य दिले होते. कारण सांघिक खेळांद्वारे करमणुकीच्या सोयींबरोबरच, आरोग्यपूर्ण जीवन प्राप्त जसे होते त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडणघडण होण्यास मदत होते.

**९) राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शन योजना (राजकुमारी अमृतकुमारी कौर प्रशिक्षण योजना) (१९५३) :-**

राजकुमारी अमृतकुमारी कौर ह्याच या योजनेच्या जनक आहेत. आरोग्य खात्यातून आर्थिक तरतूद करुन राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी सप्टेंबर १९५३ साली भारत सरकारतर्फे या योजनेची स्थापना करण्यात आली.

**उद्देश-**

ॲथलेटीक्स व अन्य खेळातील पात्र खेळाडूंना नॅशनल स्टेडियम दिल्ली येथे ४ ते ६ आठवडे एकत्र शास्त्रशद्ध खेळ कौशल्याचे मार्गदर्शन करुन राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करणे.

पुढे १९५८ साली ही योजना शिक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली आणली. त्यानंतर अनेक क्रीडा तज्ञांनी अशा प्रकारची कायम स्वरुपाची एक 'राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शनाची संस्था' सुरु करावी असे सूचविले व शेवटी अखिल भारतीय क्रीडा परिषदेच्या शिफारशीनुसार नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्था पतियाळा या ठिकाणी सन १९६१ साली सुरु करण्यात आली. या राष्ट्रीय प्रशिक्षण योजनेमार्फत भारतात अनेक ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

**१०) अखिल भारतीय क्रीडा परिषद (१९५४) :-**

इ.स. १९५४ मध्ये भारतीय क्रीडा संघटनांच्या अध्यक्षांची एक सभा भारत सरकारच्या शिक्षणमंत्र्यानी (कै. मौलाना अब्दुल कलाम

आझाद) आमंत्रित केली. त्यांच्या शिफारशीनुसार ही क्रीडा परिषद निर्माण झाली.

**त्या समितीचे विशेष कार्य -**

- ❖ भारत सरकार व निरनिराळया खेळांच्या राष्ट्रीय संघटना यांच्यामध्ये समन्वय साधणे.
- ❖ क्रीडा क्षेत्रात भारतीय खेळाडूंचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न करणे.
- ❖ भारतीय क्रीडा संघटनांचे कार्यात सुसूत्रता आण्ण्याच्या दृष्टीने त्यांना सल्ला देणे.
- ❖ या क्रीडा संस्था व संघटनांना अनुदान देण्याबाबत मध्यवर्ती सरकारला त्यांची शिफारस करणे.
- ❖ निरनिराळया खेळांच्या संघांना परदेशी सामने वा स्पर्धेत भाग घेण्यास जाण्यासाठी अनुमती द्यावी किंवा नाही यासंबंधी शासनास सल्ला देणे.
- ❖ भारतातील नामवंत खेळाडूंची अर्जून पारितोषिके, पद्मभूषण किंवा पद्मश्री यासारख्या पदव्या शासनातर्फे बहाल करण्यासाठी निवड करणे.
- ❖ खेळाडूकरिता क्रीडा मार्गदर्शन शिबिरे, भारतीय संघाची निवड इ. बाबत शासनास सल्ला देणे.
- ❖ क्रीडा विकासाच्या विविध क्षेत्रात सुधारणा करण्याबाबत शासनास सल्ला देणे.

या समितीच्या शिफारशीवरूनच पुढे पतियाळा येथे राष्ट्रीय क्रीडा संस्थेची स्थापना करण्यात आली. वरील परिषदेप्रमाणेच राज्य सरकारांना सल्ला देण्यासाठी राज्यांनी आपापल्या क्रीडा परिषदा स्थापन केल्या.

**११) शारीरिक शिक्षणाचा राष्ट्रीय आराखडा (१९५६) :-**

राष्ट्रीय आराखडयाचे ध्येय हे प्रत्येक मुलाला शारीरिक, मानसिक व भावनिक दृष्टया संपन्न करावयाचे, त्याचा व्यक्तिगत व सामाजिक विकास अशा रीतीने करावयाचा की, तो समाजात सुखाने जगेल व इतरांनाही सुखाने जगण्यास हातभार लावून एकंदर समाजाची प्रगती करील हे होते. अ) शारीरिक क्षमतांचा विकास. ब) स्नायूतंतू व मज्जासंस्था

यांच्या सहकार्यातून प्राप्त होणाऱ्या कौशल्याचा विकास. क) व्यक्तिमत्व व चारित्र्य विकास. वरील ध्येये व उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय आराखडयात निरनिराळया स्तरावर प्रत्यक्षात कोणता कार्यक्रम दिला पाहिजे याचेही सविस्तर विश्लेषण केले आहे.

**१२) खेळ व क्रीडा यांच्या विकासाकरिता समिती (Adhoc Inquiry Committee for Games & Sports) (१९५८) :-**

१९५४ च्या आशियाई क्रीडास्पर्धेमध्ये आपल्या खेळाडूंचा दर्जा का खालावला याबाबत चौकशी करण्यासाठी इ.स. १९५८ मध्ये वरील समिती नेमली गेली. या समितीने एकूण परिस्थितीचा सारासार विचार करुन शिफारसी सूचविल्या होत्या. त्यापैकी काही प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहे.

अ) क्रीडाविकासाचे नियोजन काही अल्पावधीकरिता व काही दीर्घ मुदतीचा विचार करुन करावे.

ब) राष्ट्रीय पातळीवर क्रीडा मार्गदर्शनाचे प्रशिक्षण देणारी संस्था असावी.

क) क्रीडा प्रशिक्षणाच्या कार्यात एकसुत्रीपणा असावा.

ड) राष्ट्रीय क्रीडा संघटनांच्या व्यवस्थापन पद्धतीत एकसूत्रीपणा असावा. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे असावे.

- ❖ राष्ट्रीय क्रीडा संघटना इंडियन ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असाव्यात.
- ❖ एकाच वेळी एका अधिकाऱ्याने दोन किंवा अधिक क्रीडा संघटनांचे अधिकारपद स्वीकारु नये.
- ❖ क्रीडा संघटनेच्या अधिकारपदावर एका अधिकाऱ्याने ३ वर्षापेक्षा अधिक काळ राहू नये. जर त्या क्रीडासंघटनेच्या कार्यकारी मंडळास मान्य असले तर आणखी तीन वर्षे अधिकारपद स्वीकारायला हरकत नाही.
- ❖ ग्रामीण भागात क्रीडाविकासावर या संघटनांनी अधिक भर द्यावा.
- ❖ शिक्षणसंस्थात क्रीडाविकासाकरिता जास्त प्रमाणात सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून शासनाने योग्य ती तरतूद करावी.

- ❖ शिक्षणसंस्थातील नैपुण्य दाखविणाऱ्या क्रीडापटूंना पोषक आहाराची सोय व्हावी.
- ❖ याशिवाय क्रीडापंच व क्रीडाअधिकारी यांना त्यांच्या कामात निष्णात करण्यास शासनाने आर्थिक तरतूद करावी.

**१३) राष्ट्रीय शारीरिक क्षमता मोहिम (१९५९) :-**

भारतातील तरुणांची शारीरिक क्षमता मोजण्यासाठी तसेच तरुणांनी आपल्या शारीरिक क्षमतेकडे लक्ष देण्यासाठीची योजना भारत सरकारच्या मान्यतेने देशभर सुरु केली. राष्ट्रीय शारीरिक क्षमता मोहिमचा उद्देश हा भारतीय नागरिकांत शारीरिक स्वास्थाची आवड निर्माण करणे व जीवन निरोगी करणे हा होता.

**१४) डॉ. सी. डी. देशमुख समिती (१९५९) :-**

विद्यापीठ अनुदान मंडळाने सन १९५९ मध्ये डॉ. सी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उच्च शिक्षणासंदर्भांत एक समिती नेमली. या समितीनेही शारीरिक शिक्षणावर प्रकाश टाकला आहे. अन्य विषय शिक्षक व शारीरिक शिक्षण संचालक यांच्या कामाचे स्वरुप, शैक्षणिक अर्हता लक्षात घेऊन विषय शिक्षक व शारीरिक शिक्षण शिक्षकाची पदे समकक्ष अशीच असावीत. त्यांचा दर्जा व वेतन समान असावे अशी एकमुखी शिफारस केली आहे. स्त्री व पुरुषासाठी शारीरिक शिक्षणाच्या क्रीडाबाबी सूचविण्यासाठी, त्यांचा विचार करण्यासाठी यापुढे समितीमध्ये एक शारीरिक शिक्षण तज्ञ स्त्री शिक्षिका असावी. स्त्री व पुरुष यांना काही वेगळया बाबी सूचवाव्यात. तशा प्रकारची एक योजना तयार करावी तरच शारीरिक शिक्षण हे स्त्री-पुरुषाच्या विकासात खऱ्या अर्थाने पोषक ठरेल. वरील समित्यांच्या शिफारशीमुळे शारीरिक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला गेला. शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षणास महत्वाचे स्थान प्राप्त झाले. शिक्षण प्रक्रियेचे शारीरिक शिक्षण हे एक अंग बनले म्हणून शारीरिक शिक्षण हे संपूर्ण जीवनाचे शिक्षण आहे.

**१५) कुंझरू समिती (१९६०) :-**

कुंझरू समितीने १९५०-६० या दशकातील 'युवक' विकासाकरीता ज्या अनेक योजना कार्यरत होत्या त्याचे एकत्रीकरण करून एक परिणामकारक योजना सुचविली. समितीचे महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

अ) एन.सी.सी. प्रवेशासाठी 'स्काउटिंग' केलेले असल्याची पूर्व अट असावी.

ब) राष्ट्रीय छात्र सेनेचे शाळेमधील प्रशिक्षण थांबवावे व ते महाविद्यालयीन स्तरावर सुरू करावे.

क) सहाय्यक छात्रसेना व कनिष्ठ छात्रसेना बंद कराव्यात. कुंझरू समितीच्या वरील शिफारशीनुसार माध्यमिक शाळांमधून मध्यवर्ती शासनाने 'एन.एफ.सी.' या नावाची एक नवीन योजना सुरू केली. १९६५-६६ या शैक्षणिक वर्षापासून हा अभ्यासक्रम माध्यमिक शाळांत सक्तीचा कार्यक्रम म्हणून सुरू करण्यात आला.

**१६) कौल व कपूर समिती (१९६१) :-**

सन १९६१ साली या समितीने भारत सरकारला अहवाल सादर केला. या अहवालातील काही प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहे.

- ❖ शाळा व महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षण हे एक शिक्षणाचे अंग मानण्यात यावे व अन्य विषयाप्रमाणे शारीरिक शिक्षण हा एक विषय समजण्यात यावा.
- ❖ प्रत्येक शिक्षणसंस्थेमध्ये शारीरिक शिक्षण हा एक सुसज्ज व परिपूर्ण असा विभाग असावा.
- ❖ शाळा व महाविद्यालयामध्ये क्रीडा विभागाची तयारी चांगल्या प्रकारे करण्यात यावी. क्रीडांगण, क्रीडासाहित्य पुरेसे असावे. त्यासाठी शासनाने अनुदान द्यावे.
- ❖ शाळा व महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थ्यांपैकी ज्या खेळाडूंनी क्रीडानैपुण्य दाखविले असेल अशा खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात यावी.

❖ भारतातील प्रत्येक गावात, औद्योगिक केंद्राच्या ठिकाणी क्रीडा मंडळे, सांस्कृतिक मंडळे स्थापन करावीत. त्यासाठी शासनाने अनुदानही द्यावे.

या समितीने अन्यही काही शिफारशी केल्या. त्यामध्ये मुख्यत्वेकरुन अखिल भारतीय क्रीडापरिषद, राज्य क्रीडापरिषद व खेळांच्या संघटना यांच्या कार्यात एकसुत्रीपणा येण्यासाठी त्यांच्या घटनेत व रचनेत बदल करण्यात यावा. त्यामुळे खेळांचा दर्जा उंचावला जाईल ही शिफारस केली होती.

**१७) डॉ. डी. एस. कोठारी कमिशन (१९६४-६६) :-**

डॉ. कोठारी कमिशनने शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण व नैतिक शिक्षणाचाही विचार करुन या संदर्भात सन १९६६ मध्ये भारत सरकारला अहवाल सादर केला. या अहवालातील काही प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१. भारतीय खेळाची जोपासना 'राष्ट्रीय परम्परा' म्हणून करण्यात यावी.

२. विद्यार्थ्यांचे वय, त्यांची कुवत व आवड लक्षात घेऊन शारीरिक शिक्षण व खेळ कार्यक्रमाची आखणी करावी.

३. शारीरिक शिक्षण व खेळ (क्रीडांगणावरील/व्यायाम शाळेतील) या मधून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी संघभावना, सामुहिक जीवन व भारतीय लोकशाहीस पूरक अशा गुणांची जोपासना व्हावी.

४. क्रीडा विकास शैक्षणिक संस्थेपुरते मर्यादित न ठेवता, त्याचे स्वरुप व्यापक (समाज, अन्य संस्था) करण्यात यावे.

५. या शिक्षणाचा कार्यक्रम इ. १ ली ते ४ थी पर्यंत मुलांमुलींना समान असावा. त्यापुढे मात्र काही प्रमाणात त्यामध्ये बदल असावा.

६. शैक्षणिक संस्थेतील 'एन.एफ.सी.' योजनेचे पुनर्मुल्यांकन करण्यात येऊन त्यामध्ये आवश्यक तो बदल करावा.

डॉ. कोठारी कमिशनच्या वरील विधायक सूचनेमूळे संपूर्ण शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षणास एक महत्वाचे अंग असल्याचे मानण्यात येऊ लागले. त्याच बरोबर डॉ. कोठारी कमिशन अहवाल फेरतपासणीसाठी

नेमलेल्या श्री. ईश्वरभाई पटेल समितीच्या शिफारशी व एन.सी.इ.आर.टी.च्या आधुनिक विचारसरणीमुळे प्राथमिक शिक्षणात शारीरिक शिक्षण, खेळ व मनोरंजनास प्रथम क्रमांकाचे स्थान प्राप्त होण्यास फार मोठी मदत झाली.

**१८) स्नाईप्स** (सोसायटी ऑफ नॅशनल इंस्टिटयूट ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस् -१९६५) **:-**

खेळांचा दर्जा वाढून त्याचा विकास व्हावा यासाठी भारत सरकारने राणी लक्ष्मीबाई शारीरिक शिक्षण महाविद्यालय, ग्वाल्हेर व नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्था, पतियाळा येथे प्रशिक्षण महाविद्यालये सुरु केली. त्यांचा कारभार पाहण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी, शासनास वारंवार सल्ला व मार्गदर्शन करण्यासाठी तसेच त्यांच्यासाठी आर्थिक तरतुदीबाबत योजना आखण्यासाठी भारत सरकारच्या मान्यतेनेच 'स्नाईप्स' या स्वायत्त मंडळाची स्थापना करण्यात आली होती.

**कार्ये-**

अ) क्रीडा विषयक केंद्र सरकारच्या योजना राष्ट्रीय महाविद्यालयामार्फत राबविणे.

ब) भारतातील मार्गदर्शन केंद्राना प्रशिक्षक पुरविणे.

क) राष्ट्रीय क्रीडा संस्थांच्या कारभारवर देखरेख ठेवून मार्गदर्शन करणे इ.

**१९) शारीरिक क्षमता दल (१९६५) :-**

डॉ. कुंझरु यांच्या अध्यक्षतेखली सन १९५९ मध्ये एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार सन १९६५ मध्ये 'शारीरिक क्षमता दल' ही नवीन योजना तयार केली. केंद्र सरकारने शारीरिक शिक्षण व खेळाची एक पुस्तिका तयार केली व सर्व राज्यांना पाठविण्यात आली. त्यानुसार इ. ५ वी ते ११ वी पर्यंत ही योजना अंमलात आणली गेली.

देशाभिमान, राष्ट्रप्रेम निर्माण करुन आदर्श नागरिक तयार करण्यासाठी तयार केलेली ही योजना सर्व राज्यानी तत्वतः मान्य केली. शारीरिक शिक्षण विभागात काम करण्याऱ्या शिक्षकांचे उद्बोधन वर्ग आयोजित केले.

**२०) राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक धोरण (१९६८) :-**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते १९६८ सालापर्यंत वेगवेगळया शैक्षणिक धोरणांची पूनर्निर्मिती केली गेली. त्या धोरणांमध्ये क्रीडा व खेळ याबाबत विविध बाबींचा उल्लेख केला गेला. त्यापैकी काही प्रमुख बाबी पुढील प्रमाणे आहे.

अ) शारीरिक सुद्दढता आणि खेळाडूवृत्तीचा सर्वसामान्य विद्यार्थी व विशेष प्रावीण्य मिळवणारे खेळाडू यांच्यामध्ये विकास व्हावा.

ब) खेळाच्या व इतर सोयी सूविधांचा राष्ट्रीय स्तरावर विकास करणारा कार्यक्रम तयार करावा आणि या कार्यक्रमास प्राधान्य असावे.

**२१) राष्ट्रीय क्रीडा धोरण (१९८०) :-**

अखिल भारतीय क्रीडा परिषदेने १९८० मध्ये राष्ट्रीय क्रीडा धोरण तयार केले. त्यातील काही महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहे.

१. क्रीडा धोरणाची खालील तीन उद्दीष्टे होती.

अ) सर्व समाजामध्ये क्रीडा व आरोग्याची जाणीव निर्माण करणे व त्याद्वारे सशक्त व आरोग्य संपन्न राष्ट्र तयार करणे.

ब) क्रीडा व खेळ यांचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करणे की ज्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये अभिमानास्पद कामगिरी होईल.

क) यासाठी सुविधा व पायाभूत उभारणी आवश्यक आहे.

२. सर्व शाळा व महाविद्यालयामधून शारीरिक शिक्षण व क्रीडा सक्तीचा करावा.

३. गट व तालुका पातळीवर दोन वर्षातून एकदा क्रीडा महोत्सव घ्यावा.

४. शहरी विभागातून क्रीडामंडळे सुरू करावीत.

५. १९६० पासून सुरू असलेल्या क्रीडा प्रकारांना अभ्यासक्रमात योग्य स्थान असावे.

६. चार वर्षातून एकदा राष्ट्रीय पातळीवर क्रीडा महोत्सव घ्यावा.

७. ग्रामीण क्रीडा केंद्रे उभारावीत.

८. भारतीय खेळ व परंपरा असलेल्या क्रीडा प्रकारांना अभ्यासक्रमांत योग्य स्थान असावे.

९. निष्णात खेळाडूंचा शोध घ्यावा.

**२२) श्री. ईश्वरभाई पटेल समिती (शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम शिफारशी) (१९८१):-**

कोठारी आयोगाने भारतातील शालेय पुनर्रचनेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात १० + २ वर्षाचा बदल सुचविला. त्यात एक ते दहा वर्गासाठी अभ्यासक्रमाचा पुनर्विचार करण्यासाठी श्री. ईश्वरभाई पटेल रिव्ह्यू समिती नेमली. त्यांनी शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमास मार्गदर्शक तत्वे सुचविली आहेत. शारीरिक हालचालीतून व कृतिजन्य व्यायामप्रकारातून विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक समाधन प्राप्त व्हावे. या शिक्षणातून विविध प्रेरकास लगेच प्रतिसाद देऊन योग्य ती क्रीया करता यावी. निरनिराळया समस्या त्यांना शारीरिक व मानसिक पातळीवर उत्तर शोधून सोडविता याव्यात. शारीरिक शिक्षण व क्रीडास्पर्धा कार्यक्रमांतून शरीर स्वास्थ व शारीरिक विकास होत राहावा.

वरील समितीचा अहवाल व एन.सी.आर.टी.चा नवा दृष्टिकोण यामुळे खेळ, मनोरंजन, कला व क्रीडा या विषयाला प्राथमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेत प्रथम क्रमांकाचे अग्रस्थान मिळाले आहे.

**२३) १९८४ राष्ट्रीय क्रीडा धोरण :-**

१९८४ च्या राष्ट्रीय क्रीडा धोरणातील काही महत्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहे.

१. शैक्षणिक संस्थातील शारीरिक शिक्षणाचे स्थान अबाधीत ठेवावे.

२. उत्कृष्ट खेळाडूंचा शोध घ्यावा.

३. खेडे व तालुका पातळीवर खेळाच्या सोयी टप्प्याटप्प्याने परंतु निश्चित कालावधीमध्ये पूर्ण कराव्यात.

४. सर्व मैदाने व मोकळया जागा खेळाडूसाठी राखून ठेवाव्यात.

५. खेळाडूंच्या पोषक आहाराकडे लक्ष ठेवावे.

६. क्रीडा विद्यापीठ, क्रीडा महाविद्यालय, क्रीडा शाळा, क्रीडा वसतीगृहे स्थापन करण्यावर भर असावा व त्या ठिकाणी अनिवार्य शारीरिक शिक्षणाच्या कार्यक्रमाबरोबर विशेष क्रीडा कार्यक्रमावर भर द्यावा.

७. क्रीडा साहित्य उद्योग सुरू केले पाहीजेत.

८. उत्कृष्ट खेळाडूंना सवलती दिल्या पाहीजेत.

९. संशोधनासाठी प्रयत्न केले पाहिजे.

**२४) भारतीय क्रीडा प्राधिकरण (१९८४) :-**

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये शारीरिक शिक्षण व खेळ प्रचार व प्रसारासाठी सन १९५४ साली 'अखिल भारतीय क्रीडा परिषदेची' स्थापना करण्यात आली. त्याचेच रुपांतर म्हणजे 'भारतीय क्रीडा प्राधिकरण' होय. भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे काही प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे आहे.

अ) शास्त्रशुद्ध प्रशिक्षणासाठी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती देणे. तसेच संशोधन करणाऱ्या शिक्षण व शारीरिक शिक्षण खेळ संस्थाना अनुदान देणे इ.

ब) खेळाडू, विद्यार्थी व पालक यांच्या मध्ये खेळाविषयी व खेळात भाग घेण्याविषयीची आवड निर्माण करणे.

क) खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षण देऊन भविष्य काळात पदके मिळविण्यासाठी आवश्यक त्या सूविधा उपलब्ध करुन देणे.

**२५) राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक धोरण (१९८६) :-**

१९८६ च्या राष्ट्रीय स्तरीय शैक्षणिक धोरणातील क्रीडा व शारीरिक शिक्षण बाबतच्या काही महत्त्वाच्या शिफारशी खालील प्रमाणे आहे.

शिकण्याच्या प्रक्रियेत क्रीडा व शारीरिक शिक्षण यांना शिक्षणाचा अविभाज्य भाग मानला जावा व राष्ट्रीय स्तरावर शालेय सुधार कार्यक्रमामध्ये इमारती, खेळाची क्रीडांगणे, साहित्य, मार्गदर्शक, शारीरिक शिक्षणाचे शिक्षक यांचा समावेश असावा. सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच क्रीडा संस्था, क्रीडा वसतिगृह, क्रीडा कार्यक्रम व क्रीडाविषयक अभ्यास

यावर विशेष लक्ष ठेवावे. क्रीडा व खेळामध्ये विशेष नैपुण्य प्राप्त करणाऱ्यांना योग्य उत्तेजन दिले जावे.

**२६) एन.सी.ई.आर.टी. अभ्यासक्रम (१९८८) :-**

सन १९८८ मध्ये एन.सी.ई.आर.टी.ने प्राथमिक व माध्यमिक स्तरासाठी अभ्यासक्रम तयार केला. याचा मुख्य उद्देश राष्ट्रीय धोरणानुसार सर्व शाळांसाठी एक समान अभ्यासक्रम तयार करणे होता. या एकसमान अभ्यासक्रमानुसार आरोग्य आणि शारीरिक शिक्षण व खेळ हा शिकण्याच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग असावा. आणि त्याला कार्यक्षमतेच्या मूल्यमापनात समाविष्ट करावे. यावरुन शारीरिक शिक्षणामध्ये मानसिक व भावनिक आरोग्याचे महत्वाचे स्थान अधोरेखित होते.

**२७) उच्च स्तरीय क्रीडा नियंत्रण समिती (१९९२) :-**

खेळाडूंच्या निवड व प्रशिक्षणासाठी 'उच्च स्तरीय क्रीडा नियंत्रण समिती' स्थापन करण्यात आली होती. ज्या क्रीडा प्रकारात भारताला यश मिळण्याची अधिक शक्यता आहे. अशा क्रीडा प्रकारातील खेळाडूंची निवड करुन त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न ही समिती करणार होती.

**२८) १९९२ प्रोग्राम ऑफ ॲक्शन - कृति कार्यक्रम / १९९२ राष्ट्रीय क्रीडा धोरण :-**

१९९२ च्या कृती कार्यक्रम आणि राष्ट्रीय क्रीडा धोरणानुसार चार विभाग पाडण्यात आलेले आहेत.

**विभाग १ :**

१. क्रीडेमध्ये गुंतवणूक करण्यावर भर दिला जाईल, तो असा खाजगी व सरकारी क्षेत्रांची गुंतवणूक केली जाईल. आयात साधनावर करमाफी दिली जाईल. देशातील साधनांचे पुर्नमूल्यांकन केले जाईल.

२. संपर्क साधने (मिडीया) यांची भूमिका दिग्दर्शित केली आहे. शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ओझे कमी करून खेळ व क्रीडा यांची सुरूवात करणे यामध्ये

अ) शाळेच्या दैनंदिन वेळापत्रकात खेळ, क्रीडा व शारीरिक शिक्षण हा नियमित व सक्तीचा कार्यक्रम म्हणून राबविण्याचा प्रयत्न केला जाईल.

ब) प्रत्येक शाळेला काही मुलभूत आवश्यक साधने पुरविण्यावर भर दिला जाईल.

क) शालेय विषय शिक्षकांनासुद्धा ही जबाबदारी घेण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

ड) शाळांमध्ये या विषयासाठी काही मुलभूत सोयी पुरविण्यावर भर दिला जाईल.

**विभाग २ :**

क्रीडा व्यवस्थापन मार्गदर्शनाचा दर्जा उंचावणे.

१. खेळाडूंना सवलती दिल्या जातील, खास बक्षिसे दिली जातील.

२. भारतीय मार्गदर्शकांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातील.

**विभाग ३ :**

क्रीडेचा पाया तयार करणे.

१. मोकळया जागा ताब्यात घेण्याबाबत सूचना देण्यात येतील.

२. 'ऑपरेशन प्ले फिल्ड्स' ही क्रीडांगण धडक मोहीम सुरू केली जाईल.

३. क्रीडा मंडळाचे देशभर जाळे विणले जाईल.

४. प्राथमिक स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत स्पर्धांचे वेळापत्रक तयार केले जाईल.

५. विविध संस्थामध्ये क्रीडांगण योजना राबविण्यात येतील.

**विभाग ४ :**

स्पर्धात्मक दर्जामध्ये सुधारणा

१. खाजगी व सरकारी क्षेत्रांना प्रोत्साहन दिले जाईल.

२. आंतरराष्ट्रीय दर्जानुसार स्पर्धांचे एकत्रीकरण केले जाईल.

३. उत्कृष्ट खेळाडूंचा शोध घेतला जाईल.

४. सांघिक खेळांसाठी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना केली जाईल.

**२९) केंद्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळ (१९९३) :-**

शैक्षणिक राष्ट्रीय धोरणाच्या पुनर्रचित कार्यक्रम अंतर्गत स्थापन केलेल्या समितीने १९८६ धोरणाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी विविध बाबींवर भर देण्यासाठी सांगितले होते. त्यापैकी काही प्रमुख बाबी पुढील प्रमाणे आहे.

- ❖ अध्ययन प्रक्रियेमध्ये शारीरिक शिक्षण, खेळ व योग हे अविभाज्य भाग आहेत ते तपासावे.
- ❖ शारीरिक शिक्षण व खेळाचे कार्यक्रम राबविणारे शिक्षक व सहभागी होणारे विद्यार्थी यांना उत्तेजना मिळते किंवा नाही हे तपासणे.
- ❖ कमी खर्चाचे खेळ तसेच शाळा व महाविद्यालयातील सोयीसुविधांचा योग्य वापर होतो की नाही हे तपासणे.

शैक्षणिक राष्ट्रीय धोरणाच्या पुनर्रचित कार्यक्रमांतर्गत स्थापन केलेल्या समितीने सांगितलेल्या १९८६ धोरणाच्या उद्दीष्ट पूर्तीसाठी खालील बाबींवर भर द्यावा.

- ❖ अभ्यासक्रमाचा भार ठरवताना शारीरिक शिक्षण व खेळ यांना पुरेसा कालावधी निश्चित करावा.
- ❖ शाळेच्या सुरुवातीस व शेवटी एकत्रिकरणानंतर निदान ४५ मिनिटांचा कालावधी शारीरिक शिक्षण व योग यांना वेगळा राखीव ठेवावा.
- ❖ आठवड्यातील कमीत कमी २ तास तरी मान्य झालेल्या सांघिक खेळांसाठी शालेय वेळापत्रकात असावे.
- ❖ खेळ व क्रीडा प्रकारात चांगले नैपुण्य दाखवणाऱ्या खेळाडूंना उत्तेजन द्यावे.
- ❖ खेळ, शारीरिक शिक्षण व योग यासाठी वेगळा जास्तीचा वेळ देणाऱ्या विषय शिक्षकांना विशेष उत्तेजन द्यावे.
- ❖ प्रत्येक शाळेकडे पायाभूत साहित्याची तरतुद असावी.
- ❖ खेळ क्रीडांगणाची निर्मिती आणि सुधारणा.
- ❖ इतर विषयांचे शिक्षक जे शारीरिक शिक्षक, खेळ व योग शिकविण्याच्या दृष्टीने विशेष प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करतील त्यांना विशेष उत्तेजन द्यावे.

- ❖ शाळेतील शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकांची संख्या वाढवण्यासाठी शिक्षण भरतीचा कार्यक्रम राबविणे.
- ❖ राष्ट्रीय पातळीवर असलेल्या विशेष निवडलेल्या खेळानुसार आंतरशालेय स्पर्धांचे नियोजन करणे. तालुका, जिल्हा, राज्य आणि आंतर राज्य स्पर्धांमध्ये समन्वय असावा.
- ❖ विजयी खेळाडूंसाठी विशेष उत्तेजन देण्याची यंत्रणा राबविणे आणि विजयी शाळांना पैशाच्या स्वरुपात बक्षिस देणे.
- ❖ विद्यापीठ पातळीवर क्रीडा व सांघिक खेळ यांच्या उत्कर्षासाठी खालील गोष्टींवर भर देण्यात यावा.

अ) निवडक शाखेतील खेळाडूंना विशेष उत्तेजन द्यावे.

ब) टप्प्याटप्प्याने क्रीडा सोयी सुविधांचा विकास करणे.

क) आंतरविद्यापीठीय व आंतरमहाविद्यालयीन पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये समन्वय साधणारी यंत्रणा निर्माण करणे. (विद्यापीठ अनुदान मंडळाने या शिफारसी केलेल्या आहेत.)

**३०) राष्ट्रीय क्रीडा धोरण -२००१ :-**

आतापर्यंत झालेल्या क्रीडा धोरणांचा सकारात्मक विचार करुन तसेच देशातील क्रीडा विकास डोळयासमोर ठेवून २००१ च्या धोरणात क्रीडा विकासाकरिता विविध महत्त्वाच्या बाबींचा समावेश करण्यात आला होता. त्यापैकी काही प्रमुख बाबी पुढील प्रमाणे आहे.

**❖ क्रीडा व शारीरिक शिक्षणाच्या भरभक्कम पायाची सुरुवात –**

राज्य पातळीवर, केंद्र सरकारच्या मदतीने क्रीडा नैपुण्य प्राप्त करु शकणाऱ्या सुप्त गुण/चमक असलेल्या खेळाडूंचा शोध विविध राज्यातून सुरु झाला. क्रीडामधील सामुहिक सहभागाला स्पर्धेच्या माध्यमातून विविध क्रीडा संघटनांमार्फत सुरुवात झाली.

**❖ शिक्षण आणि शारीरिक शिक्षण यांच्यातील एकात्मता -**

शारीरिक शिक्षण हा अनिवार्य विषय म्हणून शालेय माध्यमिक स्तरावर त्याला मान्यता मिळाली. त्या बरोबरच गुणदान पद्धतीची सुरुवात झाली. 'सुदृढ भारत' ही कल्पना मुळ धरु लागली.

❖ **सोयी सुविधांचा विकास -**

सर्व देशात नवीन सोयी सुविधांची निर्मिती, उपलब्ध सुविधांचा वैधानिक उपयोग शैक्षणिक संस्था आणि इतर सर्वांनी करावा.

❖ **अतिउत्तम खेळाचा पाठपुरावा -**

राष्ट्रीय स्तरावरील कार्यमान, खेळाची प्रसिद्धी व खेळाडूंची अंतर्गत क्षमता यांना प्राधान्य देवून वेगवेगळया खेळातील शाखांच्या विकासातून अतिउत्तम कार्यमान प्राप्त करणे.

❖ **खेळांच्या राष्ट्रीय संघटना -**

या संघटनांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणे. नजिकच्या व दुरगामी विकासासाठी वेळेचे बंधन घालून या संघटनांमधील व्यवहारामध्ये पारदर्शकता, व्यावसायिकता आणणे आणि केलेल्या कामाचा आढावा घेणे.

❖ **खेळाडूंसाठी शास्त्रीय पाया -**

विविध शास्त्रांमधील लागलेले शोध, झालेले संशोधन, यांचा उपयोग विविध खेळांच्या शाखांमधील खेळाडूंच्या नैपुण्यासाठी करुन घेणे.

❖ **क्रीडा साहित्य -**

उत्कृष्ट दर्जाचे क्रीडा साहित्य खेळाडूंना परदेशातून आयात करण्याची परवानगी देणे किंवा देशातच त्याचे उत्पादन करणे.

❖ **प्रशिक्षण आणि विकास -**

मार्गदर्शक, क्रीडा शास्त्रज्ञ, पंच, सामना अधिकारी यांच्या विकासांसाठी सेमिनार, कार्यशाळा, विद्वतसभा, चर्चासत्र, छोट्या कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम आणि नियमांच्या उजळणीसाठी क्लिनिक्स आयोजित करणे. याद्वारे देशातील सर्व क्रीडा संघटकांचा दर्जा उंचावणे.

❖ **क्रीडा व्यक्तिंना उत्तेजन -**

आर्थिक सुरक्षितता, सामाजिक ओळख, बक्षिसे, सन्मान, नोकरीची उपलब्धता इ. बाबींचा मार्गदर्शक, सामना अधिकारी, पंच यांच्यातील कौशल्यांना आणि अनुभवाला उत्तेजना देण्यासाठी वापर करणे.

❖ **क्रीडा व पर्यटन -**

क्रीडेच्या माध्यमातून पर्यटकांची संख्या वाढवणे जेणे करुन खेळासाठी निधी उपलब्ध होण्यास मदत होईल.

❖ **क्रीडेसाठी प्रसिद्धी व पैसा उपलब्ध करणे -**

विविध प्रकारच्या मोठ्या कंपन्यांचा समन्वयातून राष्ट्रीय स्तरावर विकास निधी उपलब्ध करुन देणे व प्रसिद्धीसाठी दूरदर्शन, आकाशवाणी यांचे हक्क विकत घेणे.

❖ **प्रसिद्धी माध्यम -**

विविध खेळांची आवड आणि प्रसिद्धी निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय पातळीवर वेगवेगळया दूरदर्शनच्या वाहिन्यांच्या मदतीने करणे.

❖ **जागतिकीकरण -**

मैत्रीच्या पातळीवर विविध गोष्टींची देवाण घेवाण करणे. त्यामध्ये क्रीडा तंत्रज्ञान, शास्त्रीय आधार, सोयी सुविधांचा विकास समाविष्ट आहे.

**३१) सर्वसमावेशक क्रीडा धोरण - २००७ (मसुदा) :-**

सन २००७ चे क्रीडा धोरण शारीरिक शिक्षण व खेळाचा वैयक्तिक विकास विशेषतः युवक विकास, समुह विकास, आरोग्य व कल्याण, आर्थिक विकास, शिक्षण आणि मनोरंजन यामध्ये पूर्णपणे योगदान ओळखतो. तसेच जागतिक शांतता व बंधुत्वाला प्रोत्साहन देतो. या धोरणामध्ये भारतातील खेळ रचनेला अधिक प्रभावी करण्यावर जोर देण्यात आला आहे.

सर्व समावेश क्रीडा धोरणामध्ये पुढील बाबींवर/घटकांबाबत माहिती देण्यात आली आहे.

१. सर्वांसाठी खेळ.
२. शैक्षणिक संस्थामध्ये सार्वत्रिक क्रीडा सुविधा.
३. ग्रामीण भागात क्रीडा सुविधा.
४. शहरी भागात क्रीडा सुविधा.
५. खेळ संस्कृती आणि स्पर्धेकरीता मोठ्याप्रमाणात सहभाग.
६. खेळ फायद्यांचे समर्थन.

७. देशी खेळांना प्रोत्साहन.

८. तरुण मुली आणि स्त्रियांमध्ये खेळाला प्रोत्साहान.

९. अपंग व्यक्तीकरीता खेळ.

१०. जेष्ठ नागरिकांसाठी खेळ व शारीरिक शिक्षण, राष्ट्रीय शारीरिक क्षमता कार्यक्रम.

**३२) भारतीय राष्ट्रीय क्रीडा विकास कोड - २०११ :-**

क्रीडा व खेळ हा मानव संसाधन विकासाचा आवश्यक भाग आहे. भारत सरकार खेळाचा विकास आणि खेळातील सर्वोत्कृष्टता यांना सर्वात जास्त महत्व देतो. खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध संस्थांच्या लोकांमध्ये प्रभावी समन्वयासाठी प्रभावी कार्यपद्धती तयार करीत आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी प्राप्त करण्यासाठी खेळाडूंना आवश्यक पायाभूत सूविधा, प्रशिक्षण आणि इतर सुविधा देण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे.

भारत सरकारने क्रीडा विकासाबाबत आणि राष्ट्रीय खेळ संघटना यांना वेळोवेळी जारी केलेले विविध आदेश/परिपत्रके हे राष्ट्रीय क्रीडा विकास कोड २०११ या अंतर्गत एकत्रित करण्यात येत आहे.

भारतीय क्रीडा विकास कोड २०११ चे मुख्य उद्दीष्ट पुढील प्रमाणे आहेत.

१. खेळाची वाढ व विकास करणाऱ्या विविध सस्थांच्या जवाबदारी परिभाषित करणे.

२. मार्गदर्शक तत्वांच्या आधारे पात्र राष्ट्रीय खेळ संघटनांना ओळखणे, त्यांना प्राधान्यक्रम देणे आणि सरकारचे प्रायोजकत्व आणि मदत देण्यासाठी संघटनांना योग्य प्रक्रीयेची माहिती देणे.

३. सरकारची मान्यता आणि अनुदान प्राप्त करण्यासंबंधित पात्रतेच्या अटी विषद करणे.

वरील भारतातील क्रीडा व शारीरिक शिक्षणातील इतिहास बघितल्यानंतर असे दिसून येते की, क्रीडा व शारीरिक शिक्षणाच्या विकासाकरिता भारतामध्ये अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या. तसेच राष्ट्रीय क्रीडा धोरणाच्या माध्यमातूनही विविध क्रीडा विकासाच्या योजना

राबविण्यात आलेल्या आहेत. परंतु या योजना जागतिक पातळीवर भारताला अपेक्षित यश प्राप्त करुन देण्यास असमर्थ ठरत आहेत. म्हणून खेळाडूंसाठी आणखी विविध प्रभावी प्रोत्साहनात्मक योजना लागू करण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

भारताप्रमाणेच महाराष्ट्रामध्ये सुद्धा क्रीडा व शारीरिक शिक्षणाच्या विकासाकरीता विविध समित्या स्थापन करण्यात आल्या तसेच विविध योजना राबविण्यात आलेल्या आहेत. त्या सर्व योजना व समित्यांचा तसेच महाराष्ट्रातील क्रीडा व शारीरिक शिक्षणाच्या इतिहासाविषयीची माहिती पुढील प्रमाणे बघू या.

**१.६ महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरूप :-**

शारीरिक शिक्षण हे महाराष्ट्रात सर्व शिक्षणाचे अविभाज्य अंग मानले जाते. शारीरिक शिक्षणास शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त होण्यापूर्वी स्वातंत्र्य पूर्व काळापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजपर्यंतच्या कालावधीत शारीरिक शिक्षण कोण-कोणत्या संक्रमणावस्थेतून गेले. याची माहितीपुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

**अ) स्वातंत्र्य पूर्वकाळ :-**

- **इ.स. १८५५ ते १८८१ चा काळ :-**

शारीरिक शिक्षणाचा धोरणात्मक विचार इ.स.१८६६ मध्ये सरकारी पातळीवर कारपेंटर नावाच्या एका शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्याच्या सूचनेवरून प्रथमच झाला. त्यांच्या प्रयत्नामुळे शाळेतून कवायत, कसरतीचा व्यायाम, शाळांना अनुदान देण्याचा विचार प्रथम झाला.

- **इ.स. १८८२ ते १९११ चा काळ :-**

शैक्षणिक सुधारणा कोणत्या स्वरूपाच्या असाव्यात यावर शिफारशी करण्याकरिता सरकारने नेमलेल्या इंडियन एज्युकेशन कमिशनने भारतीय खेळ, व्यायाम व कवायतीचे शिक्षण देण्याची व्यवस्था प्रत्येक शाळेतून व्हावी असे सूचविले. इ.स. १८९४ मध्ये सक्तीच्या शारीरिक शिक्षणाचा प्रस्ताव प्रथमच सरकारकडून शाळा व महाविद्यालयांच्या प्रमुखांकडे पाठविण्यात आला.

➢ **इ.स. १९१२ ते १९३६ चा काळ :-**

इ.स. १९२५ मध्ये एफ. वेबर यांनी त्या वेळच्या मुंबई प्रांतात ठिकठिकाणी शिक्षकांकरिता शारीरिक शिक्षणाच्या प्रशिक्षणाचे वर्ग चालविले. त्याचबरोबर इ.स. १९२७ मध्ये मुंबई सरकारने के. एम. मुन्शी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण संस्थांतून शारीरिक शिक्षणाचा विकास कसा करावा याबाबत योजना तयार करण्यासाठी एक समिती नेमली. इ.स. १९२८ ह्या कालावधित पुणे येथील महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरीता सक्तीच्या शारीरिक शिक्षणाची जी योजना प्रयोगाखातर त्या वेळच्या मुंबई विद्यापीठाने सुरू केली त्याचा उल्लेख करणे जरूरी आहे. अशा रितीने शारीरिक शिक्षणाचे शिक्षकांना प्रशिक्षण व महाविद्यालयीन विद्यार्थ्यास शारीरिक शिक्षण ह्या दोन नवीन योजना त्या काळात सुरू झाल्या. त्याशिवाय इ.स. १९२७ मध्येच महाराष्ट्रामध्ये देशी खेळांना प्राधान्याने चालना देण्याकरिता 'अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळ' नावाची संस्था स्थापन केली.

➢ **इ.स. १९३७ ते १९४७ चा काळ :-**

इ.स. १९३८ मध्ये राज्यातील शारीरिक शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व कार्यकर्ते यांनी शारीरिक शिक्षणाच्या विकासाकरिता एक सल्लागार मंडळ नेमले. व्यायाम शाळांना मान्यता देऊन या संस्थांकरिता अनुदान पद्धतीही सुरू केली. अशा रितीने इ.स.१९३८ मध्ये शारीरिक शिक्षणाच्या इतिहासात अत्यंत प्रगतीशील पाऊल उचलले.

यानंतर शारीरिक शिक्षण क्षेत्रात झालेल्या कार्याचा आढावा घेऊन पुढे पाऊले कशी उचलायची या बाबत शासनास सल्ला देण्यासाठी पुन्हा इ.स. १९४५ मध्ये एक चौकशी समिती नेमण्यात आली.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वी विसाव्या शतकातील कालखंडात खाजगी व्यायाम शाळा, व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे व क्रीडा संघ यांनी शारीरिक शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात प्रचार व प्रसार करण्याचे काम जिद्दीने केले. अशा संस्थांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रातील युवकांत तसेच प्रौढ वर्गातील

जनतेत त्या क्षेत्रातील अनेक उपक्रमाबद्दल आवड उत्पन्न होऊन महाराष्ट्रात शारीरिक शिक्षणास पोषक असे वातावरण निर्माण झाले.

अशा रीतीने खाजगी संस्थांच्या पुढाकाराने राज्यात भारतीय तसेच पाश्चिमात्य व्यायाम प्रकार, क्रीडा व खेळ यांचा विकास मोठ्या उत्साहाने होत गेला. महाराष्ट्राची शारीरिक शिक्षणाची परंपरा टिकवून शारीरिक शिक्षण आणि क्रीडा प्रकारास पोषक असे वातावरण महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळातच निर्माण झाले असे म्हणावयास हरकत नाही.

**ब) स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा काळ :-**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महाराष्ट्रात शिक्षण व शारीरिक शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करण्यास सुरुवात झाली. बौद्धिक विकासाबरोबरच समाजसेवा, मोकळया वेळेचा सदुपयोग, राष्ट्र संरक्षणाचे शिक्षण, राष्ट्रीय उत्पादनाकरिता लागणारी बौद्धिक व शारीरिक क्षमता इ. उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून शिक्षण व शारीरिक शिक्षणाची पुनर्रचना करण्यात आली. आणि त्याद्वारे शारीरिक, बौद्धिक, मानसिक, सामाजिक व नैतिक विकास साधून बालकांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्वाचा विकास करुन आदर्श नागरिक बनविण्याच्या दृष्टिने शारीरिक शिक्षण व खेळ कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

**क) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर क्रीडा क्षेत्राचा विकास करणे व क्रीडा नैपुण्याचा दर्जा वाढविणे या प्रश्नांचा विचार राष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात सातत्याने होऊ लागला. अखिल भारतीय क्रीडा परिषदेची स्थापना प्रथम १९५४ मध्ये झाली. त्या परिषदेच्या शिफारशीनुसार भारतातील निरनिराळया राज्यात राज्य क्रीडा परिषदा स्थापन करण्यात आल्या. महाराष्ट्रात राज्य क्रीडा परिषदेची स्थापना प्रथम १९५७ मध्ये झाली.

महाराष्ट्र सरकारने सन १९६२ मध्ये श्री. भिसे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने राज्याच्या शिक्षणाच्या प्रगतीच्या हेतूने अनेक शिफारशी प्रस्तुत केल्या, त्यातील एक शिफारस ही होती की, शारीरिक शिक्षणाची परीक्षा घेतली जावी आणि या

विषयाच्या तासिकेत वृद्धी करावयास हवी. सन १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत या तासिकांवर भर देण्यात आला आहे. या राष्ट्रीय शिक्षण योजनेच्या 'प्रोग्राम ऑफ ॲक्शन'मध्ये माध्यमिक शालेय स्तरावर रोज कमीत कमी एक शारीरिक शिक्षणाची तासिका असावी असे सांगितले आहे.

महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण, क्रीडा आणि युवक विकासाचे कार्य स्वातंत्र्योत्तर काळात इतक्या मोठ्या प्रमाणात वाढले की, शासनास या कार्याचा व्याप सुव्यवस्थीतपणे सांभाळण्याकरिता इ.स. १९७० मध्ये स्वतंत्र क्रीडा व युवक सेवा विभाग आणि संचालनालय स्थापन करावे लागले.

इ.स. १९७० मध्ये महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरण विषयक निवेदनात शारीरिक शिक्षण हे शिक्षणाचा अविभाज्य घटक मानला गेला आहे. तेव्हा शासनाने शैक्षणिक पुनर्रचनेच्या धोरण विषयक निवेदनात शारीरिक शिक्षणाच्या परीक्षेची आवश्यकता व महत्व या विषयी काही मुद्दे मान्य केले होते. ते खालीलप्रमाणे आहेत :-

१) माध्यमिक शाळांच्या सुधारीत अभ्यासक्रमामध्ये शारीरिक शिक्षण हा आवश्यक विषय राहील.

२) शारीरिक शिक्षणाची परीक्षा इतर वर्गाच्या विषयांबरोबर शाळांच्या वार्षिक परीक्षेत घ्यावी लागेल.

३) माध्यमिक शाळांतील शारीरिक शिक्षणाच्या परीक्षेचे स्वरूप निश्चित ठरविणे ही आजची गरज आहे.

४) शारीरिक शिक्षणाची परीक्षा पद्धती निर्दोष असणे आवश्यक आहे.

५) शारीरिक शिक्षणाच्या वस्तुनिष्ठ कसोट्या तयार करून शारीरीक शिक्षणाची परीक्षा सुरू केली तर विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीचे मूल्यमापन करता येईल. शिवाय पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीची कल्पना देणारे एकमेव साधन म्हणजे परीक्षा होय असेही सिद्ध झाले आहे. म्हणून विद्यार्थ्यांना शारीरिक सुदृढता, क्षमता, कौशल्य, नेतृत्व इत्यादी बाबींबद्दल स्पष्ट कल्पना येण्यासाठी शारीरिक शिक्षणाची

वार्षिक परीक्षा ही अनिवार्य ठरली आहे. यावरून शारीरिक शिक्षणाच्या परीक्षेची गरज व महत्व लक्षात येते. तसेच परीक्षेशिवाय शारीरिक शिक्षण विषयास महत्व प्राप्त होणार नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शारीरिक शिक्षण शिक्षक महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्याम निंबेकर यांनी शारीरिक शिक्षण विषयासाठी परीक्षेचे महत्व विषद करतांना, 'शालांत परीक्षेत शारीरिक शिक्षण विषयाच्या परीक्षेचा अंतर्भाव केल्याशिवाय शारीरिक शिक्षण विषयाला भवितव्य नाही' या मथळयाखाली म्हटले आहे, ''शारीरिक शिक्षण हे अध्ययन प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक मानले गेले आहे. म्हणून इतर विषयांबरोबर याही विषयाची परीक्षा राज्य शिक्षण मंडळाने लेखी व प्रात्याक्षिक स्वरूपात घ्यावी असा गेल्या २० वर्षापासून महामंडळाने आग्रह धरला होता. परंतु शारीरिक शिक्षण या विषयाची प्रात्याक्षिक परीक्षा ही बाब संबंधितांना अडचणीची वाटत असल्याने शालांत परीक्षेत शारीरिक शिक्षणाची परीक्षा न ठेवता ती शाळांतर्गत असावी व संबंधित शिक्षकाने विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून ५० पैकी गुण प्रदान करावेत असे मत मांडण्यात आले. परंतु आरोग्य शिक्षण व शारीरिक शिक्षण या विषयांतर्गत बाबींवर ५० गुणांची लेखी परीक्षा घेणे राज्य शिक्षण मंडळाला अडचणीचे जाणार नाही असे मत मांडण्यात आले. त्यामुळे मंडळाने ती परीक्षा घ्यावी आणि या लेखी परीक्षेत मिळालेले गुण संबंधित शाळेचे विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापनावर पाठविलेले गुण शालांत परीक्षेच्या गुणपत्रकात अंतर्भूत करण्यात यावेत. या व्यवस्थेमुळे शारीरिक शिक्षण विषयाला एक महत्त्वपूर्ण दर्जा प्राप्त होईल.

महाराष्ट्रातील ह्या सर्व अहवालांच्या ओघाने तसेच महाराष्ट्रातील शिक्षण तज्ञ व शारीरिक शिक्षण कार्यकर्त्यांच्या मदतीने प्रगतीशील १९९६ चे क्रीडा धोरण आखले गेले.

## ड) महाराष्ट्र राज्यातील क्रीडा धोरणे :-

### ➢ महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६ :-

१९८४ चे राष्ट्रीय क्रीडा धोरण व १९९२ चा कृती कार्यक्रम या केंद्र शासनाच्या क्रीडा प्रकल्पाचा अभ्यास करून तसेच इतर राज्यांच्या क्रीडा धोरणाचा अभ्यास करून महाराष्ट्राचे हे नवे क्रीडा धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. 'खेळाडू' हा केंद्र बिंदू मानून संपूर्ण धोरणाचा रोख मुख्यत्वे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविणे असा होता. एकूण ९ वैशिष्ट्यांचा आंतर्भाव असलेल्या या क्रीडा धोरणात क्रीडा विकासासाठी विविध योजना पुढीलप्रमाणे सूचविल्या आहेत.

१) क्रीडा हा शालेय अभ्यासक्रमाचा आवश्यक, अंगभूत व अविभाज्य भाग करण्यात येईल.

२) राज्याचे क्रीडा धोरण प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी इ.स. २००० पर्यंतचा कालावधी निश्चित करण्यात येत आहे.

३) राज्यातील खासगी व सार्वजनिक उद्योग, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद व सहकारी संस्था यांच्याद्वारे खेळ किंवा संघ दत्तक योजना राबविण्यात येईल.

४) सध्या अस्तित्वात असलेल्या विविध शासकीय योजनांचा सखोल अभ्यास करून त्यामध्ये सुधारणा करणे व काही नवीन योजना अंमलात आणणे याविषयी कार्यवाही करण्यात येईल.

५) तालुक्यात असलेली क्रीडा परंपरा, उपलब्ध साधन सुविधा यांचा अभ्यास करून जिल्हा क्रीडा समितीद्वारा तालुका क्रीडा कृती आराखडा तयार करण्यात येईल व तो टप्प्याटप्प्याने अंमलात आणला जाईल.

६) क्रीडा प्रशिक्षणासाठी आता तालुका हा घटक निश्चित करण्यात येईल व त्यानुसार टप्प्याटप्प्याने तालुका पातळीवर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकांची उपलब्धता व तालुका क्रीडा कार्यालयांची स्थापना करण्यात येईल.

७) राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यासाठी उपाययोजना करण्यात येईल.

८) क्रीडांगणावर होणारे वाढते अतिक्रमण रोखण्यासाठी आवश्यक ते अधिनियम कार्यान्वित करण्यात येईल.

९) क्रीडा विद्यापीठ संकल्पनेची पूर्तता करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६ नुसार शालेय स्तरावर क्रीडा व शारीरिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी-

संपूर्ण क्रीडा धोरणात 'क्रीडा' हा शालेय अभ्यासक्रमाचा आवश्यक, अंगभूत व अविभाज्य भाग करण्यासाठी महत्त्वाच्या योजना सूचविल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख योजना पुढील प्रमाणे आहे.

१) विशेष रूची व प्राविण्य दाखविणाऱ्या ग्रामीण व डोंगरी आदिवासी विद्यार्थ्यांची (८ ते १४ वयोगट) क्रीडा प्रबोधिनीसाठी निवड करण्यात येईल.

२) इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी छात्र सेनेचे शिक्षण आवश्यक करण्यात आले आहे. इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना हा कार्यक्रम सक्तीचा नाही.

३) प्राथमिक स्तरावर इ. १ ली ते ४ थी साठी शारीरिक शिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येईल व स्पर्धांचे आयोजन तात्काळ सुरू करण्यात येईल.

४) प्राविण्य मिळविणाऱ्या शाळांना क्रीडा साहित्य विकत घेण्यासाठी, क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक मदत करण्यात येईल.

५) मुख्याध्यापक, इतर शिक्षक, तपासणी अधिकारी यांचे नियमित उजळणी वर्ग आयोजित करण्यात येईल.

६) योग प्रशिक्षण प्राथमिक स्तरापासून सुरू करण्यात येईल. प्रशिक्षण अत्यावश्यक करण्यात येईल.

७) उन्हाळी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातील.

८) २५० विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक शिक्षण शिक्षक हे तत्त्व १०० टक्के अंमलात आणण्यात येईल.

**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६ नुसार क्रीडा संस्कृतीची जोपासनाः-**

सर्वांसाठी शारीरिक शिक्षण व निवडक मुला-मुलींसाठी खेळ हे तत्त्व अंमलात आणण्यासाठी राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना अत्यंत आवश्यक ठरते. पालकांनी आपल्या पाल्यांना खेळाकडे वळविण्यासाठी तसेच लहान वयातील उपजत क्रीडा गुण असणाऱ्या मुला-मुलींना खेळांकडे आकृष्ट करण्यासाठी प्रोत्साहीत करणे व सवलती देणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने क्रीडा विद्यापीठ समितीने आपल्या अहवालात ''क्रीडा संस्कृतीची जोपासना'' या प्रकरणाद्वारे अनेक उपयुक्त शिफारशी केल्या आहेत व राज्य शासनाने त्याला तत्त्वतः मान्यता दिली आहे.

क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढीसाठी १९९६ च्या क्रीडा धोरणामध्ये विविध उपाययोजना करण्यात येणार होत्या. त्यापैकी काही उपाय योजना पुढील प्रमाणे आहे.

१. व्यावसायिक प्रशिक्षणाच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमात राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंना थेट प्रवेश देण्यात येईल.

२. पूर्व माध्यमिक व माध्यमिक शालेय स्तरावरील खेळाडूंना खेळामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी खालील सवलती देण्यात येईल.

अ) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू परीक्षेत नापास झाला असल्यास त्यास ग्रेस मार्क देण्याची सवलत शिक्षण विभागाकडून देण्यात येते. या खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीच्या मानाने ही सवलत अत्यंत तुटपूंजी आहे. त्याऐवजी राज्य व राष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्या सर्व खेळाडूंना एकूण टक्केवारीत ५ टक्के अधिकचे गुण देण्यात यावेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा खेळाकडे कल वाढेल.

ब) क्रीडा प्रशिक्षण व स्पर्धा यामुळे झालेली अनुपस्थिती नियमित करून प्रसंगी ती भरून काढण्यासाठी अतिरिक्त तासिका व प्रायोगिक अभ्यास घेण्यात येईल.

क) प्रशिक्षण व स्पर्धा जर परीक्षेच्या कालावधीत घेण्यात आल्या असतील तर त्यामुळे झालेली परीक्षेतील अनुपस्थिती नियमित करून खेळाडूंना पुढच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल व आवश्यकता वाटल्यास त्यांच्यासाठी वेगळी परीक्षा घेण्यात येईल.

३. खेळाडूंसाठी शासकीय सेवेत आरक्षण ठेवण्यात येईल.

४. श्री शिवछत्रपती, दादोजी कोंडदेव, अर्जून व द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्यांना सर्व खेळाडूंना महाराष्ट्रात प्रवास करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून विनामूल्य प्रवास सवलत योजना सुरू करण्यात येईल.

५. राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक विजेत्या खेळाडूंसाठी निवृत्तीवेतन योजना व विमा योजना सुरू करण्यात येईल.

६. क्रीडा सामुग्रीच्या उत्पादनाच्या अभ्यासक्रमाची सोय, क्रीडा व्यवस्थापन, क्रीडा वैद्यकशास्त्र व क्रीडा पत्रकारितेसाठी अल्प कालावधीचे पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल.

७. क्रीडा मानद प्रशिक्षक नेमताना स्वतःचा व्यवसाय/नोकरी सांभाळून क्रीडा प्रशिक्षणाचे काम पाहण्यास मुभा राहील.

८. विदेशी प्रशिक्षकांची नेमणूक किंवा मार्गदर्शनपर दौरे प्रशिक्षकांना परदेशात पाठवून क्रीडा प्रशिक्षण देण्यात येईल.

९. प्रसार माध्यमांद्वारे क्रीडेचा प्रसार व प्रचार करण्यासाठी योजना तयार करण्यात येईल.

१०. आधुनिक क्रीडा साधने व विविध कृत्रिम क्रीडांगणे याबाबत केंद्र शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त फायदा राज्य शासनाकडून घेण्याच्या दृष्टीने क्रीडा साधने व कृत्रिम हिरवळीसाठी केंद्र शासनाच्या उपलब्ध योजनेद्वारे स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना यांना पुरविण्यासाठी एक योजना तयार करण्यात येईल.

११. आर्थिक दृष्टीने सक्षम नसलेल्या क्रीडा संस्था, क्रीडा मंडळे, क्लब अशा संस्थांना मदत करण्याबद्दल मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात येतील.

१२. विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी व त्यानंतर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अद्ययावत क्रीडा सामुग्रीसह क्रीडा संकूल उभारून अद्ययावत क्रीडा सामुग्री, दृकश्राव्य उपकरणे, ध्वनी व चित्रफिती, ग्रंथालय, नियतकालिके प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील.

१३. संघटनांच्या कार्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी उपाययोजना करण्यात येईल.

१४. प्रत्येक विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी क्रीडा उपसंचालकांची कार्यालये कार्यान्वित करण्यात येईल.

१५. महाराष्ट्रातील खेळ परंपरेचा प्रसार व प्रचार इतर राज्यांत व इतर देशात करण्यात येईल.

१६. ''राज्य क्रीडा निधीची'' स्थापना करण्यात येईल.

१७. मराठी भाषेत क्रीडा वाङ्मयाच्या निर्मितीवर भर देण्यात येईल.

१८. योग प्रशिक्षणावर प्राथमिक शाळेपासूनच भर देण्यात येईल.

१९. प्राथमिक तथा माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाची गोडी लागावी यादृष्टीने वेळापत्रकातील प्रत्येक आठवड्यातील किमान अर्धा दिवस मैदानावरील खेळासाठी राखून ठेवण्यात येईल.

२०. उन्हाळी प्रशिक्षण शिबिर घेण्यात येईल.

२१. स्वर्गीय पहेलवान खाशाबा जाधव यांनी केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून त्यांच्या नावाने भव्य प्रमाणात एक कुस्ती स्पर्धा सुरू करण्यात येईल.

२२. क्रीडा साहित्यावर ऑक्ट्रॉय संपूर्णपणे माफ करण्यात येईल.

२३.स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत आमदार निधीत व्यायामशाळा बांधकामासाठीचा खर्च व व्यायामसाहित्य विकत घेण्याचा खर्च यांचा अंतर्भाव त्यात करण्यात येईल.

२४. अखिल भारतीय स्तरावर महिला व पुरुष यांच्यासाठी वेगवेगळया शिवशाही चषक कबड्डी स्पर्धा घेण्यात येतील.

- **महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २००१ :-**

''बळकट शरीरात बळकट मन'' (Sound Mind in Sound body) या उक्तीप्रमाणे तंदुरूस्ती आणि क्रीडा याचे मानवी जीवनात अपार महत्व आहे. आजची जीवनशैली, वाढते ताणतणाव व अनारोग्य पाहता शारीरिक तंदुरूस्ती आणि आरोग्य संपन्न जीवन नागरिकांना जगता यावे यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्वांसाठी खेळाद्वारे सुदृढता (Fitness for All through Sports) म्हणजेच आबालवृद्ध नागरिकांमध्ये खेळाद्वारे शारीरिक सुदृढता आणि याद्वारे आरोग्य संपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्व बिंबविणे हा दृष्टिकोन लक्षात घेऊन बालक, तरूण, प्रौढ, ज्येष्ठ नागरिक व अपंग या सर्वांचा क्रीडा धोरणामध्ये विचार करण्यात आला आहे. या क्रीडा धोरणांतर्गत क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन, गाव तेथे क्रीडांगण, क्रीडापीठ संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी, राज्य क्रीडा विकास निधी इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा क्रीडा धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ नुसार क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन-**

खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता (Fitness for All through Sports) : आबालवृद्ध नागरिकांमध्ये शारीरिक सुदृढता आणि याद्वारे आरोग्यसंपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम हाती घेण्यात येईल. सबब, सर्वांसाठी सुदृढता व त्याद्वारे आरोग्यसंपन्न व कार्यक्षम जीवन ही काळाची गरज आहे. याकरिता बालक, तरूणवर्ग, प्रौढवर्ग, जेष्ठ नागरिक आणि अपंग वर्गासाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतील. त्याचप्रमाणे शालेय, आंतरमहाविद्यालय क्रीडा स्पर्धाबरोबरच काळाच्या ओघात महाराष्ट्राचे पारंपारिक खेळ नष्ट होऊ नयेत याकरिता या खेळांना प्राधान्य देण्यासाठी आणि या खेळांची परंपरा जतन करण्यासाठी व नागरिकांनी या खेळात उत्स्फूर्त सहभागी होण्याच्या दृष्टीने राज्यात लेझीम, आट्यापाट्या, मल्लखांब इत्यादी खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येतील.

**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ नुसार शालेय स्तरावर क्रीडा व शारीरिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी :-**

क्रीडा हा शालेय अभ्यासक्रमाचा आवश्यक, अंगभूत व अविभाज्य भाग करण्याबाबत शासनाने यापूर्वी आदेश निर्गमित केले होते. शारीरिक तंदुरूस्ती हा विद्यार्थ्यांच्या सर्व क्षेत्रातील अग्रेसरत्वाचा मूलभूत पाया आहे. शारीरिक तंदुरूस्तीशिवाय जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात आपण उज्वल कामगिरी बजावू शकत नाही. ही बाब लक्षात घेऊन या धोरणाची ठोस अंमलबजावणीकरिता राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनेपैकी काही महत्त्वाच्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

१. इयत्ता पहिली ते आठवीपासून शारीरिक शिक्षण व खेळाच्या वेळापत्रकात दररोज १ तासिका उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

२. सध्या शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात एकूण १० टक्के तासिका शारीरिक शिक्षण व खेळासाठी आहेत, त्याऐवजी १५ टक्के करून दररोज एक तासिका या विषयासाठी वेळापत्रकात ठेवण्यात येईल व याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येईल.

३. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक खेळाच्या स्पर्धेत भाग घ्यावा अशी उपाययोजना करण्यात येईल.

४. इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांची क्रीडा/शारीरिक शिक्षणविषयक परीक्षा घेऊन गुण देण्याबाबत व या गुणांचा त्यांच्या वार्षिक गुणपत्रिकेत अंतर्भाव करण्याबाबत उपाययोजना करण्यात येईल.

५. महिन्यातून एकदा आठवड्याच्या शेवटच्या दिवशी, अर्ध्या दिवसाच्या शाळेनंतर ''क्रीडादिन'' साजरा करण्यात येईल व त्यादिवशी आंतरकूल (आंतरवर्गीय) स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल, ज्याद्वारे शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यास किमान एका खेळात सहभागी होता येईल.

६. शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये सर्व शाळांचा तालुका/शहर क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग सक्तीचा करण्यात येईल.

७. माध्यमिक शाळेतील तज्ञ क्रीडा शिक्षकांद्वारे आठवड्यातून एक किंवा दोन दिवस परिसरातील शाळेच्या विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येतील.

८. तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर शिक्षकांसाठी क्रीडा स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येतील.

९. शारीरिक शिक्षण व खेळ या विषयाचे मार्गदर्शन वर्ग प्राथमिक शिक्षकांसाठी नियमितपणे आयोजित करण्यात येईल.

१०. २५० विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक शिक्षण शिक्षक नियुक्त करण्यात यावा असे १९९६ च्या क्रीडा धोरणामध्ये नमूद करण्यात आले आहे, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

➢ **महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २०१२ :-**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे, नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी, राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंचा गौरव, दर्जेदार क्रीडा सूविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी हितावह योजना राज्यात राबविण्यासाठी क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आलेले आहे.

आतापर्यंत झालेल्या क्रीडा धोरणांचा विचार करुन तसेच महाराष्ट्रातील क्रीडा विकास डोळयांसमोर ठेवून २०१२ च्या क्रीडा धोरणात राज्यातील क्रीडा विकासासाठी विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी खेळाडूंना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन, सवलती व गौरव याविषयीची ठळक माहिती पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

**१. क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती.**

१.१ क्रीडांगणांचे आरक्षण करणे.

१.२ क्रीडा साहित्य अनुदान देणे.

१.३ राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे.

१.४ तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे.

१.५ विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकूल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल, दुरूस्ती व वाणिज्य प्रयोजन करणे.

१.६ आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडा विषयक उपक्रमासाठी सहाय्य करणे.

१.७ राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना करणे.

१.८ क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे.

**२. आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य.**

२.१ क्रीडा प्रबोधिनी स्थापना करणे.

२.२ अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना करणे.

२.३ आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना करणे.

२.४ राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करणे.

२.५ तालुका, जिल्हा व राज्य क्रीडा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करणे.

**३. खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती  गौरव.**

३.१ खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव देणे.

३.२ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.

३.३ क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहीत करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी देणे.

३.४ खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य करणे.

३.५ आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती देणे.

३.६ वयोवृद्ध खेळाडू मानधनात वाढ करणे.

३.७ कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ करणे.

३.८ खेळाडूंसाठी गौरव, प्रोत्साहन व बक्षिसे देणे.

३.९ आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.

३.१० आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क इ. करिता आर्थिक मदत करणे.

३.११ क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू, कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलती, पुरस्कार नियमावलीत बदल करणे.

३.१२ नागपूर येथील आमदार निवास कक्षाचे हिवाळी अधिवेशन वगळता खेळाडू निवासाकरिता वापर करणे.

३.१३ खेळाडूंना शासकीय, निमशासकीय सेवेत आरक्षण व थेट नियुक्ती देणे.

**४. क्रीडा वातावरण निर्मिती.**

४.१ स्पोर्टस नर्सरीची स्थापना करणे.

४.२ क्रीडा वाङमय निर्मिती, क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना करणे.

४.३ क्रीडा अभियान राबविणे.

४.४ शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्त्व जागविणे.

४.५ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना करणे.

४.६ खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता अभियान राबविणे.

४.७ क्रीडा विषयक योजनांमध्ये सुधारणा करणे.

४.८ महानगरपालिका, नगरपालिका खेळ व संघ दत्तक घेणे, क्रीडा विषयक बाबींवर ५ टक्के खर्च करणे.

**५. क्रीडा महोत्सवांचे आयोजन.**

५.१ शाळांचा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग वाढविणे.

५.२ शालेय क्रीडा स्पर्धा आयोजन करणे.

५.३ क्रीडा महोत्सव, क्रीडा दिन, क्रीडा सप्ताह साजरा करणे.

५.४ छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा, खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै. भाई नेरूरकर चषक, खोखो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सहाय्यक अनुदानात वाढ करणे, मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करणे.

**६. तांत्रिक मनुष्यबळाचा विकास.**

६.१ खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करणे.

६.२ क्रीडा संहिता तयार करणे.

६.३ शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन कार्यपद्धती राबविणे.

६.४ शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शन नियुक्तीस मान्यता देणे.

६.५ क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजन करणे.

६.६ क्रीडा विभागाचे सक्षमीकरण करणे.

**७. क्रीडा विद्यापीठाची स्थापना.**

७.१ महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे.

७.२ क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे.

**८. राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन.**

८.१ एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन देणे.

८.२ महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे.

८.३ क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविणे.

८.४ क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण व सहाय्यक अनुदान इ. करिता क्रीडा प्रकारांची वर्गवारी करणे.

**९. राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन.**

९.१ महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस सेंटरची स्थापना करणे.

९.२ साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे.

९.३ साहसी खेळाच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्याक्षिकांचे आयोजन करणे.

९.४ साहसी क्रीडा पुरस्कार देणे.

९.५ साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्था व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे.

९.६ साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना क्रीडा साहित्यासाठी अनुदान देणे.

**१०. क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना.**

१०.१ क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना करणे.

१०.२ वित्तीय व्यवस्था करणे.

**११. राज्याचे क्रीडा धोरण ठरविण्यासाठी नियुक्ती केलेली समितीस विशेष सहाय्य देणे.**

अशाप्रकारे आपण बघितले की, क्रीडा क्षेत्राचा विकास करण्याकरिता व क्रीडा नैपुण्याचा दर्जा वाढविण्याकरिता महाराष्ट्र सरकारने विविध योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करण्यासाठी क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजना ही एक महत्वपूर्ण योजना आहे. या योजनेविषयीची माहिती आणि त्याचा ऐतिहासिक आढावा पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

# प्रकरण -२ क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजनेचा ऐतिहासिक आढावा

### २.१ प्रास्ताविक :-

सुदृढ शरीरात निरोगी मनाचा निवास असतो ही बाब सर्वज्ञात आहे. त्यामुळे सध्याच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात खेळाद्वारे सुदृढता हा मूलमंत्र सर्वांसाठी उपयुक्त ठरणारा आहे. महाराष्ट्र राज्य हे क्रीडा क्षेत्रात अग्रेसर राज्य म्हणून ओळखल्या जाते.

राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना करण्यासाठी शालेय स्तरावर क्रीडा व शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविणे अत्यंत गरजेचे आहे. प्राथमिक शालेय स्तरापासूनच मुला-मुलींना शारीरिक शिक्षण व खेळात सहभागी करून भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी शारीरिक शिक्षण व खेळ अत्यंत आवश्यक ठरते. पालकांनी आपल्या पाल्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करण्यासाठी तसेच लहान वयात उपजत क्रीडा गुण असणाऱ्या मुला-मुलींना खेळाकडे आकृष्ट करण्यासाठी त्यांना आवश्यक त्या सवलती व प्रोत्साहन देणे आजच्या काळाची गरज आहे. या सर्व बाबींचा विचार करुन राज्याचे स्वतंत्र क्रीडा धोरण सन १९९६ मध्ये निश्चित करुन क्रीडा विकासाच्या भरीव योजनांची आखणी महाराष्ट्र राज्याने देशात सर्व प्रथम केली. या योजनांमध्ये क्रीडा गुण सवलत, शासकीय सेवेत आरक्षण, निवृत्तीवेतन, विमायोजना इत्यादी विविध योजनांचा समावेश करण्यात आला होता. क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजनेची सुरुवात याच धोरणापासून करण्यात आली.

क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजनेमधील नियमांमध्ये कालानुक्रमे जो बदल घडून आलेला आहे तो पुढील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६ नुसार सर्वांसाठी शारीरिक शिक्षण व निवडक मुला-मुलींसाठी खेळ हे तत्त्व अंमलात आणण्यासाठी राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना अत्यंत आवश्यक ठरते. पालकांनी आपल्या पाल्यांना खेळाकडे वळविण्यासाठी तसेच लहान वयातील उपजत क्रीडा गुण असणाऱ्या मुला-मुलींना खेळांकडे आकृष्ट करण्यासाठी प्रोत्साहीत करणे व सवलती देणे आवश्यक ठरते. पूर्व माध्यमिक व माध्यमिक शालेय स्तरावरील खेळाडूंना खेळामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतील.

अ) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू परीक्षेत नापास झाला असल्यास त्यास ग्रेस मार्क देण्याची सवलत शिक्षण विभागाकडून देण्यात येते. या खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीच्या मानाने ही सवलत अत्यंत तुटपुंजी आहे. त्याऐवजी राज्य व राष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्या सर्व खेळाडूंना एकूण टक्केवारीत ५ टक्के अधिकचे गुण देण्यात यावेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा खेळाकडे कल वाढेल.

ब) क्रीडा प्रशिक्षण व स्पर्धा यामुळे झालेली अनुपस्थिती नियमित करून प्रसंगी तो भरून काढण्यासाठी अतिरिक्त तासिका व प्रायोगिक अभ्यास घेण्यात येतील.

क) प्रशिक्षण व स्पर्धा जर परीक्षेच्या कालावधीत घेण्यात आल्या असतील तर त्यामुळे झालेली परीक्षेतील अनुपस्थिती नियमित करून खेळाडूंना पुढच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल व आवश्यकता वाटल्यास त्यांच्यासाठी वेगळी परीक्षा घेण्यात येईल.

दि. २७ फेब्रुवारी ९८ च्या परिपत्रकान्वये राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना करण्यासाठी शालेय स्तरावर क्रीडा व शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविणे अत्यंत गरजेचे आहे. प्राथमिक शालेय स्तरापासूनच मुला-मुलींना शारीरिक शिक्षण व खेळात सहभागी करून भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी शारीरिक शिक्षण व खेळ अत्यंत आवश्यक ठरते. या परिपत्रकानुसार विविध खेळांच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पदक विजेत्या (प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन करणाऱ्या) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व

खेळाडूंना त्यांनी शालांत परीक्षेत मिळविलेल्या एकूण गुणात ५ टक्के अधिक गुण देण्यात येतील आणि हे गुण केवळ इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी विचारात घेण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ नुसार भारतीय शालेय खेळ महासंघाने आयोजित केलेल्या अथवा पुरस्कृत केलेल्या शालेय क्रीडा स्पर्धा तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरणाद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये राज्यस्तरीय स्पर्धांमधील पदक विजेत्या व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ज्यादा गुण देण्यात येतील. तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गुण हे तो ज्या विषयात अनुत्तीर्ण होत असेल त्या त्या विषयात विभागून देण्यात येतील व त्यानंतरही काही गुण शिल्लक राहत असतील तर ते गुण त्यांनी मिळविलेल्या गुणांमध्ये क्रीडापटू म्हणून ज्यादा गुण दर्शविण्यात येतील. तसेच उत्तीर्ण होणाऱ्या खेळाडूस क्रीडापटू या सदराखाली जादा गुण म्हणून दर्शविण्यात येतील.

दि. ६ जून २००६ च्या परिपत्रकान्वये राज्यात क्रीडा विकासास चालना तथा खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने सध्याच्या धोरणानुसार १५ गुणांची व ३ विषयांची कमाल मर्यादा यात बदल करून माध्यमिक शालांत (इ.१०वी) व उच्च माध्यमिक शालांत (इ.१२वी) प्रमाणपत्र परीक्षेत अनुत्तीर्ण खेळाडू विद्यार्थी उत्तीर्ण होण्यासाठी २५ गुणांपर्यंत वाढ करण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासाठी विषयांच्या संख्येचे बंधन असणार नाही. जो विद्यार्थी नियमित असून सर्व विषयांची परीक्षा देईल आणि तो अनुत्तीर्ण ठरत असेल तर २५ गुणांच्या कमाल मर्यादित उत्तीर्णतेसाठी आवश्यक गुण त्या विद्यार्थ्यास अनुज्ञेय होतील. दिनांक २६ जून २००६ च्या पत्रान्वये सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षाच्या परीक्षेपासून क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजना लागू करण्यात आली आहे.

दिनांक २ डिसेंबर २००६ तसेच दि. १९ मे २००७ च्या परिपत्रकान्वये मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमापणत्र (इ.१२ वी) परीक्षांना सर्व विषय घेवून परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या नियमित खेळाडू विद्यार्थ्यांना उत्तीर्णतेसाठी

कमाल २५ गुणांची मर्यादा ठेवून तसेच एकूण गुणात हे गुण दर्शवून उत्तीर्णता व गुणांची टक्केवारी वाढण्यासाठी गुणांचा उपयोग करण्यास मान्यता दिलेली आहे.

१. सर्व विषयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सदर २५ गुण खेळाडू विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत दाखविण्यात यावे. एकुण गुणात हे गुण दर्शवून उत्तीर्णता व टक्केवारी वाढण्यासाठी या गुणांचा उपयोग करावा. (उदा. गुण ३५० + गुण २५ = ३७५ गुण).
२. अनुत्तीर्ण खेळाडू विद्यार्थ्यांना आजच्या प्रचलित पद्धतीने २५ गुण देण्यात यावेत आणि अनुत्तीर्ण खेळाडू विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांव्यतिरिक्त उर्वरित गुण त्यास मिळालेल्या एकूण गुणात वरील प्रमाणे दर्शवावेत.
३. विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात १ जून ते ३१ मे या कालावधित क्रीडा प्रकारात सहभागी झालेला असावा.
४. खेळाडू विद्यार्थ्यास सवलतीचे २५ गुण दिल्यानंतर त्याची टक्केवारी अधिकतम १०० टक्के असेल.
५. राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने मान्य केलेल्या संस्था व क्रीडा प्रकारासाठीच हे गुण अनुज्ञेय राहतील.
६. खेळाडू विद्यार्थी एकापेक्षा अधिक खेळांत राज्य/ राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झाला असला तरीही कमाल २५ गुण देण्यात यावेत.

गेल्या चार वर्षापासून राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेत भाग घेणाऱ्या १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना वाढीव २५ गुण त्यांच्या एकूण गुणांच्या बेरजेमध्ये समाविष्ट केले जातात किंवा पास होण्याकरिता 'ग्रेस मार्क्स' म्हणून त्यांचा फायदा होतो. खेळाडूंनी स्पर्धेत भाग घेतल्यामुळे तसेच खेळाच्या सरावाकरिता बराचसा वेळ अभ्यासाला त्यांना द्यावा लागत असल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्याकरिता व खेळांचा प्रचार-प्रसार व्हावा, या उदात्त भावनेने महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण

विभागातर्फे क्रीडा विभागाच्या शिफारशीनुसार वाढीव गुण देण्याचे ठरविले होते.

परंतु मुळात हा निर्णय चांगला, त्याचा हेतूसुध्दा चांगला, पण तो खरोखरच साध्य झालाय का ? असा प्रश्न केला तर नाईलाजाने नाही असेच उत्तर मिळेल. क्रीडा सवलतीच्या २५ गुणांनी मैदाने दुप्पट गर्दीने फुलली, अभ्यास एके अभ्यासाऐवजी मुलांना मैदानावर पाठवण्याकडे पालकांचाही कल वाढला हे निर्विवाद मान्य, परंतु त्याचा फायदा अस्सल खेळाडूंना कमी आणि बदली खेळाडूंनाच अधिक झालाय हे सुध्दा मान्य करावेच लागेल. यावरून असे निष्पन्न होते की, खेळाशी, खेळभावनेशी तसेच स्पर्धेतील संघाच्या कामगिरीशी तडजोड करून केवळ क्रीडा सवलत गुण घेण्यासाठी संघाची निवड केली जात आहे. यामध्ये मोठा गैरप्रकार झाल्याची उदाहरणे देखील पुढे आली आहेत. या सर्व प्रकारांवर एकंदरीतच २५ क्रीडा सवलत गुण विद्यार्थ्यांना देण्यामागचा उद्देश सफल होत नसल्याचे आढळून आले आहे. तसेच ही योजना सदोष असून स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविणारे व केवळ सहभाग असणाऱ्या खेळाडूंना सारखाच फायदा मिळत होता आणि यामध्ये फार मोठया प्रमाणात गैरव्यवहार पण होत होते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी राज्य शासनाच्या शिक्षण खात्याकडे आल्या होत्या. त्यामुळे त्यावर मोठया प्रमाणात टीका होत होती.

वरील सर्व परीपत्रके, शासन निर्णय, बातम्या यांच्या अध्ययनावरुन असे आढळते की, शासनाने वेळोवेळी क्रीडा विषयक गुण योजनेच्या नियमांमध्ये बदल करुन सुरुवातीला सर्वच खेळाडूंना गुणविषयक सवलतीचा महत्तम लाभ देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. परंतु कालांतराने क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्यासंदर्भात गुणांकन पद्धतीत त्रुटी असून त्यात बदल करण्याकरिता विविध क्रीडा संस्था, क्रीडापटू, पालक वर्ग, प्रसार माध्यमे व समाजातील विविध घटक इत्यादीकडून सातत्याने मागणी करण्यात येत होती. ही बाब विचारात घेवून शासन स्तरावर तसेच क्षेत्रिय स्तरावरही वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्यात. सदर बैठकांमध्ये झालेल्या निर्णयानुसार सध्या

अस्तित्वात असलेल्या क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

दि. ३० नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास, त्यांना उत्तीर्ण होण्याच्या किमान मर्यादेपर्यंत क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण केवळ उत्तीर्ण होण्यासाठी देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर खेळणाऱ्या खेळाडूंना दहावी आणि बारावीच्या परीक्षेत २५ गुण दिले जात होते. यामध्ये गैरप्रकार घडू लागल्याने यापुढे हे गुण केवळ उत्तीर्ण होण्यासाठीच दिले जातील. तो कितीही विषयात नापास झाला असल्यास या गुणांचा त्याला उपयोग होईल.

क्रीडा व युवक संचालनालय तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी प्रस्तावित केल्यानुसार खालील अटींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून क्रीडा सवलतीचे वाढीव गुण अनुज्ञेय राहतील.

१. भारतीय शालेय खेळ महासंघ व भारतीय क्रीडा प्राधिकरणामार्फत ज्या खेळाचे राष्ट्रीय स्तरावर आयोजन करण्यात येते त्या खेळामधील महाराष्ट्रात आयोजित करण्यात येणारे खेळ व महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेची मान्यता असलेले खेळ क्रीडा गुणांसाठी ग्राह्य धरण्यात यावेत.

२. क्रीडा गुण देण्यासाठी त्या शैक्षणिक वर्षातील दि. १ जून ते २८/२९ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धा ग्राह्य धरण्यात याव्यात. (इ.१०वी. व इ.१२ वीची परीक्षा ही फेब्रुवारी व मार्चमध्ये होते तसेच परीक्षा संपल्यानंतर संघटनेमार्फत होणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी होणारे खेळाडू हे फक्त क्रीडा गुणांचा लाभ घेण्याच्या उद्देशाने सहभागी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.)

३. खेळाडू विद्यार्थी हा एकापेक्षा अधिक खेळात सहभागी झालेला असला तरीही त्याला त्याच्या उच्चतम एकाच खेळाच्या प्रमाणपत्राचे गुण ग्राह्य धरण्यात यावेत.

४. खेळाडू विद्यार्थी ज्या जिल्ह्यामध्ये शिक्षण घेत आहे त्याच जिल्ह्याकडून त्याने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा.

५. राज्य संघटनेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या कोणत्याही दोन वयोगटांची यादी वाढीव क्रीडा गुणांसाठी क्रीडा संचालनालयास सादर करावी. सदर दोन्ही वयोगट हे १९ वर्षाआतील असावेत. सदर वयोगटाच्या स्पर्धा या राष्ट्रीय संघटनेने आयोजित केलेल्या वयोगटांच्या असाव्यात. (१४ वर्षाखालील वयोगटाच्या याद्या सादर करू नयेत.)

६. शालेय राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त खेळाडूंची माहिती क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वेबसाईटवर टाकण्यात यावी.

७. अधिकृत राज्य संघटनांनी आयोजित केलेल्या अधिकृत राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त खेळाडूंची माहिती त्या त्या खेळांच्या राज्य संघटनेने त्यांची वेबसाईट तयार करून वेबसाईटवर टाकण्यात यावी.

८. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ज्या खेळाडूंना वाढीव क्रीडा गुण दिलेले आहेत त्यांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी.

९. राज्य संघटनांनी त्यांचा राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची माहिती स्पर्धा संपन्न झाल्यानंतर १० दिवसांच्या आत विहित नमून्यांमध्ये संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास २ प्रतीत सादर करावी.

१०. राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्यानंतर त्वरीत खेळाडूने त्याचा अर्ज मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडे सादर करावा. मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी खेळाडूंच्या अर्जाची शहानिशा करून त्वरीत जिल्हा क्रीडा

अधिकारी यांच्याकडे सादर करावा. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा गुणांचे प्रस्ताव त्या शैक्षणिक वर्षातील दि. ३१ मार्चपर्यंत संबंधीत विभागीय शिक्षण मंडळ यांच्या कार्यालयास सादर करावेत. तद्नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही.

११. राज्य संघटनेमार्फत आयोजित स्पर्धा या जिल्हा विभाग, राज्य व राष्ट्रीय आयोजन करणे आवश्यक आहे.

१२. संघटनेच्या जिल्हास्तरीय व विभागीय क्रीडा स्पर्धेची व जिल्हास्तरीय संघटनेच्या अधिकृततेबाबतच्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.

१३. क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत ज्या खेळांना क्रीडा गुण द्यावयाचे आहेत त्या अधिकृत राज्य संघटनांची यादी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना कळविण्यात येईल.

१४. जिल्हा संघटनेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये सांघिक क्रीडा प्रकारामध्ये कमीत कमी ८ संघ, वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये प्रत्येक बाबीत कमीत कमी ८ खेळाडू सहभागी होणे आवश्यक आहे. तसेच सहभागी झालेल्या खेळाडूंची नोंदणी जिल्हा स्तरावर होणे आवश्यक आहे.

१५. राज्य संघटनांनी जिल्हा व राज्यस्तर स्पर्धांचे प्रमाणपत्र वाटप करतांना प्रमाणपत्रांची रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

१६. राज्य संघटनांनी स्पर्धेच्या प्रत्येक प्रमाणपत्रावर अनुक्रमांक, संघटनेचा नोंदणी क्रमांक, दिनांक, राज्यस्तरीय कितवी स्पर्धा आहे, स्पर्धेचा कालावधी, स्थळ याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१७. प्रत्येक वर्षी एका वयोगटातील एकच स्पर्धा ग्राह्य धरण्यात येईल. निमंत्रित क्रीडा स्पर्धा ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

१८. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या प्रमाणपत्रावर अध्यक्ष व सचिव यांच्यापैकी एकाची शाईची स्वाक्षरी अनिवार्य आहे.

१९. राज्य संघटनांची ज्या जिल्ह्यामध्ये जिल्हा व राज्यस्तरावरील स्पर्धांचे आयोजन केले असेल त्या स्पर्धामध्ये संबंधीत जिल्हा क्रीडा अधिकारी

यांना व राष्ट्रीय स्पर्धेसाठी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना निरीक्षक म्हणून उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

२०. जिल्हा, राज्य संघटनांनी जिल्हास्तरील स्पर्धा, राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक संचालनालयास वर्षाच्या सुरूवातीला कळवावी.

२१. स्पर्धेचे अभिलेख कायमस्वरूपी जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वरील निकषाव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विहित केल्यानुसार खालील निकषांचाही यामध्ये अंतर्भाव करण्यात येत आहे.

अ) क्रीडा गुण सवलत ही केवळ उत्तीर्ण होण्यासाठीच देण्यात यावी. या सवलतीसाठी विषय संख्येची मर्यादा असणार नाही. सदरचे गुण एका विषयात अथवा सहा विषयापर्यंत अथवा सहा विषयापर्यंत सुद्धा एकूण २५ गुणांच्या कमाल मर्यादेत विभागून द्यावेत.

ब) राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य संपादन केलेल्या खेळाडूंना क्रीडा गुण देतांना शैक्षणिक वर्षातील १ जून ते २८/२९ फेब्रुवारी ह्या कालावधीतील स्पर्धा ग्रह्य धरण्यात याव्यात.

क) राज्य संघटनेच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांचे आयोजन जिल्हास्तर व राज्यस्तर या क्रमाणे झाले असेल तरच क्रीडा गुण सवलत देण्यात यावी.

ड) सदर सवलत ही नियमित विद्यार्थी तसेच बहिःशाल विद्यार्थी यांना लागू राहील. तसेच ही सवलत शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून अंमलात येईल.

अशाप्रकारे क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण सवलत योजने मधील नियमांमध्ये कालानुक्रमे बदल घडून आलेला आहे.

## २.२ अध्ययनाची गरज व महत्व :-

राज्य व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या १० वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांना अनुक्रमे २५ गुण देण्यात येतात. मात्र याचा लाभ खऱ्या अर्थाने खेळाडूंना झाला की, त्याऐवजी दुसऱ्याच विद्यार्थ्यांना झाला याचा विचार करण्याची वेळ आली आहे. क्रीडा विषयक देण्यात येणाऱ्या २५ गुणांचा लाभ विद्यार्थ्यांना झाला खरा मात्र जे खेळाडू नाहीत त्यांनी याचा लाभ अधिक उठविल्याची उलटसुलट चर्चा ऐकू येत आहे आणि याबाबतच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रकाशित झालेल्या आहेत. ज्यांना खेळ माहित नाही असे विद्यार्थी दहावी व बारावीत अचानक खेळाडू झाले आणि थेट राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळू लागल्याने पालकांकडून क्रीडा विषयक गुणांच्या बाबतीत विविध मागण्या करण्यात येत आहेत.

यावरून असे निष्पन्न होते की, खेळाशी, खेळ भावनेशी तसेच स्पर्धेतील संघाच्या कामगिरीशी तडजोड करून केवळ क्रीडा सवलत गुण घेण्यासाठी संघाची निवड केली जात आहे. त्यामुळे हे अध्ययन किती गरजेचे आणि महत्वाचे आहे हे दिसून येते.

## २.३ अध्ययनाची उद्दिष्टे :-

१) १० वी आणि १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत तसेच राज्यस्तरीय क्रीडा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे अध्ययन करणे.

२) १० वीत असताना राज्यस्तरीय क्रीडा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी किंवा १२ वी मध्ये राज्यस्तरीय क्रीडा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे अध्ययन करणे.

३) राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या १० वी किंवा १२ वीच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागाचे अध्ययन करणे.

४) १० वी आणि १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे अध्ययन करणे.

५) सन २००५ ते २०११ या कालावधीतील राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे अध्ययन करणे.

# प्रकरण - ३ | क्रीडा गुण संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा

**३.१ प्रास्ताविक :-**

प्रस्तुत प्रकरणात क्रीडा गुणाशी संबंधित सर्व प्रकारची पुस्तके, क्रीडा धोरण, प्रकाशित तथा अप्रकाशित शोधप्रबंध, रिसर्च क्वॉर्टर्ली, डेझर्टेशन ॲबस्ट्रॅक्ट इंटरनॅशनल, संकेतस्थळ (इंटरनेट), ई-मासिकातील तसेच वर्तमानपत्रातील लेख इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात आला आहे.

पहिली राष्ट्रीय शारीरिक शिक्षण व खेळ परीषद दिनांक ७ व ८ फेब्रवारी १९९२ रोजी राष्ट्रीय शारीरिक शिक्षण व खेळ संघटनेच्या अंतर्गत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे संपन्न झाली. या परीषदेमध्ये पुढील शिफारस करण्यात आली होती.

शारीरिक शिक्षण विषय सर्व महाविद्यालयातील पहिल्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अनिवार्य करणे. त्यासाठी राष्ट्रीय शारीरिक शिक्षण आणि खेळ संघटना अभ्यासक्रमाचा मसुदा सूचवेल. तसेच आंतर महाविद्यालयीन, आंतर विद्यापीठीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण दिले पाहिजेत.

नायर यांनी ''केरळ सरकार आणि खेळ'' या लेखात भारतातील खेळाच्या वाढीमध्ये केरळ राज्य सरकारचा सहभाग या विषयी माहिती सादर केली आहे. यामध्ये त्यांनी केरळ सरकाने खेळाडूंना दिलेल्या विविध प्रोत्साहनात्मक योजनेविषयी माहिती दिली आहे.

१. **रोख बक्षिस -** राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना केरळ सरकार तर्फे प्रोत्साहन म्हणून रोख बक्षिसे दिली जातात.

२. **शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश -** पदक प्राप्त खेळाडूंसाठी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता जागा राखीव ठेवल्या जातात.

**३. शैक्षणिक लाभ -** ज्या खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला आहे. अशा खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक विषयामध्ये काही टक्के जादा गुण दिले जातात. या खेळाडूंनी त्यांचा बराच वेळ हा प्रशिक्षणात खर्च केलेला असतो. त्यामुळे त्यांना सहभागाकरिता गुण दिले जातात. ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम आणि द्वितीय स्थान प्राप्त केलेले असेल अशा खेळाडूंना शालांत माध्यमिक परीक्षेत अनुक्रमे १३ टक्के व १२ टक्के गुण दिले जातात. तसेच फक्त सहभागासाठी १० टक्के गुण दिले जातात. राज्य स्तरावर प्रथम किंवा द्वितीय स्थान प्राप्त करणाऱ्या खेळाडूस ५ टक्के गुण दिले जातात. अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठांनी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्या आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या सन १९९८ च्या परिपत्रकानुसार तसेच अध्यादेश क्र. ०.२२९ च्या अन्वये विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा विषयक जादा १० गुण देण्यात येतात. सदर गुण प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांचा खालील प्रमाणे खेळ स्पर्धेमध्ये सहभाग हवा.

अ) विद्यार्थी हा आंतर महाविद्यालयीन स्पर्धेच्या उंपात्यपूर्व फेरीत पोहचलेल्या संघाचा सदस्य असला पाहिजे.

ब) विद्यार्थ्यांने विद्यापीठाद्वारे आयोजित वैयक्तिक खेळ प्रकारात प्रथम आठ क्रमांकापैकी एक क्रमांक प्राप्त केला पाहिजे.

क) विद्यार्थ्याने आंतरराज्य, विभागीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले पाहिजे.

कालिकत विद्यापीठाच्या सन २००५ च्या आदेशानुसार खेळातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक जादा गुण देण्यात येतात. क्रीडा विषयक जादा गुण देण्याबाबतची नियमावली पुढील प्रमाणे आहे.

१. जे विद्यार्थी अधिकृत मान्यता असलेल्या राज्य, राष्ट्रीय, विद्यापीठीय स्पर्धेत सहभागी होतात. तसेच जे विद्यार्थी वरील

स्पर्धेमध्ये स्वतः किंवा त्यांचा संघ प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करतो. फक्त तेच विद्यार्थी जादा गुणांकरिता पात्र होतील.

२. फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमात नियमित शिकणारा विद्यार्थीच जादा गुणाकरिता पात्र ठरेल.
३. विद्यार्थ्याने ज्या सेमिस्टरमध्ये खेळात कामगिरी केली असेल त्याच सेमिस्टरसाठी त्याला जादा गुण देण्यात येतील.
४. विद्यार्थ्यांला जादा गुणांकरिता परीक्षा देणे आवश्यक आहे.
५. क्रमावारीकरिता या गुणांचा विचार होणार नाही.
६. परीक्षेमध्ये मिळालेल्या जास्तीत जास्त गुणांच्या आधारावर हे गुण ठरविण्यात येतील.
७. क्रीडा विषयक जादा गुण पुढील प्रमाणे देण्यात येतील.
   - **आंतर विद्यापीठ स्पर्धा -** प्रथम बक्षिस ४ टक्के, द्वितीय बक्षिस ३ टक्के, तृतीय बक्षिस २ टक्के
   - **आंतर राज्य स्पर्धा -** प्रथम बक्षिस ७ टक्के, द्वितीय बक्षिस ६ टक्के, तृतीय बक्षिस ५ टक्के
   - **आंतर राष्ट्रीय स्पर्धा -** प्रथम -द्वितीय, तृतीय बक्षिस १० टक्के.

बंगलोर विद्यापीठ हे तपशीलवार खेळ धोरण व पूर्ण विकसित खेळ मंडळ असणारे भारतातील पहिले विद्यापीठ आहे. विद्यापीठ शैक्षणिक परीषदेने नवीन क्रीडा धोरणाला मान्यता दिली असून ते सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे. या क्रीडा धोरणात खेळाडूंसाठी भरपूर गोष्टी दिलेल्या आहेत. त्या मध्ये सर्वात महत्वाचे खेळाडूंना खेळ सहभागाकरिता देण्यात येणारे जादाचे क्रीडा गुण आहेत. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंना विद्यापीठ परीक्षांमध्ये ५ टक्के जादा गुण निश्चितपणे मिळणार आहे. जे खेळाडू या स्पर्धेमध्ये सहभागी होतील त्यांना ३ टक्के जादा गुण देण्यात येईल. तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना अनुक्रमे १०,००० रू., ४,००० रू. आणि २५०० रू. देण्यात

येईल. त्याचप्रमाणे जे खेळाडू नवीन रेकॉर्ड स्थापित करतील त्यांना २०,००० रूपये देण्यात येतील.

खेळाडूंना क्रीडा स्पर्धेमध्ये अधिक विश्वासाने सहभाग घेण्यासाठी त्यांना परीक्षेमध्ये सवलती देण्यात आल्या आहेत. क्रीडा धोरणानुसार ज्या खेळाडूंनी स्पर्धेमुळे आपली परीक्षा दिली नाही अशा खेळाडुंना आता पुरवणी परीक्षेची वाट बघण्याची आवश्यकता राहणार नाही. विद्यापीठाद्वारे त्यांची स्वतंत्र परीक्षा घेतली जाईल.

पुणे विद्यापीठाद्वारे खेळाची वाढ करण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) **पदक प्राप्त खेळाडूंसाठी खेळ शिष्यवृत्ती -** महाविद्यालयीन पातळीवर खेळाची वाढ करण्यासाठी विद्यापीठाच्या खेळ समितीने सन २००७-०८ पासून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडूंना खेळ शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले आहे.

अ) **अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तर -** सुवर्णपदक प्राप्त खेळाडूस वैयक्तिक खेळ प्रकारासाठी १०,०००/- रू प्रत्येकी तर सांघिक खेळासाठी ७,०००/- रू प्रत्येकी दिले जातात. रौप्यपदक प्राप्त खेळाडूस वैयक्तिक खेळ प्रकारासाठी ७,०००/- रू प्रत्येकी तर सांघिक खेळासाठी ५,०००/- रू प्रत्येकी दिले जातात. कांस्यपदक प्राप्त खेळाडूस वैयक्तिक खेळ प्रकारासाठी ५,०००/- रू प्रत्येकी तर सांघिक खेळासाठी ३,०००/- रू प्रत्येकी दिले जातात.

ब) **अश्वमेध (आंतर राज्य विद्यापीठ स्पर्धा) -** सुवर्णपदक प्राप्त खेळाडूस वैयक्तिक खेळ प्रकारासाठी ५,०००/- रू प्रत्येकी तर सांघिक खेळासाठी ३,०००/- रू प्रत्येकी दिले जातात. रौप्यपदक प्राप्त खेळाडूस वैयक्तिक खेळ प्रकारासाठी ३,०००/- रू प्रत्येकी तर सांघिक खेळासाठी २,०००/- रू प्रत्येकी दिले जातात. कांस्यपदक प्राप्त खेळाडूस वैयक्तिक खेळ प्रकारासाठी २,०००/- रू प्रत्येकी तर सांघिक खेळासाठी १,०००/- रू प्रत्येकी दिले जातात.

**२) अनाशवंत/टिकाऊ खेळ साहित्य खेरदी करण्याकरिता अनुदान-** विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रम अंतर्गत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त संस्थांना टिकाऊ खेळ साहित्य खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते. महाविद्यालयातील खेळ सुविधेमध्ये सुधारणा होऊन विद्यार्थ्यांनी खेळात प्रत्यक्ष सहभागी व्हावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

**३) पदक प्राप्त खेळाडूंसाठी प्रोत्साहनात्मक गुण -** विद्यापीठ प्राधिकरणाद्वारे सन १९८८ च्या अध्यादेश क्र. ०.१६३ अन्वये खेळाडूंना प्रोत्साहनपर खेळ सहभागासाठी ५ गुण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर प्रोत्साहन पर गुण प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांचा आंतर विद्यापीठ, राष्ट्रीय, आंतर राष्ट्रीय खेळ स्पर्धेमध्ये सहभाग घेणे आवश्यक आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन २००७ च्या (सुधारित) अध्यादेश क्र. १६३ अन्वये विद्यार्थ्यांना अभ्यासेत्तर उपक्रमात सहभाग घेतल्याबद्दल अतिरिक्त गुण दिले जातात. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कोणत्याही पदवी, पदविका, प्रमाणपत्र परीक्षेत बसणारा विद्यार्थी हा अतिरिक्त गुणांसाठी पात्र आहे. ज्या खेळाडूंनी आंतर विद्यापीठीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे/राज्याचे प्रतिनिधित्व केले असेल अशा खेळाडूंना त्याच्या खेळातील सहभागाकरिता जास्तीत जास्त १५ अतिरिक्त गुण देण्यात येतात.

नागपूर विद्यापीठाच्या सन २०१० च्या अध्यादेश क्र. १ नुसार विद्यार्थ्यांना खेळातील सहभागाकरिता प्रोत्साहनपर जास्तीत जास्त २५ गुण दिले जातात. विद्यार्थ्यांना खेळातील सहभागाकरिता विविध स्तरानुसार खालील प्रमाणे प्रोत्साहनपर गुण दिले जातात.

अ) नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग १० गुण.

ब) नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त विद्यार्थी १५ गुण.

क) आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग २५ गुण.

ड) राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग २५ गुण (मान्यताप्राप्त खेळ संघटनेद्वारा आयोजित).

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने त्यांच्या सन २००९ च्या अध्यादेश क्र. ०.६६ अन्वये जी विद्यार्थीनी पदवी, पदव्युत्तर, बी.एड. आणि पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेला बसत आहे. अशा विद्यार्थीनींना त्यांच्या खेळातील सहभागाकरिता अतिरिक्त ५ गुण देण्यात येतील.

ज्या विद्यार्थीनी आंतर महाविद्यालयीन, आंतर विद्यापीठ, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर खेळात सहभागी होतील. अशा विद्यार्थीनी खेळातील सहभागाबाबत मिळणाऱ्या अतिरिक्त ५ गुण प्राप्त करण्यासाठी पात्र होतील.

केरळ - उर्वरित भारतासाठी आदर्श या लेखात केरळ राज्य खेळाच्या बाबतीत भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत कसे पहिले/प्रथम आहे याविषयीची माहिती पुढील प्रमाणे सादर केली आहे.

- लोकशाही पद्धतीने निवड केलले खेळ मंडळ असणारे पहिले राज्य.
- खेळ शाळा, वसतीगृह स्थापन करणारे पहिले राज्य.
- खेळातील कायदा करणारे पहिले राज्य.
- शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये खेळाला समाविष्ट करणारे पहिले राज्य.
- समाजाच्या सर्व विभागामध्ये आरोग्य केंद्रीत शारीरिक क्षमता मोहिम चालविणारे प्रथम राज्य.
- खेळाडूंसाठी एक सुव्यवस्थित रोख बक्षिस योजनेचा परीचय करून देणारे प्रथम राज्य.
- होतकरू खेळाडूंना शिष्यवृत्ती प्रदान करणारे प्रथम राज्य.
- खेळाडूंसाठी व्यावसायिक महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी राखीव जागा ठेवणारे प्रथम राज्य.
- सार्वजनिक परीक्षांमध्ये पात्र होण्यासाठी खेळाडूंना क्रीडा गुण देणारे प्रथम राज्य.

- खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवणारे प्रथम राज्य.
- अंत्यत गरीब खेळाडूंना निवृत्ती वेतन प्रदान करणारे प्रथम राज्य.
- खेळ आयोग नेमणारे प्रथम राज्य.

तसेच खेळाडूंकरिता प्रोत्साहनपर असलेल्या विविध योजना/बाबी पुढील प्रमाणे आहेत.

- आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त व सहभागी खेळाडूंना प्रोत्साहनपर क्रीडा गुण.
- व्यावसायिक अभ्यासक्रमात खेळाडूंसाठी आरक्षित जागा.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्या खेळाडूंना रोख बक्षिसे.
- शाळा आणि महाविद्यालयीन पातळीवर खेळाडूंना खेळ शिष्यवृत्ती.
- पदक प्राप्त खेळाडूंसाठी दरवर्षी ५० शासकीय नोकऱ्या.
- अत्यंत गरीब क्रीडा व्यक्तींना मासिक निवृत्ती वेतन.

ग्राफिक ईरा हील विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासपूरक, अभ्यासेत्तर आणि खेळ उपक्रमातील सहभागाबाबत जास्तीत जास्त ५० गुण दिल्या जातात. अतिरिक्त ५० गुण मिळवण्याकरिता विद्यार्थ्यांना अभ्यासपूरक, अभ्यासेत्तर आणि खेळ उपक्रम यापैकी कोणत्याही दोन उपक्रमात भाग घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या सक्रीय सहभागासाठी प्रत्येक उपक्रमात १० गुण देण्यात येतील आणि त्याच उपक्रमातील पुढील सहभागासाठी अतिरिक्त १० गुण देण्यात येतील. जे विद्यार्थी कोणत्याही उपक्रमाच्या आयोजन समितीचे समन्वयक किंवा सदस्य म्हणून काम करतील त्यांना सुद्धा अतिरिक्त १० गुण देण्यात येतील. परंतु एकूण गुण ५० गुणांपेक्षा जास्त व्हायला नको.

सीबीएसईच्या सीसीई परीक्षा नियंत्रण प्रणाली अंतर्गत नवीन धोरणानुसार ज्या विद्यार्थ्यांना अभ्यासेत्तर उपक्रमात चांगले ग्रेड्स मिळतील त्या विद्यार्थ्यांच्या दोन मुख्य विषयातील ग्रेड्स हे एकास्तराने वाढविण्यात येतील. या धोरणाचा फायदा ज्या विद्यार्थ्यांनी राज्य, केंद्रीय शासन किंवा सीबीएसईद्वारा आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम/द्वितीय स्थान प्राप्त केले असेल किंवा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित स्पर्धांमध्ये

सहभागी झाले असतील अशा विद्यार्थ्यांना होईल. अशा संस्थाद्वारे आयोजित कोणत्याही प्रकारच्या सहशालेय स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना या धोरणाचा फायदा घेता येईल.

यशवंतराव चव्हाण नाशिक विद्यापीठाद्वारे दरवर्षी आठ विभागात खेळ स्पर्धेचे आयोजन केले जाते. विद्यापीठ स्तरावर चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत आणि अश्वमेघ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाठविले जाते. या विद्यापीठातील खेळाडूंच्या कामगिरीमध्ये आतापर्यंत हळूहळू सुधारणा होत आहे. विद्यार्थ्यांना खेळ उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन म्हणून नियमानुसार जास्तीत जास्त १० प्रोत्साहन गुण दिले जातात.

कोचीन विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सन २०११ च्या आदेशान्वये खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंना क्रीडा विषयक जादा गुण देण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

खेळातील विविध स्तरानुसार देण्यात येणाऱ्या जादा गुणाची टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

१) आंतर राष्ट्रीय स्तर स्पर्धा (संघटना) :-

अ) प्रथम - १० टक्के

ब) द्वितीय - ९ टक्के

क) तृतीय - ८ टक्के

ड) सहभाग - ७ टक्के

२) राष्ट्रीय स्तर स्पर्धा (संघटना) :-

अ) प्रथम - ८ टक्के

ब) द्वितीय - ७ टक्के

क) तृतीय - ६ टक्के

ड) सहभाग - ४ टक्के

३) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा :-

अ) प्रथम - ८ टक्के

ब) द्वितीय - ७ टक्के

क) तृतीय - ६ टक्के

ड) सहभाग - ५ टक्के

४) दक्षिण विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा :-

अ) प्रथम - ७ टक्के

ब) द्वितीय - ६ टक्के

क) तृतीय - ५ टक्के

ड) सहभाग - ४ टक्के

५) राज्यस्तरीय स्पर्धा (संघटना) :-

अ) प्रथम - ४ टक्के

ब) द्वितीय - ३ टक्के

क) तृतीय - २ टक्के

६) आंतर महाविद्यालयीन स्पर्धा :-

अ) प्रथम - ३ टक्के

ब) द्वितीय - २ टक्के

क) तृतीय - १ टक्के.

एन.डी.टी.व्ही. आणि निर्माण लाईफ स्टाईल यांनी तंदुरूस्त भारत चळवळ तसेच खेळासाठी गुण मोहीम ही देशातील सर्व शालेय अभ्यासक्रमात खेळाला समाविष्ट करण्यासाठीची मोहीम सुरू केली आहे. ही दीर्घकाळ मोहीम भारतीयांना सुदृढता विषयाचा विचार बदलून तंदुरूस्त राष्ट्र तयार होण्यासाठी प्रेरणा देणार आहे. या मोहिमेचे पहिले लक्ष्य हे खेळासाठी गुण हे असून त्याचा उद्देश युवकांसाठी सक्रीय, निरोगी, स्वस्थ जीवनशैली विकसित करणे हा आहे. या मोहिमेचा मुख्य विश्वास असा आहे की, जर विविध शाळांनी तसेच विविध शिक्षण मंडळानी त्यांच्या मुख्य अभ्यासक्रमामध्ये खेळाला स्थान दिल्यास पालक तसेच विद्यार्थी आपोआपच खेळासाठी जास्त वेळ देतील आणि त्याद्वारे त्यांना आजीवन तंदुरूस्त राहण्यासाठी योग्य मार्ग मिळेल.

मनुष्यबळ विकास मंत्री कपिल सिब्बल, या चळवळीचे राजदूत अभिनेता रनबिर कपूर तसेच क्रीडापटू पतौडी, बाईचूंग भुतिया, विजेंदर सिंह, गगन नारंग आणि पंकज अडवाणी या चळवळीला समर्थन देत आहेत.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०११ (मसुदा) नुसार एकविध खेळ मान्यता प्राप्त संघटनांद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना १० गुण देण्यात यावे. तसेच सांघिक/वैयक्तिक खेळात प्रथम तीन क्रमांकाच्या खेळाडूंना २५ गुण व चार ते आठ क्रमांकात असणाऱ्या संघातील खेळाडूंना २० गुण देण्यात यावे व राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंना २५ गुणांची क्रीडा गुणांची सवलत देण्यात येईल.

शालेय राज्यस्तरीय स्पर्धेतील सहभागी होणाऱ्या खेळाडूंना २० क्रीडा गुण, प्राविण्यधारक इ. प्रथम तीन क्रमांकाच्या संघातील खेळाडूंना तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना २५ क्रीडा गुणांची सवलत देण्यात येईल. तसेच विभागस्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना १० गुण देण्यात येतील.

दहावी-बारावीप्रमाणे १ ली ते ९ वी पर्यंत आणि ११ वीच्या विद्यार्थ्यांना देखील विशेष क्रीडा गुण सवलतीत सामील केले तर विद्यार्थ्यांना खेळापासून पालकवर्ग अभ्यासाच्या कारणावरून परावृत्त करणार नाही आणि विद्यार्थी खेळाचा सराव नियमितपणे खंड न पडता करू शकतील. तसेच शाळांचा आंतरशालेय स्पर्धेतील १०० टक्के सहभाग होण्याच्या दृष्टीने मदत होईल. यासाठी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विविध स्तरावर सहभागासाठी विशेष क्रीडागुण देण्यात यावे. हे गुण त्या विद्यार्थ्याला पुढील वर्गात प्रवेश देण्यासाठी तसेच एकूण टक्केवारीमध्ये जमा करावे. हे विशेष गुण पहिली ते नववी व अकरावीच्या खेळाडूंना देण्यात येतील. शारीरिक शिक्षणाच्या परीक्षेमध्ये जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना अनुक्रमे २५, ५०, ७५ व १०० अधिक गुण देण्यात येतील.

केंद्रीय क्रीडामंत्री अजय माकन यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शारीरिक तंदुरूस्तीसाठी स्वतंत्र श्रेणी देवून त्या श्रेणीनुसार त्यांना वाढीव गुण देण्याचा 'नॅशनल फिजिकल फिटनेस प्रोग्रॅम' राबविण्याचा केंद्र सरकारचा विचार असून या योजनेचा प्रारूप मसुदा जारी केला.

शारीरिक तंदुरूस्तीशी दुर्लक्ष करून अथवा त्याच्याशी तडजोड करून केवळ अभ्यास प्रवृत्तीस आळा बसावा आणि अभ्यासात 'हिट होतानाच शरीरानेही फिट' राहण्यास विद्यार्थी व पालकांना प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना आखण्यात आली आहे. इयत्ता पाचवी आणि त्यावरील तुकडयांमध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना यानुसार शारीरिक फिटनेससाठी वाढीव गुण देण्यात येतील.

ही योजना सक्तीच्या स्वरूपात नव्हे तर प्रोत्साहनाच्या स्वरूपात राबविण्यात येणार आहे. शारीरिक तंदुरूस्तीकडे पाहण्याचा केवळ विद्यार्थ्यांचाच नव्हे तर एकूणच सर्व नागरिकांचा दृष्टिकोन बदलावा हा यामागचा उद्देश आहे. तसे झाल्यास ते एक मोठे व स्वागतार्ह परिवर्तन ठरेल. यासाठी सर्वकष विचार विनिमयानंतर विद्यार्थ्यांची शारीरिक तंदुरूस्ती मोजण्यासाठी सहा प्रमुख निकष ठरविण्यात आले आहेत. हृदय आणि श्वसनयंत्रणेची कार्यक्षमता, स्नायूंची ताकद, स्नायूंची सहनशीलता, आवेशानंतर होणारे शक्तीवर्धन, लवचिकपणा व शारीरिक रचना (शरीरातील चरबीचे प्रमाण) असे हे सहा निकष आहेत. या निकषांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरूस्तीचे मूल्यमापन करून त्यानुसार त्यांना श्रेणी देण्याचा विचार आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी लिंगनिहाय वेगळया श्रेणी असतील. शारीरिक तंदुरूस्तीच्या श्रेणीनुसार विद्यार्थ्यांना अभ्यासात मिळालेल्या गुणांमध्ये एक ते तीन टक्के वाढीव गुण प्रचलित नियमांनुसार दिले जातील. हे वाढीव गुणदान शारीरिक तंदुरूस्तीच्या श्रेणीमध्ये वरच्या ५० टक्के पातळीवर असलेलया विद्यार्थ्यांनाच मिळेल. तंदुरूस्तीची पातळी त्याहून कमी असलेल्या विद्यार्थ्यांना वाढीव गुण मिळणार नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सन २०१२ च्या नवीन अध्यादेश क्र. ८२४ अन्वये विद्यार्थ्यांना त्यांच्या आंतर विद्यापीठ

राज्यस्तर स्पर्धा, पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठीय स्पर्धा, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सहभागाकरिता अतिरिक्त २५ गुण देण्यात येतात. अध्यादेश क्र. ८२४ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये आणि विद्यापीठामध्ये शिकत असलेल्या सर्व विभागातील खेळ उपक्रमात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांना या २५ अतिरिक्त गुणांचा फायदा होणार आहे. या योजनेचा फायदा राज्यस्तर, अश्वमेध स्पर्धा, आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना होणार आहे. क्रीडा सहभागाकरिता मिळणाऱ्या अतिरिक्त २५ गुणांचा उपयोग विद्यार्थ्यांना पास होण्याकरिता करता येईल. विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षात एकाच सत्रासाठी या योजनेचा लाभ घेता येईल.

आचार्य नागार्जून विद्यापीठाद्वारे आंतर विद्यापीठ स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंना प्रोत्साहन पर जादा क्रीडा गुण दिले जातात. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना १० टक्के गुण बक्षिस म्हणून दिले जाते. त्याचप्रमाणे दक्षिण विभाग किंवा दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूस ५ टक्के गुण बक्षिस म्हणून दिले जाते.

तसेच पदक प्राप्त खेळाडूंना आचार्य नागार्जून विद्यापीठाद्वारे पुढील प्रमाणे रोख बक्षिसे दिले जातील. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना अनुक्रमे ६,०००/-रू., ४,०००/-रू, व ३,०००/-रूपये दिले जातील. त्याचप्रमाणे दक्षिण विभाग किंवा दक्षिण पश्चिम आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना अनुक्रमे ३,०००/- रू, २,०००/- रू व १,०००/- रूपये दिले जातील.

दिल्ली पब्लिक स्कूलद्वारे खेळाडूंसाठी खेळ गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती आंतरराष्ट्रीय स्तर, राष्ट्रीय स्तर आणि राज्य स्तरावरावर खेळलेल्या विद्यार्थ्यासाठी आहे. यामध्ये विद्यार्थी वर्ग ६ वी ते ९ वी मध्ये शिकत असलेले असावे. तसेच त्यांचे वय ११ ते १७ च्या दरम्यान असावे. या खेळ शिष्यवृत्तीचा कालावधी २ वर्षाचा असून ही शिष्यवृत्ती एकूण १५ विद्यार्थ्यांनाच देण्यात येईल.

शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठीचे निकष/ पात्रता :-

१. विद्यार्थ्यांने सलग मागील दोन वर्षापासून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर सहभाग घेतलेला असावा.
२. विद्यार्थ्यांने शारीरिक शिक्षण विभागाद्वारे घेण्यात येणाऱ्या खेळ चाचणी, कौशल्य चाचणी आणि सुदृढता चाचणीमध्ये पात्र होणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थ्यांने शाळेद्वारा घेण्यात येणारी शैक्षणिक प्रवेश परीक्षा पास होणे आवश्यक आहे.
४. विद्यार्थ्यांच्या सर्व मूळ कागदपत्र आणि प्रमाणपत्राची पडताळणी केली जाईल.
५. खेळ समिती अंतिम निवडीसाठी विद्यार्थ्यांची नावे उपाध्यक्षाकडे पाठवेल.

खेळ गुणवत्ता शिष्यवृत्तीचे फायदे :-

१. मोफत शिक्षण/ शुल्कामध्ये सवलत.
२. सुट्ट्यांमध्ये किंवा खेळ स्पर्धेनंतर विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्गाचे आयोजन.
३. शैक्षणिक निकालात क्रीडा जादा गुणांकरिता विशेष धोरण.
४. विद्यार्थ्यांना विशेष खेळ गणवेश आणि ट्रॅकसुट दिल्या जाईल.
५. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विमानाचे भाडे शाळेकडून दिल्या जाईल.
६. आंतरराष्ट्रीय खेळाडूंना शाळेतील सर्व शुल्कामध्ये १०० टक्के सवलत दिली जाईल.
७. राष्ट्रीय खेळाडूंना शाळेतील सर्व शुल्कामध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल.
८. राज्यस्तरीय खेळाडूंना प्रवेश शुल्क, वार्षिक शुल्क आणि शिक्षण शुल्कात ५० टक्के सवलत दिली जाईल.

अमरावती विद्यापीठाच्या सन २०१३ च्या (सुधारित) अध्यादेश क्र. १ अन्वये विद्यार्थ्यांना खेळातील सहभागाकरिता प्रोत्साहनपर गुण दिले

जातात. विद्यार्थ्यांना त्यांच्या खेळातील सहभागाकरिता जास्तीत जास्त १० गुण दिले जाऊ शकतात. तसेच एका शैक्षणिक वर्षात दोन सत्रापैकी एका सत्रामध्ये जातीस्त जास्त ५ गुण दिले जाऊ शकतात. प्रोत्साहनात्मक गुणांचा वापर परीक्षेमध्ये विद्यार्थी जर नापास होत असेल तर पास होण्यासाठी करता येतो.

खेळातील सहभागाकरिता पुढील प्रमाणे प्रोत्साहनपर गुण दिले जातात.

अ) आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा किंवा क्रीडा प्रकारामध्ये सहभाग - ३ गुण/खेळ प्रकार.

ब) आंतर विद्यापीठीय खेळ स्पर्धेत सहभाग - ५ गुण/खेळ प्रकार.

दीव व दमणच्या क्रीडा धोरणानुसार खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना वर्ग ८ वी पर्यंत आंतरिक परीक्षेमध्ये पुढील प्रमाणे क्रीडा विषयक जादा गुण देण्यात येतील.

अ) केंद्र शासित प्रदेश पातळीवरील खेळ स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त केल्यास दोन विषयांमध्ये ५ टक्के जादा गुण देण्यात येतील.

ब) राष्ट्रीय स्तरीय खेळ पातळीवर प्रथम तीन क्रमांक प्राप्त केल्यास दोन विषयामध्ये १० टक्के जादा गुण देण्यात येतील.

प्रोत्साहन आणि शिष्यवृत्ती -

वित्तवर्ष २०१३-१४ पासून ज्या खेळाडूंनी कोणतेही पदक प्राप्त न करता राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत शालेय राष्ट्रीय स्पर्धेत दीव व दमणचे प्रतिनिधित्व केले असेल. अशा खेळाडूंना प्रत्येकी २५००/- रूपये देण्यात येतील. वरील सहभागाकरिता असलेल्या अनुदान व्यतिरिक्त ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत, शालेय राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले असेल. अशा खेळाडूंना पुढील प्रमाणे मोठ्या प्रमाणात अनुदान देण्यासाठी प्रस्तावित आहे.

खेळाडूंना वैयक्तिक खेळासाठी सुवर्ण पदक, रौप्यपदक, कांस्यपदक यांना अनुक्रमे ३०,०००/-, २५,०००/-, २०,०००/- रूपये तसेच सांघिक खेळासाठी अनुक्रमे, १५,०००/-, १०,०००/-, ७,५००/- रूपये देण्यासाठी प्रस्तावित आहे.

त्याच प्रमाणे खेळाडूंना खुल्या राष्ट्रीय स्पर्धेत, किंवा समतूल्य स्पर्धेत पुढील प्रमाणे मोठ्या प्रमाणात अनुदान देण्यात येणार आहे.

खेळाडूंना वैयक्तिक खेळासाठी सुवर्णपदक, रौप्यपदक, कांस्यपदक यांना अनुक्रमे ३,००,०००/-, २,००,०००/-, १,००,०००/- रूपये तर सांघिक खेळासाठी अनुक्रमे ५०,०००/-, ४०,०००/-, ३०,०००/- रूपये देण्यासाठी प्रस्तावित आहे.

पंजाब सरकारने शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळातील कामगिरीसाठी अतिरिक्त गुण देण्याचे ठरविले आहे. पंजाब शिक्षण मंत्री सिंकदर सिंह मलुका यांनी सांगितले की, जे खेळाडू विविध पातळीवर प्रथम तीन स्थान प्राप्त करतील अशा खेळाडूंनाच फक्त अतिरिक्त क्रीडा गुण देण्यात येतील. हा निर्णय महाराष्ट्र राज्य आणि गोवा राज्याच्या उदाहरणावरून घेण्यात आला आहे. खेळाडूंना राज्यस्तरीय शालेय स्पर्धेतील कामगिरीसाठी १५ गुण देण्यात येईल तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीसाठी २५ गुण देण्यात येईल. तसेच राज्यातील शासकीय शाळेमध्ये खेळ हा एक आवश्यक विषय म्हणून समाविष्ट करण्यात येईल.

गोवा राज्य क्रीडा धोरणानुसार (सुधारित) सत्र २०१३-१४ पासून खेळ गुणवत्ता गुण योजनांची अमंलबजावणी करण्यात येणार आहे. शासनाने योजनेतील खाली दिलेल्या सुधारणा मान्य केल्या आहेत आणि त्या शैक्षणिक सत्र २०१३-१४ पासून लागू होतील.

**क्रीडा गुण वाटपाबाबतची सुधारित सारणी -**

| **स्पर्धा स्तर** | **प्रथम स्थान** | **द्वितीय स्थान** | **तृतीय स्थान** | **सहभाग** |
|---|---|---|---|---|
| तालुका | ७ | ५ | ३ | २ |
| जिल्हा | १० | ७ | ५ | ३ |
| राज्य | १५ | १० | ७ | ५ |
| आंतर राज्य विभागीय | २० | १५ | १० | ७ |
| आंतर राज्य राष्ट्रीय | २५ | २० | १५ | १० |
| आंतरराष्ट्रीय | ३० | २५ | २० | १५ |

अ) वरील सारणी ही संकलित पद्धतीवर आधारित आहे.

ब) जो विद्यार्थी तालुकास्तर ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत प्रत्येक स्पर्धेत प्रथम स्थान प्राप्त करतो. असा विद्यार्थी एकूण १०७ गुण प्राप्त करू शकतो.

क) विद्यार्थ्यांने प्रत्येक स्तरावर प्राप्त केलेल्या गुणांची बेरीज ही अंतिम गुण म्हणून देण्यात येईल.

ड) वर्ग ९ वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांना खेळ गुणवत्ता योजनेचा लाभ देतांना प्रत्येक विषयासाठी जास्तीत जास्त १०० गुण आहे हे लक्षात घेवून द्यावे.

केरळ राज्यामध्ये क्रीडा विषयक जादा गुण प्रदान करण्याकरिता अटी व शर्ती.

१. नियमित शाळेत येणारा खेळाडू विद्यार्थी जादा क्रीडा गुणासाठी पात्र आहे.

२. नियमित खेळाडू विद्यार्थी परीक्षेमध्ये नापास झाला असल्यास तो पुन्हा परीक्षेस बसल्यास तो जादा क्रीडा गुणांकरिता पात्र राहील.

३. राष्ट्रीय पातळीवर पदक प्राप्त खेळाडू, राष्ट्रीय पातळीवर सहभागी खेळाडू किंवा राज्य पातळीवर पदक प्राप्त खेळाडूच जादा गुणांकरिता पात्र आहेत.

४. उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या बाबत ज्या विद्यार्थ्यांजवळ राज्यस्तरावरील गुणवत्ता प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय पातळीवर सहभाग असेल तेच विद्यार्थी जादा गुणांकरिता पात्र आहेत.

५. उच्च माध्यमिक शाळेतील जे विद्यार्थी ८ वी किंवा ९ वी मध्ये राज्य, राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत सहभागी झाले असतील आणि ते जर १० वी मध्ये कमीत कमी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झाले असतील तर ते विद्यार्थी जादा क्रीडा गुणांकरिता पात्र आहेत.

६. भारतीय शालेय खेळ संघटना, आशियाई खेळ संघटना आणि आंतरराष्ट्रीय खेळ संघटना द्वारा आयोजित राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळ व क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडू जादा क्रीडा गुणांकरिता पात्र आहेत.

७. आंतर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झालेले खेळाडू जादा क्रीडा गुणाकरिता पात्र आहेत.

८. केरळ राज्य क्रीडा परीषद द्वारा मान्यता प्राप्त राज्य क्रीडा संघटनाद्वारा आयोजित स्पर्धेतील विजयी खेळाडूच जादा क्रीडा गुणांकरिता पात्र आहेत.

९. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील विजयी व सहभागी खेळाडूंना पुढील प्रमाणे जादा क्रीडा गुण दिले जातात.

अ) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक २५ टक्के

ब) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक २३ टक्के

क) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कांस्य पदक २१ टक्के

ड) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग २० टक्के

इ) राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक १५ टक्के

फ) राष्ट्रीय स्पर्धेत रौप्य पदक १३ टक्के

ग) राष्ट्रीय स्पर्धेत कांस्य पदक ११ टक्के

ह) राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग १० टक्के

य) राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्ण पदक ५ ते १० टक्के पास होण्याकरिता

ज) राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्य पदक ५ टक्के

क) राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक ३ टक्के

ल) राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग २ टक्के.

एन.डी.टी.व्ही. च्या खेळासाठी गुणांची गरज या लेखानुसार खेळासाठी गुण हे एक योग्य दिशेने टाकलेले पाउल आहे. एका तरूण विद्यार्थ्याच्या जीवनात क्रीडाचे महत्व अनमोल आहे. खेळ एका तरूण विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व घडविण्यात महत्वाची भूमिका बजावते. परंतु विद्यार्थ्याद्वारा त्यांच्या शाळेत खेळासाठी दिल्या जाणाऱ्या वेळेची दखल घेतल्या जात नाही.

खेळासाठी दिले जाणारे उत्तेजन हे शैक्षणिक वर्षात फक्त खेळ दिवस किंवा क्रीडा कार्यक्रमापुरतेच मर्यादित असते. आपल्याला विद्यार्थ्यांना सुरूवातीच्या टप्प्यांमधेच खेळाचा परीचय करून देणे आवश्यक आहे. त्याद्वारे शालेय स्तरावर अधिक चांगले यशस्वी खेळाडू तयार होतील.

खेळाला एक विषय म्हणून जास्त महत्व दिले पाहिजे. जेणे करून आपल्याला पुढच्या पिढीला अनुकरण करण्यासाठी आदर्श मिळेल. खेळ मुलांच्या सर्वांगीण विकासात मदत करतो, त्यांना मजबूत बनवितो, त्यांचा आत्मविश्वास वाढवितो. हळूहळू संपत असलेल्या कबड्डी, खो खो सारख्या परंपरागत खेळाकडे बघून दुःख होते. खेळासाठी गुण हे अशा खेळांना पुनःरूज्जीवन करण्यासाठी टाकलेले एक पाऊल आहे.

गोंडवाना विद्यापीठात खेळाडूंना आंतर महाविद्यालयीन, आंतर विद्यापीठीय स्पर्धेतील सहभागाकरिता जास्तीत जास्त २५ क्रीडा गुण देण्यात येतात. गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील कोणत्याही पदवीला प्रवेशित विद्यार्थी हा त्याच्या खेळातील सहभागाकरिता मिळणाऱ्या गुणांकरिता पात्र आहे.

खेळ सहभागाकरिता मिळणाऱ्या गुणांची विभागणी खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

अ) आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग - १० गुण

ब) आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमाक- १५ गुण

क) आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग - २५ गुण.

उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, तिरूवनंतपुरम यांच्या सन २०१५ च्या परीपत्रकान्वये शाळेमध्ये नियमित जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या राज्यस्तरीय खेळ स्पर्धेतील कामगिरीबद्दल ११ वी आणि १२ वी मध्ये स्वतंत्रपणे क्रीडा जादा गुण देण्यात येतील.

खेळातील कामगिरीबद्दल देण्यात येणाऱ्या क्रीडा जादा गुण विषयी माहिती खालील प्रमाणे आहे.

**अ) राज्य स्तर**

प्रथम स्थान - एकूण गुणांमध्ये ५ टक्के गुण

द्वितीय स्थान - एकूण गुणांमध्ये ४ टक्के गुण

तृतीय स्थान - एकूण गुणांमध्ये ३ टक्के गुण

**ब) राष्ट्रीय स्तर**

प्रथम स्थान - एकूण गुणांमध्ये १५ टक्के गुण

द्वितीय स्थान - एकूण गुणांमध्ये १३ टक्के गुण

तृतीय स्थान - एकूण गुणांमध्ये ११ टक्के गुण

सहभाग - एकूण गुणांमध्ये १० टक्के गुण

**क) आंतर राष्ट्रीय स्तर**

फक्त सहभागाकरिता एकूण गुणांमध्ये २० टक्के गुण दिले जातील. ज्यांनी प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान प्राप्त केले असतील त्यांना किती गुण द्यायचे याचा निर्णय संचालक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ घेतील.

अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणात क्रीडा गुणाशी संबंधित सर्व बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

# प्रकरण -४ सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

### ४.१ प्रास्ताविक :-

प्रस्तुत अध्ययनात लेखकाने ''क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांच्या परिणामांचे चिकित्सात्मक अध्ययन'' या विषयावर अध्ययन केले. याकरिता लेखकाने अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम येथील सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती विभागातील विविध जिल्हा क्रीडा संघटना, अमरावती विभागीय शिक्षण मंडळ, अमरावती या कार्यालयात सन २००५ ते २०११ या कालावधितील माहिती नोंदी व अभिलेखाच्या स्वरूपात प्राप्त केलेली आहे.

### ४.२ माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

प्रस्तुत अध्ययनात प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढील प्रकारे करण्यात आले आहे.

**१० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता क्र. ४.१**

| वर्ष | १० वी | ०५-०६ च्या तुलनेत शेकडा वाढ | १२ वी | ०५-०६ च्या तुलनेत शेकडा वाढ | १० व १२ एकूण | ०५-०६ च्या तुलनेत शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५-०६ | २३६ | ० | १६६ | ० | ४०२ | ० |
| ०६-०७ | ३२२ | १३६.४४ | २२७ | १३६.७५ | ५४९ | १३६.५७ |
| ०७-०८ | ४३१ | १८२.६३ | २७५ | १६५.६६ | ७०६ | १७५.६२ |
| ०८-०९ | ५८२ | २४६.६१ | ३२५ | १९५.७८ | ९०७ | २२५.६२ |
| ०९-१० | ७९० | ३३४.७४ | ३४९ | २१०.२४ | ११३९ | २८३.३३ |
| १०-११ | ८४२ | ३५६.७८ | ४४८ | २६९.८८ | १२९० | ३२०.९० |
| एकूण | ३२०३ | | १७९० | | ४९९३ | |

**अ) सन २००५ ते २०११ या कालावधित १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे विश्लेषण :-**

तक्ता क्र. ४.१ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये २३६ विद्यार्थी, सन २००६-०७ मध्ये ३२२ विद्यार्थी, सन २००७-०८ मध्ये ४३१ विद्यार्थी, सन २००८-०९ मध्ये ५८२ विद्यार्थी, सन २००९-१० मध्ये ७९० विद्यार्थी, सन २०१०-११ मध्ये ८४२ विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

तसेच सन २००५-०६ या मूळ वर्षाच्या तुलनेत १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागातील वाढ ही अनुक्रमे सन २००६-०७ मध्ये १३६.४४ टक्के, सन २००७-०८ मध्ये १८२.६३ टक्के, सन २००८-०९ मध्ये २४६.६१ टक्के, सन २००९-१० मध्ये ३३४.७४ टक्के, सन २०१०-११ मध्ये ३५६.७८ टक्के विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

**ब) सन २००५ ते २०११ या कालावधित १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे विश्लेषण :-**

तक्ता क्र. ४.१ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये १६६ विद्यार्थी, सन २००६-०७ मध्ये २२७ विद्यार्थी, सन २००७-०८ मध्ये २७५ विद्यार्थी, सन २००८-०९ मध्ये ३२५ विद्यार्थी, सन २००९-१० मध्ये ३४९ विद्यार्थी, सन २०१०-११ मध्ये ४४८ विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

तसेच सन २००५-०६ या मूळ वर्षाच्या तुलनेत १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागातील वाढ ही अनुक्रमे सन २००६-०७ मध्ये १३६.७५ टक्के, सन २००७-०८ मध्ये १६५.६६ टक्के, सन २००८-०९ मध्ये १९५.७८ टक्के, सन

२००९-१० मध्ये २१०.२४ टक्के, सन २०१०-११ मध्ये २६९.८८ टक्के विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येते.

**क) सन २००५ ते २०११ या कालावधित १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे विश्लेषण :-**

तक्ता क्र. ४.१ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये ४०२ विद्यार्थी, सन २००६-०७ मध्ये ५४९ विद्यार्थी, सन २००७-०८ मध्ये ७०६ विद्यार्थी, सन २००८-०९ मध्ये ९०७ विद्यार्थी, सन २००९-१० मध्ये ११३९ विद्यार्थी, सन २०१०-११ मध्ये १२९० विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

तसेच सन २००५-०६ या मूळ वर्षाच्या तुलनेत १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागातील वाढ ही अनुक्रमे सन २००६-०७ मध्ये १३६.५७ टक्के, सन २००७-०८ मध्ये १७५.६२ टक्के, सन २००८-०९ मध्ये २२५.६२ टक्के, सन २००९-१० मध्ये २८३.३३ टक्के, सन २०१०-११ मध्ये ३२०.९० टक्के विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

**१० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता क्र. ४.२**

| वर्ष | १० वी | ०५-०६ च्या तुलनेत शेकडा वाढ | १२ वी | ०५-०६ च्या तुलनेत शेकडा वाढ | १० वी व १२ वी एकूण | ०५-०६ च्या तुलनेत शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५-०६ | ४०५ | ० | २५४ | ० | ६५९ | ० |
| ०६-०७ | ५५० | १३५.८ | ३६० | १४१.७३ | ९१० | १३८.०९ |
| ०७-०८ | ८०४ | १९८.५२ | ४६६ | १८३.४६ | १२७० | १९२.७२ |
| ०८-०९ | १०६३ | २६२.४७ | ६६३ | २६१.०२ | १७२६ | २६१.९१ |
| ०९-१० | १६३९ | ४०४.६९ | ५८० | २२८.३५ | २२१९ | ३३६.७२ |
| १०-११ | २३५० | ५८०.२५ | ११७१ | ४६१.०२ | ३५२१ | ५३४.२९ |
| एकूण | ६८११ | | ३४९४ | | १०३०५ | |

**अ) सन २००५ ते २०११ या कालावधित १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे विश्लेषण :-**

तक्ता क्र. ४.२ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये ४०५ विद्यार्थी, सन २००६-०७ मध्ये ५५० विद्यार्थी, सन २००७-०८ मध्ये ८०४ विद्यार्थी, सन २००८-०९ मध्ये १०६३ विद्यार्थी, सन २००९-१० मध्ये १६३९ विद्यार्थी, सन २०१०-११ मध्ये २३५० विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

तसेच सन २००५-०६ या मूळ वर्षाच्या तुलनेत १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागातील वाढ ही अनुक्रमे सन २००६-०७ मध्ये १३५.८ टक्के, सन २००७-०८ मध्ये १९८.५२ टक्के, सन २००८-०९ मध्ये २६२.४७ टक्के, सन २००९-१० मध्ये ४०४.६९ टक्के, सन २०१०-११ मध्ये ५८०.२५ टक्के विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येते.

**ब) सन २००५ ते २०११ या कालावधित १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे विश्लेषण :-**

तक्ता क्र. ४.२ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये २५४ विद्यार्थी, सन २००६-०७ मध्ये ३६० विद्यार्थी, सन २००७-०८ मध्ये ४६६ विद्यार्थी, सन २००८-०९ मध्ये ६६३ विद्यार्थी, सन २००९-१० मध्ये ५८० विद्यार्थी, सन २०१०-११ मध्ये ११७१ विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

तसेच सन २००५-०६ या मूळ वर्षाच्या तुलनेत १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील

सहभागातील वाढ ही अनुक्रमे सन २००६-०७ मध्ये १४१.७३ टक्के, सन २००७-०८ मध्ये १८३.४६ टक्के, सन २००८-०९ मध्ये २६१.०२ टक्के, सन २००९-१० मध्ये २२८.३५ टक्के, सन २०१०-११ मध्ये ४६१.०२ टक्के विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येते.

**क) सन २००५ ते २०११ या कालावधित १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे विश्लेषण :-**

तक्ता क्र. ४.२ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये ६५९ विद्यार्थी, सन २००६-०७ मध्ये ९१० विद्यार्थी, सन २००७-०८ मध्ये १२७० विद्यार्थी, सन २००८-०९ मध्ये १७२६ विद्यार्थी, सन २००९-१० मध्ये २२१९ विद्यार्थी, सन २०१०-११ मध्ये ३५२१ विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येतो.

तसेच सन २००५-०६ या मूळ वर्षाच्या तुलनेत १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागातील वाढ ही अनुक्रमे सन २००६-०७ मध्ये १३८.०९ टक्के, सन २००७-०८ मध्ये १९२.७२ टक्के, सन २००८-०९ मध्ये २६१.९१ टक्के, सन २००९-१० मध्ये ३३६.७२ टक्के, सन २०१०-११ मध्ये ५३४.२९ टक्के विद्यार्थी प्रतिवर्ष आढळून येते.

**शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याचवर्षी संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता क्र. ४.३**

| वर्ष | शालेय स्पर्धा | संघटना स्पर्धा | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०५-०६ | १२५ | १०३ | ८२.४ |
| ०६-०७ | १२५ | ९७ | ७७.६ |
| ०७-०८ | १२५ | ७९ | ६३.२ |
| ०८-०९ | १२५ | ६१ | ४८.८ |
| ०९-१० | १२५ | ३८ | ३०.४ |
| १०-११ | १२५ | ३१ | २४.८ |

तक्ता क्र. ४.३ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याचवर्षी संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये ८२.४ टक्के, सन २००६-०७ मध्ये ७७.६ टक्के, सन २००७-०८ मध्ये ६३.२ टक्के, सन २००८-०९ मध्ये ४८.८ टक्के, सन २००९-१० मध्ये ३०.४ टक्के, सन २०१०-११ मध्ये २४.८ टक्के आढळून येतो.

**शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याचवर्षी संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता क्र. ४.४**

| वर्ष | शालेय स्पर्धा | संघटना स्पर्धा | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०५-०६ | १२५ | ९३ | ७४.४ |
| ०६-०७ | १२५ | ८१ | ६४.८ |
| ०७-०८ | १२५ | ७३ | ५८.४ |
| ०८-०९ | १२५ | ५२ | ४१.६ |
| ०९-१० | १२५ | ३४ | २७.२ |
| १०-११ | १२५ | २९ | २३.२ |

तक्ता क्र. ४.४ च्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, सन २००५ ते २०११ या कालावधित शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याचवर्षी संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग अनुक्रमे सन २००५-०६ मध्ये ७४.४ टक्के, सन २००६-०७ मध्ये ६४.८ टक्के, सन २००७-०८ मध्ये ५८.४ टक्के, सन २००८-०९ मध्ये ४१.६ टक्के, सन २००९-१० मध्ये २७.२ टक्के, सन २०१०-११ मध्ये २३.२ टक्के आढळून येतो.

**सन २००५ ते २०१० या कालावधित १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी किंवा १२ वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता क्र. ४.५**

| | सन ०५-०६ | | सन ०६-०७ | | सन ०७-०८ | | सन ०८-०९ | | सन ०९-१० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ग | विद्यार्थी सहभाग | शेकडा प्रमाण | विद्यार्थी सहभाग | शेकडा प्रमाण | विद्यार्थी सहभाग | शेकडा प्रमाण | विद्यार्थी सहभाग | शेकडा प्रमाण | विद्यार्थी सहभाग | शेकडा प्रमाण |
| १० वी | २५० | १०० | २५० | १०० | २५० | १०० | २५० | १०० | २५० | १०० |
| ११ वी | १३७ | ५४.८ | १२१ | ४८.४ | १०३ | ४१.२ | ८७ | ३४.८ | ६३ | २५.२ |
| १२ वी | १८९ | ७५.६ | १७२ | ६८.८ | १५७ | ६२.८ | १४९ | ५९.६ | | |

**अ) सन २००५-०६ मध्ये १० वीत असताना खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी व १२ वी मधील खेळातील सहभागाचे विश्लेषण :-**

वरील तक्ता क्र. ४.५ नुसार सन २००५-०६ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ५४.८ टक्के तर १२ वीत असताना ७५.६ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

**ब) सन २००६-०७ मध्ये १० वीत असताना खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी व १२ वी मधील खेळातील सहभागाचे विश्लेषण :-**

वरील तक्ता क्र. ४.५ नुसार सन २००६-०७ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ४८.४ टक्के तर १२ वीत असताना ६८.८ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

**क) सन २००७-०८ मध्ये १० वीत असताना खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी व १२ वी मधील खेळातील सहभागाचे विश्लेषण :-**

वरील तक्ता क्र. ४.५ नुसार सन २००७-०८ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ४१.२ टक्के तर १२ वीत असताना ६२.८ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

**ड) सन २००८-०९ मध्ये १० वीत असताना खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी व १२ वी मधील खेळातील सहभागाचे विश्लेषण :-**

वरील तक्ता क्र. ४.५ नुसार सन २००८-०९ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ३४.८ टक्के तर १२ वीत असताना ५९.६ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

**ई) सन २००९-१० मध्ये १० वीत असताना खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वी मधील खेळातील सहभागाचे विश्लेषण :-**

वरील तक्ता क्र. ४.५ नुसार सन २००९-१० मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना २५.२ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

# प्रकरण -५ | सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

**५.१ सारांश :-**

शारीरिक शिक्षण तसेच खेळ व क्रीडा हा विद्यार्थीदशेतील व्यक्तिमत्व विकासातील महत्वाचा घटक आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा खेळांमधील सहभाग जास्तीत जास्त वाढावा आणि चांगले खेळाडू निर्माण व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ६ जून २००६ च्या पत्राद्वारे दहावी आणि बारावीतील विद्यार्थ्यांना राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतल्याबद्दल क्रीडा सवलतीचे २५ गुण देण्यात येतात.

शासनाने विद्यार्थी क्रीडांगणावर आकर्षित होऊन क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा म्हणून करण्यात आलेल्या क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजनेचा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभागावर काय परिणाम झाला हे बघण्यासाठी लेखकाने सदर विषय निवडलेला होता. याकरिता लेखकाने अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम येथील सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती विभागातील विविध जिल्हा क्रीडा संघटना, अमरावती विभागीय शिक्षण मंडळ, अमरावती या कार्यालयात सन २००५ ते २०११ या कालावधितील माहिती नोंदी व अभिलेखाच्या स्वरूपात प्राप्त केली.

अशाप्रकारे मिळालेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

## ५.२ निष्कर्ष :-

१) सन २००५ ते २०११ या ६ वर्षाच्या कालावधिमध्ये शालांत परीक्षेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमधील सहभाग हा सन २००५-०६ तील सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये ३५६.७८ टक्के म्हणजेच तिप्पट पेक्षा जास्त पटीने वाढलेला दिसून येतो.

२) सन २००५ ते २०११ या ६ वर्षाच्या कालावधिमध्ये शालांत परीक्षेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमधील सहभाग हा सन २००५-०६ तील सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये २६९.८८ टक्के म्हणजेच दुप्पट पेक्षा जास्त पटीने वाढलेला दिसून येतो.

३) सन २००५ ते २०११ या ६ वर्षाच्या कालावधिमध्ये शालांत परीक्षेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमधील सहभाग हा सन २००५-०६ तील सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये ३२०.९० टक्के म्हणजेच तिप्पट पेक्षा जास्त पटीने वाढलेला दिसून येतो.

४) सन २००५ ते २०११ या ६ वर्षाच्या कालावधिमध्ये शालांत परीक्षेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमधील सहभाग हा सन २००५-०६ तील सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये ५८०.२५ टक्के म्हणजेच पाच पेक्षा जास्त पटीने वाढलेला दिसून येतो.

५) सन २००५ ते २०११ या ६ वर्षाच्या कालावधिमध्ये शालांत परीक्षेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा

स्पर्धांमधील सहभाग हा सन २००५-०६ तील सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये ४६१.०२ टक्के म्हणजेच चार पेक्षा जास्त पटीने वाढलेला दिसून येतो.

६) सन २००५ ते २०११ या ६ वर्षाच्या कालावधिमध्ये शालांत परीक्षेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमधील सहभाग हा सन २००५-०६ तील सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये ५३४.२९ टक्के म्हणजेच पाच पेक्षा जास्त पटीने वाढलेला दिसून येतो.

७) शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याचवर्षी संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा उत्तरोत्तर कमी झालेला दिसून येत असून हा सहभाग सन २००५-०६ तील ८२.४ टक्के सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये फक्त २४.८ टक्के आढळून येतो.

८) शालेय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्याचवर्षी संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग हा उत्तरोत्तर कमी झालेला दिसून येत असून हा सहभाग सन २००५-०६ तील ७४.४ टक्के सहभागाच्या तुलनेत सन २०१०-११ मध्ये फक्त २३.२ टक्के आढळून येतो.

९) सन २००५-०६ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ५४.८ टक्के तर १२ वीत असताना ७५.६ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

१०) सन २००६-०७ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ४८.४ टक्के तर १२ वीत असताना ६८.८ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

११) सन २००७-०८ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ४१.२ टक्के तर १२ वीत असताना ६२.८ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

१२) सन २००८-०९ मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना ३४.८ टक्के तर १२ वीत असताना ५९.६ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

१३) सन २००९-१० मध्ये १० वीत असताना संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीत असताना २५.२ टक्के सहभाग संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसून येतो.

१४) सन २००५ ते २०१० या कालावधित १० वीत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा ११ वीच्या परीक्षेमध्ये क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत नसल्यामुळे खेळातील सहभाग कमी झालेला दिसून येतो तर त्याच विद्यार्थ्यांचा १२ वीच्या परीक्षेमध्ये क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण मिळत असल्यामुळे खेळातील सहभागात ११ वीच्या तुलनेत वाढ झालेली दिसून येते. तसेच विद्यार्थ्यांचा १२ वीतील खेळातील सहभाग हा १० वी तील खेळातील सहभागापेक्षा कमी दिसून येतो.

**५.३ शिफारशी :-**

''क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांच्या परिणामांचे चिकित्सात्मक अध्ययन'' हे अध्ययन करतांना मिळालेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करून प्राप्त झालेले निष्कर्ष तसेच प्राप्त झालेल्या इतर पुरक माहितीस अनुसरून पुढील शिफारशी सूचविण्यात येत आहेत.

१) १० वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा राष्ट्रीयस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग वाढण्यासाठी त्यांना २५ क्रीडा गुणांसोबतच अतिरिक्त क्रीडा गुण देण्यात यावे.

२) ११ वीतील विद्यार्थ्यांना सुद्धा क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजना लागू करण्यात यावी. जेणेकरून १० वी व १२ वीतील विद्यार्थ्यांचा ११ वी मध्ये सुद्धा क्रीडा स्पर्धेत सहभाग दिसून येईल.

३) विद्यार्थी हे १० वी व १२ वी मध्ये क्रीडा गुणामुळे जास्त सहभागी होतांना दिसतात. म्हणून सर्वच वर्गातील खेळाडूंना क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण देण्यात यावे.

४) विद्यार्थ्यांच्या खेळातील सहभागाच्या दर्जानुसार तसेच स्तरानुसार जिल्हा -५, विभाग -१०, राज्य -१५, राष्ट्रीय -२० तर राष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य प्राप्त खेळाडूस २५ गुण देण्यात यावे.

५) विद्यार्थ्यांचा सर्व खेळातील सहभाग वाढविण्यासाठी त्यांना विविध खेळांच्या सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे.

६) एकाच शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांना शालेय तसेच संघटनेद्वारा आयोजित क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहीत करण्यात यावे.

७) विद्यार्थ्यांचा खेळातील सहभागासोबतच त्यांची शारीरिक क्षमता चाचणी घेऊन शारीरिक क्षमतेनुसारही क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण देण्यात यावे.

८) विद्यार्थ्यांना त्यांच्या शारीरिक तंदुरूस्तीनुसार स्वतंत्र श्रेणी देवून त्या श्रेणीनुसार त्यांना अतिरिक्त गुण देण्यात यावे.

९) विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच शारीरिक क्षमता आणि खेळाचे महत्व पटवून देण्यात यावे.

१०) क्रीडा क्षेत्राचा विकास होण्यासाठी तसेच हुशार विद्यार्थ्यांना क्रीडांगणावर आणण्यासाठी क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजनेतील काही नियम व अटी बदलून ती पुन्हा पहिल्या सारखी लागू करण्यात यावी.

११) क्रीडा स्पर्धेतील सहभागामुळे खेळाडू परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्याची परीक्षा नंतर घेण्यात यावी व त्याचे शैक्षणिक सत्र वाया जाऊ देऊ नये.

१२) क्रीडा स्पर्धेमुळे खेळाडू विद्यार्थ्यांचा मागे राहिलेला शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यास शिक्षकांनी मदत करावी.

१३) १२ वी या शैक्षणिक पात्रतेवर देण्यात येणाऱ्या नोकऱ्यांमध्ये शालेय राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावरील प्रावीण्य प्राप्त खेळाडूंना प्राधान्य देण्यात यावे.

१४) १० वी व १२ वी नंतर पुढील शिक्षणाच्या प्रवेशासाठी प्रावीण्य प्राप्त खेळाडूंना पहिल्यापेक्षा जास्त टक्के जागा राखीव ठेवून त्यांचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग वाढवावा.

१५) १० वी व १२ वीच्या परीक्षेमध्ये मिळालेले क्रीडा गुण पुढील शिक्षणाच्या प्रवेशासाठी एकूण गुणात गृहित धरण्यात यावे.

१६) सर्व क्रीडा संघटनांनी खेळाडूंना आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या सहकार्य करून क्रीडा स्पर्धेतील सहभागासाठी प्रोत्साहित करावे.

१७) विद्यार्थ्यांना खेळातील सहभागामुळे येणाऱ्या शैक्षणिक अडचणी दूर करण्यात याव्यात.

१८) एकाच शैक्षणिक सत्रात १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना शालेय स्पर्धेसोबतच संघटनेच्या स्पर्धेत सुद्धा सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे.

१९) सलग तीन वर्षे क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांपेक्षा जास्त गुण देण्यात यावे.

२०) राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्राप्त केलेल्या प्रावीण्यानुसार म्हणजेच प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकाच्या खेळाडूंनाच क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण देण्यात यावे.

२१) राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुणांपेक्षा जास्त गुण देण्यात यावे.

२२) १० वी व १२ वी मध्ये खेळाडू हे केवळ गुणांसाठीच संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेत आहे. हे त्यांच्या राष्ट्रीय स्तरावरील कमी सहभागातून लक्षात येते. त्यामुळे शालेय राज्यस्तर, संघटना राज्यस्तर, शालेय राष्ट्रीयस्तर व संघटना राष्ट्रीयस्तर स्पर्धेसाठी क्रीडा गुणदान पद्धती वेगवेगळी असावी.

२३) क्रीडा क्षेत्राचा विकास व्हावा तसेच खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे याकरिता क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजना प्राथमिक स्तरापासून तर महाविद्यालयीन स्तरापर्यंत सगळयांना लागू करण्यात यावी.

२४) क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा देण्यात यावे.

२५) खेळाडूंना शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याकरिता जिल्हा व विभागातून विजयी होत जावे लागते. तर संघटनेतर्फे सरळ राज्यस्तरीय स्पर्धेत खेळता येते म्हणून अशा शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना संघटनेपेक्षा जास्त प्रोत्साहनात्मक गुण देण्यात यावे.

२६) शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडू आणि संघटनेद्वारा आयोजित स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू यांना वेगवेगळी क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजना लागू करण्यात यावी.

२७) जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांचे त्यांच्या जिल्ह्यात आयोजित संघटनांच्या विविध खेळांच्या स्पर्धांवर नियंत्रण असावे. प्रत्यक्षात जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन होते का? ते तपासावे. तसेच

कमीत कमी २ वृत्तपत्रात स्पर्धेच्या आधी व नंतर बातम्या प्रकाशित करणे जरूरी असावे.

२८) नवीन खेळांना क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजनेतील खेळात समाविष्ट करण्यापूर्वी त्या खेळाच्या खेळाडूंचा कमीत कमी पाच वर्ष राष्ट्रीय स्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग असावा.

२९) क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड ही निःपक्षपातीपणे करण्यात यावी.

३०) क्रीडा स्पर्धा आयोजनानंतर सहभागी खेळाडूंची यादी स्पर्धेनंतर १५ दिवसात संबंधित क्रीडा संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात १० दिवसात सादर करावी.

३१) संघटनेच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत संघ किंवा खेळाडूंचा सहभाग कमी असतो. त्यामुळे ठराविक विद्यार्थी सरळ राज्यस्तरीय स्पर्धेकरिता सहभागी होतात. म्हणून जिल्हा स्तरावर कमीतकमी ४ ते ८ संघाचा सहभाग आवश्यक करण्यात यावा.

३२) शाळेतील क्रीडा सूविधा व शाळेचा संघटनेशी समन्वय या आधारावरच शाळेतील विद्यार्थी दरवर्षी विशिष्ट खेळात सातत्याने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत जास्त सहभागी होतांना आढळतात. तर अन्य शाळेतील विद्यार्थी यापासून वंचित राहतात याकरिता उपाय योजना होणे गरजेचे आहे.

३३) प्रत्येक शाळेमध्ये खेळांच्या साधन, सूविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. जेणेकरून क्रीडा स्पर्धांमध्ये दरवर्षी विविध शाळा विविध खेळात सहभागी होतील.

३४) संघटनेद्वारा आयोजित खुल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना सुद्धा क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण देण्यात यावे.

३५) क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक गुण योजनेचा योग्य प्रचार, प्रसार करून या योजनेला योग्य प्रकारे कार्यान्वित करण्यात यावे.

# संदर्भ सूची

१. आचार्य नागार्जून युनिव्हर्सिटी,. (२०१२). इंसेंटिव फॉर स्पोर्टस् मेन ॲन्ड वुमेन. रिट्रिव्हड २१ डिसेंबर २०१३, फ्रॅाम एचटीटीपीः// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. नागार्जूनयुनिव्हर्सिटी.ऐसी इन.

२. बेस्ट, जे., ॲण्ड कान्ह, जे. (२००७). रिसर्च इन एज्युकेशन. न्यू दिल्लीः प्रेटिंस हॉल.

३. सीबीएसई अपग्रेडेड ग्रेडस् बाय वन लेवल इन क्लास १०. (२०११). माय सीबीएसई गाईड. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. मायसीबीएसईगाईड.कॉम

४. चिंचमालातपुरे, अ. (२००९). महाराष्ट्रातील राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त खेळाडू, प्रशिक्षक व संघटकाचे क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे चिकित्सात्मक अध्ययन (पीएच.डी). अमरावती विद्यापीठ.

५. कोचिन युनिव्हर्सिटी,. (२०११) अवार्ड ऑफ ग्रेस मार्क्स टू स्टूडंट व्हू एक्सेल इन स्पोर्टस् ॲन्ड आर्टस् कॉम्पिटीशन्स. रिट्रिव्हड १८ ऑगस्ट २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.वेलफेअर.कुसाट.ऐसी.ईन

६. द हिंदू,. (२००६). प्ले वेल ॲन्ड गेट ग्रेस मार्क्स. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.दहिंदू.कॉम

७. डागर, आर., ॲण्ड चौहान, एस. (२००७). शारीरिक शिक्षण व खेळाचा इतिहास. न्यू दिल्लीः फ्रेंडस् पब्लिकेशन.

८. देशपांडे, एस. (१९९७). *फिजीकल एज्यूकेशन इन अँशन्ट इंडिया.* न्यू दिल्लीः भारतीय विद्या प्रकाशन.

९. दिल्ली पब्लिक स्कूल,. (२०१३). स्पोर्टस् मेरीट स्कॉलरशिप. रिट्रिव्हड ४ मार्च २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. डीपीएसइंदोर.ऑर्ग/स्पोर्टस्-स्कॉलरशिप.पीएचपी

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी, औरंगाबाद,. (२०१२). न्यू ऑर्डिनन्स-८२४ परटैनिंग टू ॲडिशनल २५ मार्क्स टू द स्टूडेंट्स व्हू आर पार्टीसिपेटींग इन स्पोर्टस् ॲक्टिविटीज. रिट्रिव्हड २७ डिसेंबर २०१३, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.बीएएमयू.नेट
११. गंदगे, के., आणि धुमाळ, यु. शारीरिक शिक्षणशास्त्र. नांदेडः समर्थ प्रकाशन.
१२. गेहू युनिव्हर्सिटी,. (२०११). पार्टीसिपेशन इन को-करिक्यूलर, एक्स्ट्राकरिक्यूलर ॲन्ड ॲथलेटिक ऑर स्पोर्टस् ॲक्टिविटीज. रिट्रिव्हड ४ मार्च २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. जीईएचयू.एसी.इन
१३. गोवा बोर्ड ऑफ सेकण्डरी ॲन्ड हायर सेकण्डरी एज्युकेशन,. (२०१३) इम्प्लिमेंटेशन ऑफ स्पोर्टस् मेरीट मार्क्स स्कीम ॲज पर द रिवाईज्ड गोवा स्टेट स्पोर्टस् पॉलिसी फ्रॅाम दी ॲकेडेमिक ईअर २०१३-१४ ऑनवर्डस्. रिट्रिव्हड १६ सप्टेंबर २०१४, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.जीबीएसएचएसई.जीओव्ही.इन
१४. गोंडवाना युनिव्हर्सिटी,. (२०१५). इन्सेटिव मार्क्स फॉर गेम्स ॲन्ड स्पोर्टस् २०१४-१५. रिट्रिव्हड १४ मे २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.गोंडवानाडीजीटलयुनिव्हर्सिटी.ऐसी
१५. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (१९५२). सेकण्डरी एज्युकेशन कमिशन. न्यू दिल्लीः मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन ॲण्ड सोशल वेलफेअर.
१६. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (१९८०). रिपोर्ट ऑफ द नॅशनल स्पोर्टस् पॉलिसी. न्यू दिल्लीः ऑल इंडिया स्पोर्टस् कौंसिल ॲण्ड मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन.
१७. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (१९८४). रिपोर्ट ऑफ द नॅशनल स्पोर्टस् पॉलिसी. न्यू दिल्लीः डिपार्टमेंट ऑफ युथ अफेयर्स ॲण्ड स्पोर्टस्.
१८. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (१९९२). प्रोग्राम ऑफ ॲक्शन- नॅशनल स्पोर्टस् पॉलिसी. न्यू दिल्लीः डिपार्टमेंट ऑफ युथ अफेयर्स ॲण्ड स्पोर्टस्.

१९. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (२००१). नॅशनल स्पोर्टस् पॉलिसी २००१. न्यू दिल्लीः मिनिस्ट्री ऑफ युथ अफेयर्स ॲण्ड स्पोर्टस्. रिट्रिव्हड १३ मार्च २०१३ फ्रॉम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.नॅप्स्इंडिया.ऑर्ग
२०. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (२००७). कॉम्प्रेहेंसिव स्पोर्टस् पॉलिसी २००७ (ड्राफ्ट). न्यू दिल्लीः मिनिस्ट्री ऑफ युथ अफेयर्स ॲण्ड स्पोर्टस्. रिट्रिव्हड २ जून २०१३ फ्रॉम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. वायएएस.एनआयसी.इन
२१. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया,. (२०११). नॅशनल स्पोर्टस् डेव्हलपमेंट कोड ऑफ इंडिया २०११. न्यू दिल्लीः मिनिस्ट्री ऑफ युथ अफेयर्स ॲण्ड स्पोर्टस्. रिट्रिव्हड २१ मे २०१४ फ्रॉम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. वायएएस.एनआयसी.इन
२२. गव्हर्नमेंट ऑफ केरला,. (२०१३) मॅन्यूअल ऑफ केरला स्टेट स्कूल्स ॲथलेटिक्स् ॲन्ड गेम्स् मीट. रिट्रिव्हड १ मार्च २०१५, फ्रॉम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.गुगल.को.इन/स्कूलस्पोर्टस्.इन.
२३. हुसैन, टी. (२०१२). हिस्ट्री, फाऊंडेशन ऑफ फिजिकल एज्युकेशन ॲन्ड एज्युकेशनल साइकॉलॉजी. न्यू दिल्लीः स्पोर्टस् पब्लिकेशन. रिट्रिव्हड फ्रॉम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.बुक्स्.गुगल.को.इन
२४. इब्राहीम, एम. (२०११). क्रीटीकल इव्हॅल्यूशन ऑफ पॉलिसीज ॲण्ड प्रोग्राम्स् ऑफ फिजिकल एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस् इन द स्कूल्स ऑफ जम्मू ॲन्ड कश्मिर (पीएच.डी). अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी, अलिगढ.
२५. जर्दे, एस., ॲण्ड जर्दे, एस. (१९९१). शारीरिक शिक्षणाचे स्वरुप. कोल्हापूरः चंद्रमा प्रकाशन.
२६. जर्दे, एस. (१९९३). शारीरिक शिक्षणाचा इतिहास-भाग १. कोल्हापूरः अम्बा प्रकाशन.
२७. जर्दे, एस. (१९९३). शारीरिक शिक्षणाचा इतिहास-भाग २. कोल्हापूरः चंद्रमा प्रकाशन.
२८. जर्दे, एस. (१९९५). शारीरिक शिक्षणाची तत्वे. कोल्हापूरः चंद्रमा प्रकाशन.

२९. केरला हायर सेकेंडरी स्कूल,. (२०१५). हायर सेकेंडरी एक्झामिनेशन, २०१५- मॉडिफिकेशन्स/ॲडिशन्स सप्लीमेंटरी टू द नोटीफिकेशन. रिट्रिव्हड १८ ऑगस्ट २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एचएसएसलाईव्ह.ब्लॉगस्पॉट.इन

३०. केरला गव्हर्मेंट,. (२०११). केरला रोल मॉडेल टू द रेस्ट ऑफ इंडिया. रिट्रिव्हड २१ जुलै २०१२, फ्रॅाम एचटीटीपीः// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.केरला.जीओव्ही.इन

३१. कोठीवाले, डी. (१९६५). *शारीरिक शिक्षणाचा विकास.* पुणेः ढोकळ प्रकाशन.

३२. कुलकर्णी, द. (२०००). *माध्यमिक शाळांमधून शारीरिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या राज्य सरकारच्या धोरणाच्या संदर्भात पुणे शहरातील माध्यमिक शाळांतील शारीरिक शिक्षणाच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करणे व त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे* (पीएच.डी). पुणे विद्यापीठ.

३३. क्षिरसागर, रा. (२०११). महाराष्ट्रातील राज्यस्तरीय क्रीडा संघटनांचे क्रीडा विकासातील योगदानाचे अध्ययन (पीएच.डी). अमरावती विद्यापीठ.

३४. कुमार, एस. (२०१३). स्टडी ऑफ डेव्हलपमेंट ऑफ स्पोर्टस् ॲट स्कूल लेवल इन हिमाचल प्रदेश (पीएच.डी). हिमाचल प्रदेश युनिव्हर्सिटी, हिमाचल.

३५. लक्ष्मीकांत, पांडे. (१९६७). शारीरिक शिक्षा की शिक्षण पद्धती. नयी दिल्ली. मेट्रोपोलिटन बुक कंपनी.

३६. लोकमत,. (२०१०). क्रीडा गुणांची मदत की खिरापत ? (पृ.४). दि. १९ जून २०१०.

३७. लोकमत,. (२०१०). वशिलेबाजी आणि गैरव्यवहाराचे शालेय सामने २५ मार्कांचा खेळ (पृ.४). दि. २४ ऑक्टोबर २०१०.

३८. लोकमत,. (२०१२). राहा 'फिट' घ्या वाढीव गुण (पृ.१). दि. ३१ ऑगष्ट २०१२.

३९. महाराष्ट्र शासन,. (१९९६). महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६. पुणेः क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

४०. महाराष्ट्र शासन,. (२००१). महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१. पुणेः क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.

४१. महाराष्ट्र शासन,. (२०११). महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०११ (मसुदा). पुणेः क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य.

४२. महाराष्ट्र शासन,. (२०१२). महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२. पुणेः क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य.

४३. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. एसएससी २०११/(१६२/११) उमशि-२, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२. दिनांक : ३० नोव्हेंबर २०११.

४४. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणेः परिपत्रक क्रमांक अ.शा.पत्र.क्रमांक रा.मं./परीक्षा-५/३६५५. दिनांक १९ मे २००७.

४५. मोजुमदार, आर. (२००९). हिस्ट्री ऑफ फिजिकल एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस्. न्यू दिल्लीः स्पोर्टस् पब्लिकेशन. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.बुक्स्.गुगल.को.इन

४६. मोरे, आ. (२०११). *माध्यमिक शाळेतील क्रीडा सुविधा व त्यांची क्रीडा निष्पादन यांच्या सहसंबंधाचे अध्ययन* (पीएच.डी). अमरावती विद्यापीठ.

४७. मुळे, ए., ॲण्ड उमाठे, वि. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. नागपूरः महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

४८. नॅप्स् इंडिया,. (१९९२). फस्ट नॅशनल कॉन्फरन्स ऑफ फिजिकल एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस्. रिट्रिव्हड २ जून २०१३, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.नॅप्स्इंडिया.ऑर्ग

४९. नायर, एस. (१९९३). गव्हर्मेंट ॲन्ड स्पोर्टस् इन केरला, इंडिया. जर्नल ऑफ स्पोर्टस् मॅनेजमेंट, ७, २५६-२६२.

५०. एनडीटीव्ही., (२०११). मार्क्स फॉर स्पोर्टस अंडर द फीट इंडिया मुव्हमेंट. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.बिझिनेस. स्टडंर्ड.कॉम

५१. एनडीटीव्ही., (२०१३). नीड ऑफ मार्क्स फॉर स्पोर्टस्. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एनडीटीव्ही.कॉम

५२. नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटी, जळगाव,. (२००७). ऑर्डिनन्स, नं. १६३. ग्रँट फॉर ॲडिशनल मॉर्क्स फॉर एक्स्ट्रा करिक्यूलर ॲक्टिविटीज. रिट्रिव्हड १८ ऑक्टोबर २०१२, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एक्झाम.एनएमयू.ऐसी.इन

५३. पुरंदरे, गो. (१९९२). शारीरिक शिक्षणाचा इतिहास. मुंबईः मॅजेस्टिक प्रकाशन.

५४. राजे, ड. (२००९). पुणे व कोल्हापूर जिल्हांतील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या कारक क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास (पीएच.डी). शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

५५. राय, पी. (२००५). अनुसंधान परिचय. आग्राः लक्ष्मी नारायण अग्रवाल.

५६. आर. टी. एम. नागपूर युनिव्हर्सिटी,. (२०१०). ॲन ऑर्डिनन्स (१ ऑफ २०१०) टू अमेन्ड ऑर्डिनन्स नं. २ ऑफ १९९६, प्रोव्हायडिंग फॉर मॅग्झिमम टेन क्रेडिट मार्क्स ॲज ॲन इन्सेंटीव टू द स्टूडेंट्स पार्टीसिपेटींग इन द एनएसएस, एनसीसी, गेम ॲन्ड स्पोर्टस्. रिट्रिव्हड ३१ जानेवारी २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. नागपूरयुनिव्हसिटी. ऑर्ग

५७. रुहेला, एस. (१९९६). *कॉलेजिएट वुमेन ॲथलिटस्.* न्यू दिल्लीः रिजेन्सी.

५८. सकाळ,. (२०१०). २५ गुणांचा गोंधळ आता थांबणार (पृ.८). दि. २ सप्टेंबर २०१०.

५९. साखरे, सा. (२००५). विदर्भातील माध्यमिक शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमात योगाभ्यासाचे चिकित्सक अध्ययन (पीएच.डी). अमरावती विद्यापीठ.

६०. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, पुणेः परिपत्रक क्रमांक राक्रीधो,१०९८/ प्रं.क्र.५/ क्रीयुसे-१. मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२. दिनांक : २७/०२/९८.
६१. सं.गा.बा. अमरावती युनिव्हर्सिटी,. (२०१३). ॲन ऑर्डिनन्स टू प्रोव्हाईड फॉर इन्सेंटीव मार्क्स फॉर एनसीसी, एनएसएस., गेम्स् ॲन्ड स्पोर्टस् ॲन्ड अदर एक्स्ट्रा करिक्यूलर ॲक्टिविटीज ऑफ कॉलेजिएट स्टूंडटस् (अमेंडमेंट) ऑडीनन्स् २०१३. रिट्रिव्हड ३१ जानेवारी २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एसजीबीऐयू.ऐसी.इन
६२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबईः परिपत्रक क्रमांक एसएससी २००२/(१०४/०२)/उमाशि २. मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२. दिनांक : ६ जून २००६.
६३. शरदराव, एच. (२००९). हिस्ट्री ऑफ फिजिकल एज्युकेशन. न्यू दिल्लीः स्पोर्टस् पब्लिकेशन. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.बुक्स्.गुगल.को.इन
६४. एसएनडीटी युनिव्हर्सिटी,. (२०१०). ॲडिशनल मार्क्स फॉर एक्स्ट्रा करिक्यूलर ॲक्टिविटीज. रिट्रिव्हड १८ ऑगस्ट २०१४, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एसएनडीटी.ऐसी.इन
६५. स्पोर्टस् पॉलिसी ऑफ दमण ॲन्ड दीव,. (२०१३). स्पोर्टस् स्कॉलरशिप्स/इन्सेंटीव्ज. रिट्रिव्हड ६ जानेवारी २०१५, फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.दमण.एनआयसी.इन
६६. टाईम्स ऑफ इंडिया,. (२०१३). स्कूल कीडस् टू गेट ग्रेस मार्क्स फॉर स्पोर्टस् अचिव्हमेंटस. रिट्रिव्हड फ्रॅाम एचटीटीपीः//डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.आर्टिकल्स.टाईम्सऑफइंडिया.इंडियाटाईम्स.कॉम
६७. तिवारी, एस., राठोर, सी., अँड सिंग, वाय. (२००८). *हिस्ट्री ऑफ फिजीकल एज्यूकेशन.* न्यू दिल्लीः ऐ.पी.एच. पब्लिशिंग कॉर्पोरेशन.
६८. यशवंतराव चव्हाण नाशिक विद्यापीठ,. (२०११**).** स्पोर्टस् ॲक्टिविटीज. रिट्रिव्हड २१ जुलै २०१२, फ्रॅाम एचटीटीपीः// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.वायसीएमओयु.डीजिटलयुनिव्हर्सिटी.ऐसी

६९. युनिव्हर्सिटी ऑफ कालिकत,. (२००५). अवार्ड ऑफ ग्रेस मार्क्स फॉर प्रोफेशनल कोर्सेस. रिट्रिव्हड ४ फेब्रुवारी २०१२, फ्रॉम एचटीटीपी://डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.युनिव्हर्सिटीऑफकालिकत.इन्फो
७०. युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई,. (१९९८). अवार्ड ऑफ टेन ग्रेस मार्क्स अंडर ०-२२९. रिट्रिव्हड ४ जानेवारी २०१५, फ्रॉम एचटीटीपी:// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एमयू.ऐसी.इन
७१. युनिव्हर्सिटी ऑफ पुणे,. (२००७). स्किम फॉर प्रमोशन ऑफ स्पोर्टस् अॅट कॉलेज लेवल. रिट्रिव्हड २ मे २०१२, फ्रॉम एचटीटीपी:// डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.युनीपुणे.ऐसी.इन
७२. वाखारकर, डी., अॅण्ड आलेगावकर, पी. (१९८४). शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरुप. पुणेः पार्वती प्रकाशन

# लेखक परिचय



## डॉ. सागर प्रल्हादराव नारखेडे

डॉ. सागर प्र. नारखेडे हे अकोला येथील सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडा येथे शारीरिक शिक्षण संचालक या पदावर गत ८ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभाग नोंदविला असून अनेक शोधपत्रिकांमधून संशोधनपर लेखन केलेले आहे. त्यांनी अमरावती विद्यापीठामधून एम.ए. (इतिहास) व एम.पी.एड. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले आहे. तसेच त्यांनी हॅण्डबॉल या खेळात साई एन.एस.एन.आय.एस., पटीयाला येथून १ वर्षाचा डिप्लोमा इन स्पोर्टस् कोचिंग हा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. त्यांनी दोन वेळा नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. पूणे विद्यापीठाकडून त्यांनी एम.फिल. ची पदवी तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून आचार्य पदवी मिळविलेली आहे.

ISBN 978-1-365-81304-7 90000

9 781365 813047

Printed by

LAXMI
BOOK PUBLICATION, Solapur
Ph.: 0217-2372010 / +91-9595-359-435
Email.: ayisrj2011@gmail.com
Website.: www.lsri.in

Published by

Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBL